संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २६४ * * अकोला * शुक्रवार, दिनांक २१ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

॥ परमात्मा एक ॥
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज


7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. ११, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४

अग्राग्रलेख

खरीखरी..

## निवडणूक आयोग सुधारला

आपले सध्याचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आल्यानंतर निवडणूक आयोग थोडा माणसाळलेला आहे, असे वाटते. यांच्या आधीचे निवडणूक आयुक्त अज्ञानेश राजीवकुमार नावाचे इसम होते. ज्ञानाशी त्यांचा फारसा संबंध नव्हता. लोकांच्या शंका कुशंकांचे निर्मूलन करण्याची त्यांची तयारी नव्हती. 'मौनम् सर्वार्थसाधनम्' हा त्यांचा बाणा होता. त्यामुळे विरोधकांनी किंवा सामान्य माणसांनी घेतलेल्या कोणत्याही आक्षेपाबाबत स्पष्टीकरण करणे किंवा शंकेचे निराकरण करण्याची त्यांची तयारी नव्हती आणि या गोष्टींची त्यांनी तमा बाळगलीच नव्हती. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत लोकसभेच्या तुलनेने विधानसभेच्या मतदारांची संख्या लक्षणीयरित्या वाढलेली होती. त्यावरून बराचसा वादविवाद झाला होता. पण त्याबद्दल अज्ञानेश असलेले राजीव कुमार चकार शब्द काढायला तयार नव्हते. बोलायला तयार नव्हते. अखेर लोकसभेत विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आयोगाच्या कारभाराबाबत चांगलाच प्रकाश पाडला. महाराष्ट्रा प्रमाणेच दिल्लीतही अनेक मतदारांची नावे गाळली गेली आणि नवे मतदार दाखल झाले. या सर्व बाबी निश्चितपणे संशयास्पद आहेत. आता लवकरच बिहार आणि बंगालमध्ये निवडणुका होणार आहेत. त्यामुळे त्या त्या राज्यातील निवडणूक कशी पार पडते. याबद्दल शंकाकुशंका व्यक्त होणे स्वाभाविक आहे. मतदार यादींबाबत बराच गोंधळ झालेला आहे. त्यामुळे आयोगाने काही बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने मतदानाची आकडेवारी बूथनिहाय प्रसिद्ध करावी. असे सांगितल्यानंतर निवडणूक आयोगाने, यासाठी अनुकूलता दर्शवलेली आहे. नव्या आयुक्तांच्या आगमनानंतर मतदानाची आकडेवारी बूथ प्रमाणे जाहीर केली जाईल. हे आश्वासन निवडणूक आयोगाने न्यायालयात दिलेले आहे. सुरुवातीपासून किती मतदान झाले आणि शेवटच्या तासामध्ये किती मतदान झाले. याचे आकडे जास्तीत जास्त दोन दिवस म्हणजेच ४८ तासात सांगितले गेले तर संशय निर्माण होणार नाही. नवे निवडणूक आयुक्त याबाबत सकारात्मक आहेत. ही त्यातल्या त्यात चांगली बाब आहे. कोणे एकेकाळी टी एन शेषन नावाचे कडक शिस्तीचे निवडणूक आयुक्त होते. त्यांच्या नावाने भल्याभल्यांना कापरे भरत होते असे म्हणतात. त्यांनी त्यावेळी असलेल्या नियमाबरहुकुम कारभार करून अनेक गैरप्रकार थांबवले होते. पण आता गेल्या काही वर्षात निवडणूक आयुक्त चक्क मुका म्हणजे अबोल बनला होता. आता सर्वोच्च न्यायालयाच्या धक्क्यामुळे का होईना, आयोगाने संशय दूर करण्याचा प्रयत्न केला. तर विनाकारण आरोप होणार नाहीत. मतदानाच्या टक्केवारीचे आकडे यापूर्वी लगेच दुसऱ्या दिवशी जाहीर होत असत. आता तर त्यापेक्षाही वेगवान यंत्रणा कार्यरत आहेत. इलेक्ट्रॉनिक मशीन आहेत. मग मतदानाची टक्केवारी जाहीर करण्यात दहा-बारा दिवस वाढण्याचे कारण काय, असा साधा प्रश्न मतदारांच्या मनात आला. तर त्यात नवल ते काय. मतदानाच्या टक्केवारीत पाच सहा टक्क्यांपर्यंत फरक असणे. हे संशय वाढवण्याचे कारण होऊ शकते. एकूणच जनतेच्या मनातील संशय शक्यतो वाढूच नये. असे निवडणूक आयोगाने ठरवले पाहिजे. या दृष्टीने आत्ताचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी घेतलेली भूमिका भले सर्वोच्च न्यायालयाच्या दट्ट्यामुळे घेतलेली असली. तरी ती स्वागतास? पात्र आणि योग्यच आहे. निवडणूक आयोगाबद्दलची साशंकता दूर होणे, ही आजची पहिली गरज आहे. ज्ञानेश कुमार यांनी पहिले पाऊल टाकलेले आहे. पुढे काय होईल, ते त्यांनाच ठाऊक असेल.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## छत्तीसगडमधील चकमकीत ३० नक्षलवाद्यांचा खात्मा

# एक जवान शहीद

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २० :

छत्तीसगडमधील बिजापूर-दंतेवाडा आणि कांकेर- नारायणपूर जिल्ह्याच्या सीमेवर आज सकाळी सात वाजताच्या सुमारास झालेल्या दोन वेगवेगळ्या चकमकीत ३० नक्षलवाद्यांना ठार करण्यात जवानांना यश आले. या चकमकीत एक जवान देखील शहीद झाला. जवानांकडून उशिरापर्यंत शोधमोहीम सुरु असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.



२० मार्चरोजी छत्तीसगड पोलिसांना बिजापूर-दंतेवाडा(बस्तर) जिल्ह्याच्या सीमाभागातील गंगलूर जंगल पारिसरात घातपात घडविण्याच्या उद्देश्याने मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची माहिती मिळाली होती. यावरून जिल्हा राखीव रक्षक दल, विशेष कार्य दल आणि बस्तर फायटर्ससह संयुक्त सुरक्षा दलांनी नक्षल्यांविरोधात अभियान राबविले होते. दरम्यान, जंगलात दडून बसलेल्या नक्षलवाद्यांनी पोलिसांच्या दिशेने गोळीबार सुरु केला. यावेळी पोलिसांनी दिलेल्या प्रत्युत्तरात २६ नक्षलवादी ठार झाले. यात बिजापूर जिल्हा राखीव दलातील एक जवान शहीद झाला.

तर दुसरी चकमक कांकेर-नारायणपूर (अबुझमाड) जिल्ह्याच्या सीमाभागात उडाली.

यात ४ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात सुरक्षा जवानांना यश आले. दोन्ही घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला असून शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढू शकतो, असे छत्तीसगड पोलिसांचे म्हणणे आहे.

### एंड्री परिसरात सैनिकांनी नक्षलवाद्यांच्या एका मोठ्या गटाला घेरले

गंगलूर परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या आधारावर पोलिसांनी दंतेवाडा, विजापूर सीमेवर संयुक्त कारवाई सुरू केली. आदल्या दिवशी, सैनिकांनी एंड्री परिसराला वेढा घातला होता. गुरुवारी सकाळ पासूनच जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू झाली.

या वर्षी आतापर्यंत छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांसोबत झालेल्या विविध चकमकींमध्ये सुमारे १०५ नक्षलवादी मारले गेले आहेत. ज्यामध्ये बस्तर भागातील ६९ नक्षलवाद्यांचा समावेश आहे. तसेच या मोहिमांदरम्यान एकूण १३ जवान आणि १६ नागरिकांचाही मृत्यू झाला आहे

## दिशा सालियान प्रकरणाचे सभागृहात पडसाद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :

दिशा सालियानच्या वडिलांनी बुधवारी मुलीच्या मृत्यू संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत आदित्य ठाकरे यांच्यावर आरोप करण्यात आले. त्यामुळे या प्रकरणाचे पडसाद आज सभागृहात उमटले. या प्रकरणात एका मंत्र्यावर आरोप झालेत. या प्रकरणाची चौकशी करा, अशी मागणी आमदार अमित साटम यांनी केली. तसेच दिशा सालियान वडिलांच्या वकिलांनी ज्या ज्या व्यक्तींची नावे घेतली आहे. या सर्वांना ताब्यात घेऊन चौकशी करणार का? असा सवालही साटम यांनी सरकारला विचारला.



अमित साटम यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर नीतेश राणे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या जजमेंटचा हवाला देत आदित्य ठाकरे यांना अटक करण्याची मागणी केली आहे. अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यूप्रकरणी वडीत सतीश सालियन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची आणि तपास सीबीआयकडे सोपवण्याची विनंती करण्यात आली आहे.

## समाजमाध्यमांवरील १४० पोस्ट हटवल्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :

नागपूर दंगलीच्या पार्श्वभूमीवर सर्व पोलीस यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. रस्त्यावरील बंदोबस्तासह समाज माध्यमांवरही पोलीस लक्ष ठेऊन आहेत. महाराष्ट्र सायबर विभागाने समाज माध्यांवरील १४० आक्षेपार्ह व प्रक्षोभक पोस्ट शोधल्या असून त्या हटवण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.

नागपुरातील ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सोमवारी रात्रीपासून संचारबंदी जाहीर केली. बुधवारी देखील संचारबंदी कायम असून दंगलीतील संशयितांना पकडण्यासाठी शोध मोहीम राबवण्यात येत आहे. राज्यभरातील सर्व पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या उद्देशाने योग्य त्या उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर समाजकंटक हिंसक घटनांना खतपाणी घालण्याची शक्यता असल्यामुळे त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येत आहे. अशा समाजकंटकांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच समाज माध्यमांवरही महाराष्ट्र सायबर विभाग लक्ष ठेऊन आहे.

समाज माध्यमांवरूनही आक्षेपार्ह पोस्ट व प्रक्षोभक पोस्टद्वारे हिंसक घटनांना खतपाणी घालण्याची शक्यता लक्षात घेता समाज माध्यमांवरही पोलिसांना लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्या अंतर्गत फेसबुक, ट्वीटर, यूट्यूब, इन्स्टाग्राम यासारख्या समाज माध्यमांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. नागपूर पोलिसांच्या मदतीने महाराष्ट्र सायबर विभागाने समाज माध्यमांवरून १४० प्रक्षोभक पोस्ट शोधून काढल्या असून त्या तात्काळ हटवण्याबाबत संबंधित कंपन्यांशी पत्र व्यवहार करण्यात आला आहे. तसेच संबंधित समाज माध्यम खाते कोण हाताळत आहे, याबाबतची माहितीही मागवण्यात आली आहे. या पोस्टबाबत संबंधित व्यक्तींविरोधात योग्य ती कारवाई केली जाईल, असे सूत्रांनी सांगितले. महाराष्ट्र सायबर विभागही समाज माध्यमांवर नियमित लक्ष ठेऊन असतात. दोन वर्षांमध्ये १० हजारांहून अधिक आक्षेपार्ह पोस्ट शोधण्यात आल्या असून त्या हटवण्याची शिफारस करण्यात आली होती.

## राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :

आगामी शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात येत असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज सभागृहात दिली. आगामी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीला लागावी यासाठी सरकारने हा निर्णय घेतला असल्याचे दादा भुसे यांनी म्हटले आहे.

राज्य अभ्यासक्रमाच्या आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संबंधित सुकाणू समितीने देखील मान्यता दिली असल्याची माहिती दादा भुसे यांनी विधान परिषदेत



प्रश्नावर लेखी उत्तर देताना दिली आहे.

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी यासंबंधी प्रश्न विचारला होता.

या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले आहे. यानुसार राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय माध्यमिक शिक्षण

### दादा भुसे यांची माहिती

मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता.

याला सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करून दिली जाणार असून एक एप्रिल पासून नवीन सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले आहे. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या या विषयीच्या चर्चेला उत्तर मिळाले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत राज्यात गुणवत्तापूर्ण आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी स्थापन केलेल्या सुकाणू समितीची बैठक नुकतीच महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई येथे पार पडली होती.

या बैठकीत शिक्षणाच्या दर्जावाढीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय, अंमलबजावणीतील आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर सखोल चर्चा करण्यात आली. धोरणाच्या प्रभावी कार्यवाहीसाठी शिक्षणतज्ज्ञ, प्रशासनिक अधिकारी आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी योगदान दिले आहे.

## भाजप नेते नगरविकास खात्याची प्रकरणे काढत असतानाच नागपूरमध्ये दंगल कशी?

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २० :

अर्थसंकल्पीय अधिवेशनात भारतीय जनता पक्षाचे आमदार नगर विकास खात्यात आणि ठाण्यात सुरू असलेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढत आहे. त्याचवेळी नागपूरमध्ये दंगल घडली, हा निव्वळ योगायोग आहे का? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. बऱ्याच वर्षानंतर नागपूर मध्ये जातीय दंगल झाली आहे. ही नेमकी कोणी घडवली? हा संशोधनाचा विषय



असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. हे सरकार अपयश लपवण्यासाठी एक- एक गोष्टी करायला बघत आहे. या सरकारच्या कारभाराचे धिंडवडे दिवसागणिक सर्वांसमोर येत आहेत.

### उद्धव ठाकरेंचा प्रश्न

त्यामुळे वेळ मारुन नेण्यासाठी हा सर्व कारभार चालू असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

केवळ दिशाभूल करण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे. थडगे उखडायचे किंवा आणखी काही काढायचे, या सर्व गोष्टी थांबून जनतेने तुम्हाला जर खरेच बहुमत दिले असेल, तर ते बहुमत सत्कारणी लावा, असा सल्ला देखील त्यांनी दिला.

## १ एप्रिलपासून जिवंत सात-बारा मोहीम

मुंबई : सात-बारामधील मृत शेतकऱ्यांच्या वारसांची नोंद करण्यासाठी महसूल विभाग १ एप्रिलपासून जिवंत सात-बारा मोहीम हाती घेणार आहे. विभागाच्या १०० दिवस कृती कार्यक्रम आराखड्यांतर्गत ही मोहीम राबविली जाणार आहे. ३१ मार्च २०२५ पासून बुलडाणा जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्याची दखल घेऊन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही मोहीम संपूर्ण राज्यात राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शासनाने बुधवारी आदेश काढले.

## अंधेरी एमआयडीसीमध्ये भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :

पवई येथील आग विझत नाही तोपर्यंत मुंबईत गुरुवारी अंधेरी परिसरातही आग लागल्याची घटना घडली. अंधेरी पूर्वेकडील एमआयडीसी परिसरात गुरुवारी दुपारी दोन वाजता भीषण आग लागली. दोन मजली इमारतीच्या गाळ्यातमध्ये ही आग लागली होती. आगीची तीव्रता जास्त असून अग्निशमन दलाने तीन क्रमांकाची वर्दी दिली आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या दहा गाड्या व पाण्याचे आठ मोठे टँकर घटनास्थळी आहेत.

अंधेरी पूर्वेकडील महाकाली गुंफा मार्गावर शांती नगर परिसरात न्यू इंडस्ट्रीअल इस्टेटमध्ये एका दुमजली बांधकामात ही आग लागली होती. दुमलजी बांधकामातील एका गाळ्यात ही आग लागली होती. घटनास्थळी अग्निशमन दलाबरोबरच, पालिकेच्या विभाग कार्यालयाचे कर्मचारी, पोलीस यंत्रणा दाखल झाली आहे.

## औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयातील गैरव्यवहाराची चौकशी करणार : चंद्रकांत पाटील

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :

शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय कराड येथील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणाचा चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार कारवाई केली जाईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत सांगितले.या लक्षवेधीच्या उत्तराच्या वेळी अधिक माहिती देताना मंत्री पाटील यांनी सांगितले आहे की, या महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत असलेल्या डॉ. फहिम जहांगीर सय्यद यांना २५ लाख इतका घर बांधणी अग्रिम मंजूर करण्यात आले होता. डॉक्टर सय्यद या सेवेत असताना त्यांचा मृत्यू झाल्याने शासन नियमानुसार त्यांच्या घरबांधणी अग्रीमावरील व्याजाची रुपये ८ लाख ४९ हजार २३ रुपये इतकी रक्कम क्षमापित करण्यात मान्यता देण्यात आली.

तसेच त्यांना मंजूर करण्यात आलेल्या आक्रम पैकी शिल्लक मुद्दल ९ लाख ६ हजार २५० रुपये त्यांना ते असलेल्या मृत्यु-नि-सेवा उत्पादनातून वसूल करण्यात आले. मात्र, या महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य यांनी डॉ. सय्यद यांच्या मुद्दल व व्याजाची रक्कम असे १७ लाख ५५ हजार २७३ इतकी रक्कम त्यांच्या



वारसाकडून धनादेशद्वारे मागणे हे नियमबाह्य आहे.

याबाबत डॉ. सय्यद यांच्या वारसांनी न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाच्या आदेशानुसार, कॉलेज प्रशासनाने हे पैसे डॉ. सय्यद यांच्या वारसांना परत करणे आवश्यक आहे. डॉ. सय्यद यांच्या वारसा वसूल करण्यात आलेली रक्कम प्रकरणासंदर्भात तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे.तसेच महाविद्यालयाच्या ताब्यात असणारी जागे संदर्भातही आपण स्वतः लक्ष घालून हा विषय मार्गी लावला जाईल असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांनी सांगितले. यासंदर्भात सदस्य महेश शिंदे यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती.

## बनावट कागदपत्रांद्वारे जन्म दाखल १६ जण गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २० :

बोगस व बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करून जन्म प्रमाणपत्र देण्यात आल्याचे गंभीर प्रकार घडले आहेत. जन्म प्रमाणपत्राची पडताळणीमध्ये बनावट कागदपत्रांद्वारे ते वितरीत केल्याचे समोर आले. या प्रकरणात आतापर्यंत जिल्ह्यातील विविध सात पोलीस ठाण्यांमध्ये तब्बल ५२ आरोपींवर गुन्हे दाखल झाले आहेत. या प्रकरणात १६ आरोपींना गजाआड केले, अशी माहिती १९ मार्चला जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी किरीट सोमय्या यांना पत्राद्वारे दिली.

राज्यात बांगलादेशी रोहिंग्या मुस्लिमांना बनावट कागदपत्रांच्या आधारे जन्म प्रमाणपत्र दिल्याचा गंभीर आरोप माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला. अकोला जिल्ह्यात तब्बल १५ हजार ८४५ जन्म प्रमाणपत्र उशिराने देण्यात आले आहेत. जिल्ह्यात विविध भागांत वास्तव्यास असलेल्या अनेकांनी गैरमार्गाने जन्म दाखले मिळवले. या प्रकरणात महसूल विभागाकडून संबंधित प्रमाणपत्रधारकांची पडताळणी केली. शाळांच्या दाखल्यांची देखील तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये विविध गंभीर प्रकार आढळून आले आहेत. कागदपत्रांमध्ये खोडतोड व फेरफार केले. ते प्रशासनाला सादर करीत जन्म प्रमाणपत्र प्राप्त केल्याच्या अनेक घटना जिल्ह्यातील विविध तालुक्यात समोर आल्या आहेत. या प्रकरणात संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रारी दाखल केल्या.

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) नुसार जन्म व मृत्यू प्रमाणपत्र निर्गमित करतांना चुकीची कागदपत्रे सादर केल्यामुळे संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये अकोला शहरांमध्ये एका गुन्ह्यात सर्वाधिक २३

## सध्या आमची आर्थिक परिस्थिती नाही

### पण ती सुधारल्यानंतर २१०० रुपये देऊ : अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर सभागृहात निवदेन दिले. सध्या आमची परिस्थिती नाही, पण आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर आम्ही बहिणींना २१०० रुपये असे अजित पवार म्हणाले. सगळे सोंग करता येते, पण पैशाचे सोंग करता येत नाही. पैसे देणार नाही असे आम्ही म्हटलेले नाही. पण एकंदरीतच आर्थिक परिस्थिती बघून आम्ही ते देऊ, असे ते म्हणाले.

राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देऊ, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारावेळी दिले होते. महायुती सत्तेत आल्यानंतर लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार, असा प्रश्न विचारला जात होता. तेव्हा अर्थसंकल्पात याबाबत निर्णय घेतात, असे महायुतीच्या नेत्यांकडून सांगण्यात आले होते. १० मार्च रोजी अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केला. मात्र या योजनेचा सन्मान निधी वाढवण्याबाबत कोणतीही घोषणा झाली नाही. त्यानंतर विरोधकांनी सरकारला धारेवर धरले होते. आज अजित पवार यांनी



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर सभागृहात निवेदन सादर करताना उपरोक्त माहिती दिला.

आर्थिक परिस्थिती सुधारली की बहिणींना २१०० रुपये देऊ, असे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार नाही, असे म्हटलेलो नाही. सगळी सोंग करता येतात, पैशाचे सोंग करता येत नाही, त्या पद्धतीने आमचे काम चाललेले आहे. आम्ही त्या खात्याच्या मंत्री अदिती तटकरे, स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार असल्याचे सांगितलेले आहे. मी पण सभागृहाला सांगतोय आमच्या लाडक्या बहिणींना आम्ही अ रुपये देणार आहोत. सध्या आम्ही १५०० रुपये कबुल केल्याप्रमाणे देतोय आणि पुढची रक्कम देण्याच्या संदर्भात आमची परिस्थिती सुधारली की ती देऊ, असे अजित पवार म्हणालेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै, २०२४ पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी आतापर्यंत ३३ हजार २३२ कोटी रुपये खर्च झाला आहे. २०२५-२६ मध्ये या योजनेकरिता एकूण ३२ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

यावेळी एका आमदाराने त्यांना मधेच रोखून २१०० रुपये झाले का? अशी विचारणा केली. त्यावर अजित पवारांनी जरा बजेट होऊ द्या, दम ठेवा असा सल्ला दिला. काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला असून अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचे विचाराधीन आहे, असे अजित पवारांनी सांगितले.

# पाच वर्षांपासून बदनामीचा प्रयत्न:आदित्य ठाकरें

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २० :** दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना एका वाक्यात उत्तर दिले आहे. गेल्या पाच वर्षापासून माझ्या बदनामीचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, हे प्रकरण न्यायालयात गेले आहे. त्यामुळे आम्ही न्यायालयात बोलू असे देखील आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.



गेली पाच वर्षे माझ्या बदनामीचा प्रयत्न होतच आहे. याला तुम्ही देखील साक्षीदार आहात. मात्र हे प्रकरण कोर्टात आहे तर कोर्टात बोलू. या प्रकरणाचे राजकारण केले जात आहे का? या मुद्द्यावर मला जायचे नाही. गेल्या पाच वर्षांपासून मी केवळ मुद्दा मांडत आलेलो आहे. आणि मुद्द्याचेच बोलत राहणार असल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. आम्ही या सरकारला या अधिवेशनात एक्स्पोज केले आहे. केवळ आम्हीच नाही तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देखील सरकारला एक्स्पोज केले आहे.

त्यामुळे आता भाजपचे मंत्री त्यांच्यावर कारवाई करायला मागणार का? महाराष्ट्र कुठे नेऊन ठेवला आहे? असा प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. महिलांचे प्रश्न असो, शेतकऱ्यांचे प्रश्न असो, या सर्वात महाराष्ट्राची परिस्थिती बिकट होत चालली आहे. त्यासोबतच अर्थसंकल्पात देखील महाझुटी युतीने दिलेल्या आश्वासनांचा एकही मुद्दा नसल्याचा आरोप त्यांनी केला.

# नियमबाह्य कारभाराविरोधात महाविकास आघाडीचे आंदोलन

**सभापती-अध्यक्षांवर पक्षपातीपणाचा आरोप**

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २० :** महाराष्ट्र विधानमंडळाच्या पायजयांवर आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार आंदोलन करत सभापती आणि अध्यक्षांवर नियमबाह्य कामकाज आणि पक्षपातीपणाचे गंभीर आरोप केले. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विरोधकांनी सरकारला साथ देणाजया या पदाधिकाजयांचा धिक्कार असो, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सांगितले की, सभापती आणि अध्यक्ष सत्ताधारी महायुती सरकारच्या दबावाखाली काम करत असून, विरोधी पक्षांचा आवाज दाबला जात आहे. ह्लसभापती पक्षपाती भूमिका घेतात आणि नियमांचे उल्लंघन करतात. सरकारच्या चुकीच्या धोरणांना पाठिंबा देण्यासाठी हे पदाधिकारी लोकशाहीची हत्या करत आहेत, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या आंदोलनात काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटातील आमदारांनी सहभाग घेतला. आंदोलनादरम्यान महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. सरकारला साथ देणाजया अध्यक्ष आणि सभापतींचा धिक्कार असो, घटना न पाळणाजया सभापतींचा धिक्कार असो, आणि लोकशाहीचा खून करणाजया सभापती आणि अध्यक्षांचा धिक्कार असो, अशा घोषणांनी विधानमंडळ परिसरात तणाव निर्माण झाला. विरोधकांनी हातात फलक आणि बॅनर घेऊन आपला निषेध व्यक्त केला. या आंदोलनाचे नेतृत्व करणारे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले, सभापती राम शिंदे यांनी वारंवार नियमांचे उल्लंघन केले आहे. अधिवेशनात विरोधकांना बोलण्याची संधी दिली जात नाही आणि सरकारच्या चुकीच्या कृत्यांवर पडदा टाकला जातो. ही लोकशाहीची थट्टा आहे. त्याचबरोबर, काँग्रेस नेते नाना पटोले यांनीही सरकारवर टीका करताना म्हटले, अध्यक्ष आणि सभापती हे महायुतीचे हस्तक बनले आहेत. त्यांच्यामुळे विधिमंडळाचे कामकाज पक्षपाती झाले आहे.

दुसरीकडे, सत्ताधारी महायुतीने या आंदोलनाला विरोधकांचा नाटकीपणा संबोधला. भाजपचे नेते प्रवीण दरेकर म्हणाले, महाविकास आघाडीला चर्चेत राहण्यासाठी अशी नौटंकी करावी लागते. सभापती आणि अध्यक्ष नियमांनुसारच काम करत आहेत. विरोधकांकडे मुद्दे नाहीत, म्हणून ते आंदोलनाचा आधार घेत आहेत. शिंदे गटाचे नेते उदय सामंत यांनीही हा आरोप फेटाळला आणि सांगितले की, सभागृहात सर्वांना बोलण्याची संधी दिली जाते, पण विरोधक फक्त गोंधळ घालतात. हे आंदोलन सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर झाले असून, यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. नागपूर हिंसाचार, औरंगजेब वाद आणि दिशा सालियन प्रकरणासारख्या संवेदनशील मुद्द्यांवरून आधीच वातावरण तापले असताना, हे आंदोलन महायुती सरकारसाठी नवी डोकेदुखी ठरू शकते. विरोधकांनी सभापती राम शिंदे यांना पदावरून हटवण्याची मागणीही लावून धरली आहे, ज्यामुळे विधान परिषदेतील कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

कबर खणणे महाराष्ट्र धर्म नाही

## कपिल पाटील यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना खुले पत्र

**मुंबई :** राज्यातील काही मंत्र्यांच्या भडक वक्तव्यांमुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर माजी खासदार कपिल पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खुले पत्र लिहून संताप व्यक्त केला आहे. 'कबर खणणे हा महाराष्ट्र धर्म नाही', असे स्पष्ट करत पाटील यांनी सामाजिक सलोखा टिकवण्याचे आवाहन केले आहे. नागपूरसह काही ठिकाणी झालेल्या अनुचित घटनांमुळे वातावरण बिघडले असले तरी महाराष्ट्राची जनता संयमी आहे, असे पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे. मात्र, या परिस्थितीतही मंत्री नितेश राणे यांचे वादग्रस्त वक्तव्य सुरूच असल्याने त्यांनी यावर मुख्यमंत्री आणि सरकारने तातडीने भूमिका घ्यावी, अशी मागणी केली आहे. महाराष्ट्राची वैचारिक आणि सामाजिक समज मांडताना पाटील यांनी छत्रपती शिवराय, संभाजी महाराज, शाहू महाराज, फुले-आंबेडकरआणि संत परंपरेचा दाखला दिला आहे. अफजलखान आणि औरंगजेबाच्या कबरींना हात न लावणे, हे मराठी समाजाच्या औदार्याचे प्रतीक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नितेश राणे यांच्या 'मल्हार सर्टिफिकेट' योजनेवर प्रश्न उपस्थित करत पाटील यांनी सरकारने याबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणी केली. हिंदू खाटीक समाजानेही याला विरोध केल्याचे त्यांनी नमूद केले. शेवटी, समाजातील द्वेष वाढवण्याऐवजी रमजान ईद आणि गुढी पाडव्याच्या माध्यमातून एकोप्याचा संदेश देण्याचे आवाहन कपिल पाटील यांनी केले आहे.

# तांडा, वाडी-वस्त्यांवरील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची प्रथमच विधानभवनाला भेट

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २० :** राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या माध्यमातून शिक्षण घेणा?्या तांडा, वाडी व वस्त्यांवरील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना आज राज्याच्या विधिमंडळाचे प्रत्यक्ष कामकाज पाहण्याची अनोखी संधी मिळाली. इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा विभागाचे मंत्री अतुल सावे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.

पुणे विभागातील पाच जिल्ह्यांतील मुली आणि ४४ मुलांसह एकूण १०० विद्यार्थी यावेळी विधानभवनात पोहोचले. यावेळी त्यांनी विधानसभेतील चालू अधिवेशनाचे सत्र पाहिले आणि विधिमंडळातील कामकाजाची माहिती घेतली. विधिमंडळाचे प्रत्यक्ष कामकाज पाहताना विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आणि आनंद दिसून येत होता. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मंत्री अतुल सावे म्हणाले, आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाजया विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे. या विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वत:च्या कुटुंबाचा आणि समाजाचा विकास करावा आणि देशाच्या प्रगतीसाठी सक्षम नागरिक म्हणून योगदान द्यावे, हीच आमची अपेक्षा आहे. विधानभवन भेटीआधी विद्यार्थ्यांनी सकाळच्या सत्रात छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयालाही भेट दिली. इतिहास, संस्कृती आणि परंपरेची ओळख करून देणारी ही सफर विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरली. ही भेट विद्यार्थ्यांना अत्यंत प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक अनुभव देणारी ठरली, अशी प्रतिक्रिया शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. विधिमंडळ परिसरात येण्याची आणि प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेचा भाग होण्याची संधी मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावल्याचे यावेळी स्पष्टपणे दिसून आले.

# आघाडीच्या नेत्यांकडून राज्यपालांकडे सरकार विरोधात निवेदन सादर




■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २० :** सत्ताधारी पक्षाला साथ देऊन नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या सभापती आणि अध्यक्ष यांच्याविरोधात महाविकास आघाडीच्या आमदारांनी राजभवन येथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन निवेदन दिले. संसदीय प्रणालीमध्ये विरोधी पक्ष हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यांची भूमिका ही सरकार विरोधी नसून सरकारच्या निर्णयावर आणि धोरणांवर अंकुश ठेवणारी आहे. आवश्यक तेथे टीका करणे आणि पर्यायी धोरण सुचविणे आहे. महाराष्ट्र विधानपरिषद व विधानसभा सभागृहामध्ये सभापती व अध्यक्ष यांचेकडून सभागृहाच्या कामकाजात पक्षपाती व एकांगी भूमिकेचा अवलंब केला जात आहे. दोन्ही सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये संसदीय परंपरांचे पालन न करता नियम बाह्य सभागृहाचे कामकाज चालविले जात असल्याची माहिती राज्यपाल यांना दिली.

याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधिमंडळ गटनेते आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अनिल परब, भास्कर जाधव, भाई जगताप, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, सुनील राऊत, सचिन अहिर, आनंद बाळा नर, प्रवीण स्वामी, अभिजित वंजारी, अजय चौधरी, सुनील शिंदे, अरुण शेठ, ज. मो. अभ्यंकर, मनोज जामसुतकर, सिद्धार्थ खरात, कैलास पाटील व वरुण सरदेसाई उपस्थित होते.

# दिशा शालियान प्रकरणी सत्ताधारी आक्रमक




**मुंबई, दि. २० :** दिशा शालियन प्रकरणात आदित्य ठाकरे यांचे नाव घेण्यात आल्याने सत्ताधारी पक्षाचे आमदार आक्रमक झाले आहे. विधिमंडळाच्या पायऱ्यांवर हातात फलक घेऊन या आमदारांनी आंदोलन केले. दिशा सालियान मृत्यू प्रकरणाचे पडसाद गुरुवारी विधानसभेत उमटले. आमदार अमित साटम यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. दिशा सालियानचा मृत्यू संशयास्पद आहे. दिशाच्या कुटुंबायांनी काल उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. महाविकास आघाडी काळात याप्रकरणी एसआयटीची स्थापना केली. मात्र, चौकशीचे निष्कर्ष पुढे आले नाहीत. या प्रकरणात एका मंत्र्यावर आरोप झालेत. या प्रकरणाची चौकशी करा, अशी मागणी त्यांनी केली. दिशा सालियान मृत्यू प्रकरणी विधानपरिषदेतही मुद्दा उपस्थित झाला. मनीषा कायंदे यांनी हा मुद्दा उपस्थित केला. तसेच या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली. दिशा सालियानवर बलात्कार करून तिचा खून झाला. तिच्या वडिलांना नजरकैदेत ठेवले. या प्रकरणी आदित्य ठाकरे, सूरज पांचोली, दिनो मोरियो यांच्यावर दिशाच्या वडिलांनी आरोप केलेत. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. या प्रकरणाची नव्याने चौकशी करावी, अशी मागणी प्रवीण दरेकर यांनी केली. तर या प्रकरणाची चौकशी कुठपर्यंत आली आहे, हे समोर यावे, असे चित्रा वाघ म्हणाल्या.

## दोन सख्ख्या भावांची निर्घृण हत्या



**नाशिक:** नाशिकच्या आंबेडकरवाडी येथे दोन सख्ख्या भावांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. दोघांवरही धारदार शस्त्राने हल्ला करत त्यांची हत्या करण्यात आली. प्रशांत जाधव, उमेश उर्फ मुन्ना जाधव अशी मृतांची नावे आहेत. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रंगपंचमीच्या रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने वार करत दोघा भावांचा सार्वजनिक शौचालयासमोर निर्घृण खून केला. मृत उमेश जाधव हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे शहर उपाध्यक्ष असल्याचे समोर आले आहे. दोघांची हत्या केल्यानंतर हल्लेखोर पसार झाले आहेत. हत्यचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. दुहेरी हत्याकांडामुळे परिसरात भीतीच वातावरण आहे. पोलिसांनी या खुनाच्या तपासाकरिता ४ टीम तयार केल्या आहेत.

## मनपा अन्य बिहार निवडणुकीसाठी राजकारण सुरू



### रोहित पवारांची भाजपवर टीका

**मुंबई:** दिशा सालियानच्या वडीलांनी सांगितले होते की या प्रकरणी राजकारण करु नका. पण आजपासून पुढे काही दिवस भाजपाकडून याचे वेगळ्या पद्धतीने राजकारण केले जाईल. कारण भाजप जेव्हा राजकारण करते तेव्हा त्याच्यामागे काहीतरी हेतू असतो, असे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

रोहित पवार म्हणाले की, जेव्हा बिहारची निवडणूक होती. तेव्हा सुशात सिंह ज्याने सुसाईड केले होते त्याचे बिहारच्या निवडणुकीत भाजपाकडून मोठ्या प्रमाणात राजकारण केले गेले. आजपासून भाजपवाले यावर बोलायला सुरुवात करतील आणि ४ महिन्यानंतर बिहारची निवडणूक आहे. भाजपला ४ वर्षांनंतर ह्या गोष्टी आठवत आहेत. रोहित पवार म्हणाले की, एखाद्या व्यक्तीने आत्महत्या केली असेल तर त्यांचे राजकारण भाजपकडून करण्यात येते. आता हा मुद्दा भाजप स्थानिक स्वराज्य संस्था आणि बिहार निवडणुकीसाठी बाहेर काढणार का हे पहावं लागेल. आदित्य ठाकरेंना मी जवळून ओळखतो पण त्यांचा या प्रकरणाशी संबंध नाही.

**न्याय मिळायला हवा**-रोहित पवार म्हणाले की, कोणत्याही व्यक्तीने महिलेसाठी न्याय मागण्याचा प्रयत्न केला असेल तर आमच्या सर्वांची इच्छा आहे की त्या व्यक्तीला न्याय मिळायला हवा. पण न्याय मिळत असताना त्यात खरे काय घडले हे लोकांना समजले पाहिजे. ४ वर्षांपूर्वी की, सुशांत सिंहचे सुसाईड झाले होते आणि दिशा सालियन यांच्यासोबत जी घटना घडली होती त्यावेळेस त्यांच्या आईवडिलांनी वेगळे वक्तव्य केले होते. आता ४ वर्षांनतर त्यांना न्याय मिळावा वाटत असेल म्हणून ते कोर्टात गेले असतील.

नाशिकमध्ये दोन एससी समाजाच्या भावांची हत्या झाली. त्यातील एक अजित पवार यांच्या गटाचा उपाध्यक्ष होता. राज्यात रोज हत्या होत आहे, महिलांवरील अत्याचाराचा घटना समोर येत आहे.

## औरंगजेबाच्या कबरीचे प्रकरण उलटल्यानेच दिशा सालियन प्रकरण काढले गेले

**संजय राऊतांचा दावा**

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २० :** औरंगजेबाची कबरीचे प्रकरण त्यांनी बाहेर काढले. मात्र तेच प्रकरण त्यांच्यावर उलटे शेकले गेले. त्यामुळे दिशा सालियन प्रकरण पुन्हा काही लोकांनी बाहेर काढले असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. औरंगजेब प्रकरणातून मुक्तता मिळवण्यासाठी दिशा सालियन प्रकरण शिजवले गेले असल्याचा आरोप त्यांनी केला. एखाद्या व्यक्तीच्या भविष्यावर असा चिखल उडवणे, ही महाराष्ट्राची संस्कृती नसल्याचे देखील राऊत यांनी म्हटले आहे. ठाकरे कुटुंबाला आणि संपूर्ण शिवसेना परिवाराला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. ते पुन्हा एकदा स्पष्ट दिसत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. औरंगजेब प्रकरण सरकारवर उलटले. औरंगजेबाला कबरीतून बाहेर काढून आमच्यावर सोडण्याचा प्रयत्न झाला. मात्र तो त्यांच्यावरच उलटला. त्यामुळे औरंगजेबापासून मुक्तता मिळवण्यासाठी हे प्रकरण गेल्या काही दिवसापासून शिजवले असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. यामागे कोणाची प्रेरणा आहे? कोणाची शक्ती आहे? आणि कोण पडद्यामागे हालचाली करत होते?



याची सर्व माहिती आमच्याकडे असल्याचा दावा देखील त्यांनी केला.

**त्या कबरीत तुम्हालाच जावे लागेल**

अशा प्रकारचे राजकारण तुम्ही करणार असाल तर ते तुम्हाला लखलाभ असो. ३०० साडेतीनशे ते ४०० वर्षानंतर कबरीतून बाहेर काढण्यासाठी ज्या कबरी तुम्ही खोदत आहात, त्या कबरीत तुम्हालाच जावे लागेल. एखाद्या तरुण नेत्याच्या करिअरवर आणि भविष्यावर अशा प्रकारे चिखल उडवणारी महाराष्ट्राची संस्कृती नाही. आमच्यासारख्या अनेक नेत्यांवर हे प्रयोग झाले आहेत. त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. तरी देखील तुमचे आयटी सेल आणि लीगल सेल काम करत आहेत. मात्र कोणत्या थरापर्यंत जायचे हे महाराष्ट्राच्या राजकारण्यांनी ठरवायला हवे. भारतीय जनता पक्षाचे राज्य आल्यापासून आणि भाजपमध्ये काही बाडगे गेल्यापासून तसेच एकनाथ शिंदे यांनी पक्ष फोडल्यापासून त्यांच्याकडे असलेले अस्वस्थ आत्म्यांच्या हाताला काहीही लागलेले नाही.

## तळेगावात अ‍ॅटलास कॉप्कोचा नवा प्लांट सुरू १४० कोटींची गुंतवणूक, २०० जणांना रोजगार

**पुणे :** अ‍ॅटलास कॉप्को ग्रुपने पुण्यातील तळेगाव येथे नवीन उत्पादन प्लांट सुरू करत १४० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून याद्वारे २०० जणांना रोजगार निर्माण झाला आहे. जवळपास २७०,०००, चौरस फूट जागेवर पसरलेला नवीन अत्याधुनिक प्लांट एअर व गॅस कॉम्प्रेसर्स आणि सिस्टिमसह सीएनजी (कॉम्प्रेस्ड नॅच्युरल गॅस), बायोगॅस, हायड्रोन कॉम्प्रेसर्स, एअर ड्रायर्स, एन व ओर जनरेटर्स आणि मेडिकल फिल्टर्स व अ‍ॅक्सेसरीजचा उत्पादन करेल. २०२३ मध्ये या प्रकल्पाबाबत घोषणा करण्यात आली होती, जे नाविन्यपूर्ण सोल्यूशन्स प्रगत करण्याप्रती, तसेच स्थानिक बाजारपेठेसाठी डिझाइन करण्यात आलेली उच्च दर्जाची उत्पादने वितरित करण्यात येणार आहे. हा उत्पादन प्लांट इंडस्ट्री ४.०. तत्त्वांवर निर्माण करण्यात आला आहे, ज्यामध्ये स्मार्ट उत्पादन तंत्रज्ञान व शाश्वततेचा समावेश आहे. प्लांट कार्यसंचालनांसाठी आवश्यक असलेल्या ऊर्जेपैकी जवळपास ८० टक्के ऊर्जा १.३. मेगावॅट रूफटॉप सोलार सिस्टम आणि ग्रिड पुरवठ्यामधून मिळवण्यात येईल. या प्लांटमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि प्रगत कूलिंग सिस्टिम्स देखील आहेत.

# सात वर्षांत शिक्षण विभागावर सर्वात निचांक खर्च!

**यावेळी फक्त १२.१५ टक्के खर्च**

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २० :** राज्य अर्थसंकल्पा पैकी सर्व साधारण शिक्षणावर मागील ७ वर्षात सरासरी १५.१२% निधी उपलब्ध झाला. होणाऱ्या खर्चाचा आलेख पाहता असे दिसते की, शासनाने सन २०१७-१८ मध्ये सर्वात जास्त १६.०१% इतका खर्च केला होता तर, सन २०२२-२३मध्ये तो खर्च सर्वात कमी १४.६६% इतका होता. सन २०२४-२५चे सुधारित अंदाज पाहता, राज्य अर्थसंकल्प पैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च १२.१५ टक्के इतका कमी होणार असे दिसत असून तो आत्ता पर्यंतचा सर्वात मोठा निचांक असेल, अशी गंभीर टिप्पणी 'समर्थन-अर्थसंकल्प अध्ययन केंद्रा'ने सर्वसाधारण शिक्षण विभागाबाबत केली आहे. सन २०१७-१८ते सन २०२३-२४या मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च हा ५७ हजार ८४ कोटी रुपये इतका झाला. त्यामुळे सन २०२५-२६चे अर्थसंकल्पीय अंदाज व वर्ष २०२४-२५मधील सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले जाऊनही या विभागाला मात्र त्यामानाने कमीच निधीची उपलब्धता होईल. असा अंदाज 'समर्थन अर्थसंकल्प अध्ययन केंद्रा'ने सोमवारी जाहीर केलेल्या स्वतःच्या सर्वेक्षण अहवालात व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे, सन २०२३-२४ मध्ये शिक्षण विभागातील एकूण




खर्चापैकी सर्वाधिक रक्कम ५६.१०% प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्यात आली. मात्र सन २०२४-२५च्या सुधारित खर्चाशी तुलना करता त्यात ०.२ % घट होऊन हा खर्च ५५, ९०% वर आला आहे. सन २०१७-१८ ते सन २०२३-२४या ७ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा सरासरी खर्च केवळ ५४.१८% राहिला आहे. गेल्या ७ वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी सर्वात कमी निधी सन २०२१-२२ मध्ये ५३.०२% उपलब्ध झाला तर सन २०२३-२४ मध्ये सगळ्यात जास्त ५६.१०% निधी खर्च झाला.

**राज्यातील प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांचे वास्तव**

**प्राथमिक शाळांची स्थिती**

एकूण १ लाख ४ हजार ४९९ प्राथमिक शाळांपैकी १० हजार ३९७ (९.९५ टक्के) शाळांमध्ये अद्याप पिण्याच्या पाण्याची सोय नाही.

११ हजार १८१ (१०.७ टक्के) शाळांना संरक्षक भिंत नाही.

४ हजार ३८८ (४.२ टक्के) प्राथमिक शाळांना मुलींकरिता कार्यरत शौचालय सुविः नाही.

२९ हजार ५० (२७.८ टक्के) प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना संगणक व्यवस्था पोहोचली नाही.

६ हजार १६५ (५.९ टक्के) शाळांना दिव्यांगांसाठी उतरत्या रस्त्यांची सुविधा नाही.

१३ हजार ५८४ (१३ टक्के) शाळांना खेळाचे मैदानच नाही.

७ हजार ४१९ (७.१० टक्के) शाळांना ग्रांथालये नाहीत.

५ हजार ८५१ (५.६ टक्के) शाळांना विद्युत जोडणी नाही.

माध्यमिक व उच्च शाळांची स्थिती

२८ हजार ९८६ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत.

१ हजार ३९१ (४.८ टक्के) माध्यमिक शाळांना संरक्षक भिंत नाही.

१ हजार ३९१ (४.८ टक्के) शाळांना खेळाचे मैदान नाही.

१ हजार ४३ (३.६ टक्के) शाळांना ग्रंथालये नाहीत.

१ हजार ४७८ (५.६ टक्के) शाळांना संगणक नाहीत.

३७७ (१.३ टक्के) शाळांना मुलींकरीता शौचालयाची सुविधा नाही.

२ हजार ५५० (८.८ टक्के) शाळांना दिव्यांगांसाठी उतरंड नाही.

सारखे तंत्रज्ञान जगात विकसित होत असताना शासनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक मिळून ४ हजार ८११ (१६.८ टक्के) शाळांमध्ये संगणक व इंटरनेटची प्राथमिक सुविधाही उपलब्ध नाही.

१ हजार ४७८ (५.१ टक्के) शाळांमध्ये संगणकाची सुविधा उपलब्ध नाही.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील ६३ लाख ७० हजार पटसंख्या होती त्यापैकी ५ लाख ३५ हजार ८० (८.४० टक्के) एवढी मुले शाळाबाह्य झालीत.

**एकूण शाळांपैकी मराठी शाळांचे प्रमाण**

सन २०२३-२४ राज्य मंडळाच्या १३ हजार २८२, सी. बी. एस. ई. च्या १ हजार १७८, राज्य मंडळ व सी.बी.एस.ई. च्या १६, आय.सी.एस.ई./ आय.जी.सी.ए.ई. किंवा आय.वी. व इतर मिळून ३७५ अशा एकूण १४ हजार ८५१ स्व-अर्थ सहाय्यता शाळा असून त्यापैकी मराठी माध्यमाच्या शाळा केवळ १ हजार ९५४ (१३.१५ टक्के) शाळा आहेत.

**रिक्त पदे**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या गट अ ते गट ड श्रेणीतील एकूण ८ हजार ११३ मंजूर पदांपैकी ३ हजार ६३३ (४४.७८ टक्के) पदे भरली आहेत तर ४ हजार ४८० (५५.२२%) पदे रिक्त आहेत.

३ हजार ६३३ पदांपैकी पुरुष कर्मचारी संख्या २ हजार ७१७ (७४,७९ टक्के) इतकी असून

स्त्री कर्मचाऱ्यांची संख्या केवळ ९१६ (२५.२१ टक्के) इतकी आहे.

भरलेल्या एकूण पदांपैकी ११५ दिव्यांग कर्मचारी आहेत.

# कल्याण-डोंबिवलीतील६५ इमारतींच्या रहिवाशांना बेघर होऊ देणार नाही:आमदार रविंद्र चव्हाण यांची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २० :** कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील६५ इमारतींसंदर्भात सुरू असलेल्या वादावर सकारात्मक तोडगा काढला जाईल आणि या इमारतींतील एकाही रहिवाशाला बेघर होऊ दिले जाणार नाही, अशी ठाम भूमिका भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष आणि आमदार रविंद्र चव्हाण यांनी घेतली आहे. या महत्त्वाच्या प्रश्नावर आज मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.



यामध्ये आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त तसेच ठाणे, रायगड, पालघर आणि मुंबई जिल्हाधिकाऱ्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग घेतला. या बैठकीत रविंद्र चव्हाण यांनी स्पष्ट सांगितले की, या ६५ इमारतीमधील रहिवाशांची घरे ही त्यांची हक्काची घरे आहेत. कुणी कर्ज काढून तर कुणी आयुष्याची पुंजी खर्च करून ही घरे घेतली आहेत. त्यामुळे या हजारो रहिवाश्यांच्या डोक्यावरचे छप्पर कायम राहिले पाहिजे. उल्हासनगरमध्ये यासारख्याच प्रकरणावर सरकारने सकारात्मक तोडगा काढला होता, त्याच धर्तीवर या प्रकरणावरही निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या प्रश्नाच्या गांभीर्याची दखल घेतली असून, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली चारही संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक येत्या चार दिवसांत घेण्यात येईल, असे आश्वासन दिले.

यावेळी संबंधित विभागांनी सविस्तर अहवाल सादर करून प्रस्ताव तयार करावा आणि तो मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात येईल, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे हजारो रहिवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## (एस.सी. प्रवर्गातील) अनुसूचित जाती उमेदवारांसाठी १८ दिवसीय निवासी प्रशिक्षण

**अकोला** : येथे महाराष्ट्र उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई पुरुस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र अकोला द्वारा आयोजित आणि महाराष्ट्र उद्योजक, व्यापार व गुंतवणूक सुलभता कक्ष मुंबई यांच्या सहकार्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत अनुसूचित जाती करिता नि:शुल्क (मोफत) १८ दिवस निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजन कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूर बडनेरा अमरावती येथे करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा कालावधी २४/०३/२०२५ ते १०/०४/२०२५ पर्यत राहणार आहे सदर प्रशिक्षणात भाग घेण्या करिता किमान ८ पास, टी सी., जातीचे प्रमाणपत्र, आधार कार्ड वयोमर्यादा १८ ते ४८ असावी तसेच अमरावती येथे निवासी राहण्याची तयारी असावी हि पात्रता असलेल्या प्रशिक्षणार्थीनी या प्रशिक्षण कार्यक्रमात अर्ज करावे.या प्रशिक्षण कार्यक्रमात उद्योजकीय व्याक्तीमत्व विकास, उद्योजकीय गुणसंपदा सुसंवाद कला, शासकीय योजनेची माहिती, बँकेची कार्यप्रणाली, प्रकल्प अहवाल, मार्केटिंग उद्योग करताना ज्या अडचणी येतात त्या सोडवाव्या कश्या, उद्योग व्यवस्थापन, विक्रीकला, व व्यवसायाला लागणारी माहिती या विषयी प्रशिक्षण तज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.सदर कार्यक्रमासाठी अर्ज करण्यासाठी कु. कल्याणी तिजारे मो.नं. ९८२२३९१३३७ महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र जिल्हा कार्यालय जिल्हा उद्योग केंद्र, चांडक बिछायत केंद्राच्या बाजूला दुर्गा चौक अकोला यांच्याकडे दिनांक २१/०३/२०२५ दुपारी ०३.०० वाजे पर्यंत आपल्या प्रवेशाची नोंदणी करावी अधिक माहिती करीता श्री प्रसन्न रत्नपारखी प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, अकोला यांच्याशी संपर्क साधावा असे श्री. संतोष बनसोड महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, अकोला व श्री किशोर अंभोरे विभागीय अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र अमरावती यांनी एका पत्रकाद्वारे सांगितले.

## शाश्वत ग्रामविकासासाठी ग्रामीण महिलांनी कृषि प्रक्रिया उद्योगाकडे वळावे : डॉ. राजेंद्र गाडे




### आदिवासी शेतकऱ्यांसाठी तृणधान्य प्रक्रिया प्रशिक्षण!

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** अलीकडे सर्वच क्षेत्रात स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले असून सुखकर आयुष्य जगण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन कृषी महाविद्यालय अकोलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र गाडे यांनी केले. आदिवासी शेतकऱ्यांसाठी तृणधान्य प्रक्रियेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने एक दिवसीय प्रशिक्षण व अभ्यास भेट कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता, तृणधान्य प्रक्रिया केंद्र आणि आदिवासी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मिलेट प्रोसेसिंग केंद्रात आयोजित या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित प्रशिक्षणार्थींना ते संबोधित करत होते. शेतकरी वर्षभर राबराब राबून अतिशय मेहनतीने शेतमाल निर्माण करत असतो मात्र कच्चा माल हा प्रक्रिया न करताच शहरात विकल्या जात असल्याने त्याला अपेक्षित उत्पन्न होत नाही. म्हणून काळाची गरज ओळखत शाश्वत ग्रामविकासासाठी आता महिलांनी पुढाकार घेऊन प्रक्रिया उद्योगांचे जाळे गावोगावी विणंत कच्च्या मालावर गावातच प्रक्रिया होऊन पक्का माल शहरांमध्ये विक्रीसाठी येईल असा निर्धार करावा असे भावनात्मक आवाहन देखील डॉ. गाडे यांनी याप्रसंगी पुढे बोलताना केले.या प्रशिक्षणात जवळपास ४० आदिवासी शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. शिबिरात तृणधान्य प्रक्रियेची तंत्रज्ञान, बेकरी उत्पादन निर्मिती व विक्रीसंदर्भातील माहिती देण्यात आली. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या आदिवासी विभागाचे अधिकारी खरात व कृषी अभियांत्रिकी सोसायटीचे प्रतिनिधी लुळे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मिलेट प्रोसेसिंग केंद्राचे प्रमुख डॉ. संतोष दिवेकर, डॉ. विवेक खांबलकर आणि माधुरी गजबे यांनी शेतकऱ्यांना प्रात्यक्षिके व सखोल माहिती दिली.

## अकोल्यात कायदा व सुव्यवस्थेची ऐशीतैशी...

### पत्रकार विठ्ठल महल्ले यांच्यावर प्राणघातक हल्ला...

#### दारूपिऊन रस्त्यात रिल बनविणाऱ्यांचा हैदोस...

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** अकोला शहरात पोलिसांचा गुन्हेगारांवर अजिबात वचक राहिला नसून सर्वत्र गुन्हेगारीचा हैदोस सुरू आहे. बुधवारी रात्री पत्रकार विठ्ठल महल्ले यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला असून भर रस्त्यात बसून रील बनवणाऱ्यांनी हा प्रकार केल्याचे समोर आले आहे.



शहरात पोलिसांचा वचक न राहिल्याने रस्त्याच्या मधोमध गाड्या उभे करून केक कापणे, रिल्स बनविणे असे प्रकार सर्वत्र सर्रास बघायला मिळतात. पत्रकार विठ्ठल महल्ले रात्री आपली ड्युटी आटोपून घरी जात असताना रात्री अकरा वाजताच्या सुमारास खडकी परिसरातील डम्पिंग ग्राउंड नजीकच्या रस्त्यावर तीन युवक दारू पिऊन रील बनवत होते. जायला रस्ता तरी सोडा असे म्हटल्यावरून या बदमाश्यांनी महल्ले यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. महल्ले यांच्या जवळीलच हेल्मेट हिसकावून घेत त्या हेल्मेटने त्यांच्या डोक्यावर वार करण्यात आले. तिघांचा मुकाबला करत महल्ले यांनी कसेबसे आपले प्राण वाचवले. पोलिसांना फ़ोन केल्यानंतर आरोपी पळून गेल्यानंतर घटनास्थळावर पोलीस दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत याप्रकरणी आरोपी अटक करण्यात पोलिसांना यश आले नव्हते. रेल्वे स्टेशन वरून महिलेच्या गळ्यातून मंगळसूत्र चोरून नेताना चोरट्याचा पाठलाग करताना पतीला ठेचून मारणाऱ्या चोरट्याचे प्रकरण ताजे असताना शहरात अशा हाणामारीच्या अनेक घटना घडत असल्याने अकोला पोलिसांचा गुन्हेगारांवर अजिबात वचक राहिला नसल्याचे यावरून दिसत आहे. पोलीस केवळ हप्ते वसुलीत दंग असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून पोलिसांकडून होणारी पेट्रोलिंग ही नावापुरती होत असल्याचे एकंदरीत चित्र आहे. पत्रकार विठ्ठल महल्ले यांच्यावरील हल्लेखोरांना ताबडतोब अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. हल्लेखोरांना अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आला आहे.

## वाईन बार व बिअर बार चा बंद जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** शासनाकडून परमिट रूम मधील मद्य विक्रीवर १० टक्के व्हॅट टॅक्स मध्ये वाढ व २०२५ - २६ नूतनीकरण फी मध्ये १५ टक्के वाढ केल्यामुळे दोन्ही निर्णया मुळे अनुज्ञप्ती धारक यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. हे अवाजवी अन्यायकारक टॅक्स व फ़ी वाढ रद्द व्हावी, यासाठी अकोला जिल्हा वाईन बार व बिअर बार असोसिएशन, फेडरेशन ऑफ हॉटेल असोसिएशन, महाराष्ट्र यांनी गुरुवार २० मार्च २०२५ रोजी निषेध करीता बंद पुकारला आहे. या विषयीचे एक निवेदन आज जिल्हाधिकारी अजित कुंभार यांना देण्यातआले.यावेळी अध्यक्ष अतुल पवनीकर, सिमांत तायडे, श्रीकांत देशमुख, संतोष अग्रवाल, राजेश सहगल, गजानन तायडे, बबलु रघुवंशी, दिलीप म्हसने, मनिष लुल्ला, राजेश गोसावी, भूषण इंगळे, अविभुषण रामीधामी, प्रविण चोपडे,



पुरुषोत्तम मांगटे पाटील यांच्यासह आदी सदस्यांची उपस्थिती होती.

अवाजवी फी वाढ, १० टक्के व्हॅट टॅक्सला निषेध करीता २० मार्चला पूर्ण दिवस परमिट रूम बंद ठेवण्याचा निर्णयाला अकोला जिल्यातील बहुतांशी परमिट रूम धारकांनी असोसिएशनला होकार कळविला आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्राचे कर्मजारी आज संपावर

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** एआयबीइएच्या सदस्यांनी २० मार्च रोजी एक दिवसाचा संप पुकारला. बँक ऑफ महाराष्ट्र मधील कर्मचारी त्यात सहभागी झाले होते. क्षेत्रीय कार्यालय समोर कर्मचा-यांनी निदर्शने केली. सर्वस्तरातील कर्मचारी भरतीसाठी संप आहे. बँकेने २०२१ मधे सफाई कर्मचारी हे पदच रद्द केले. हे काम आऊटसोर्स केले. त्यांना किमान वेतन देखील दिले जात नाही. कायम स्वरुपी कामगारांचे फायदे जसे की रजा, मेडिकल, सुट्ट्या कांहीच मि ळत नाही. या पदावर अनेक वर्षांपासून तात्पुरत्या पदावर काम करणारे हजारो कर्मचारी यामुळे रस्त्यावर आले आहेत. बँकेत ७०० शाखेतून नियमित शिपाई नेम ण्यात आलेले नाहीत. बँकेत ३१८ शाखा आहेत जेथे एकही कार्क नेमण्यात आला



नाही. १२९० शाखा आहेत जेथे केवळ एक कार्क आहे. जो कॅश मध्ये काम करतो. यामुळे कर्मचाऱ्यांना वेळ संपली तरी जास्त बसून काम पूर्ण करून जावे लागते. सुट्टीच्या दिवशी कामावर यावे वेळ लागते. आजारपण असो की सांसारिक जबाबदाऱ्या यासाठी आवश्यकतेनुसार राजा मिळत नाही. काम आणि वैयक्तिक आयुष्य यातील समतोल बिघडला आहे. कर्मचारी सतत ताण-तणावात काम करत आहेत. त्यामुळे सतत आजारी पडत आहेत. याचा ग्राहक सेवेवर विपरीत परिणाम होत आहे. बँकेने त्वरित सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांची पुरेशी भरती करावी. महा बँकेतील कर्मचाऱ्यांनी झोनल ऑफिस समोर सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० पर्यंत धरणे दिले. धरली व सायंकाळी पाच वाजता इतर बँकेतील कर्मचा-यांच्या सहभागातून निदर्शने केली.

## थोडक्यात

### आज ओशो संबोधी दिवसावर विविध कार्यक्रम



**अकोला** : महानगरात ओशो संबोधी दिनावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.आज गुरुवार दि २१मार्च रोजी साय ६ वाजता दाबकी रोड परिसरातील नाना मंगलम समीप जवळील विश्वकर्मा भवन येथे आयोजित या ओशो संबोधी दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ कवी घनश्याम अग्रवाल,वरिष्ठ ओशो सन्यासी स्वामी आनंद घन,गायक स्वामी बाल भारती आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात सर्वासाठी मोफत ध्यान शिविर, टैलेंट शो,गीत,संगीत , हास्य , कविता आदी साकार करण्यात येणार आहे. या ओशो संबोधी दिन उत्सवाचा सर्व नागरीकानी लाभ घेण्याचे आवाहन स्वामी महाबोध,स्वामी आनंद निर्जन,स्वामी बोध प्रमोद,स्वामी आफताब, स्वामी प्रेम बसंत आदींनी केले.

### क्षमतेपेक्षा जास्त मुरुम नेला खोदून !

**वाडेगांव** : येथील ग्रामपंचायतसदस्य मो. सलीम शे.राहुल्ला यांच्या शेतातील मुरूम वाडेगावातील विकासकामासाठी रीतसर परवानगी काढून ग्रामपंचायत प्रशासनास गेल्या दोन वर्षांपूर्वी दिला होता त्याचे बिल त्यांना आजपर्यंत ग्रामपंचायत प्रशासनाने दिले नसल्याने त्यांनी बाळापूर गट विकास अधिकारी यांचेकडे तक्रार केली असून परवान्या पेक्षा जास्त मुरूम नेल्याची बाब तक्रारीत करण्यात आली असून त्यांचे बिल ग्रामपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर देण्यात यावे व क्षमतेपेक्षा जास्त मुरूम खोदून नेला त्याची रीतसर चौकशी करून कारवाई करावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल असे सलीम भाई यांनी सांगितले.

## निराधार योजना व श्रावणबाळ योजना अर्जदारांसाठी मुर्तिजापुर तहसिल कार्यालयात विविध सुविधा

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** मुर्तिजापुर तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थींची डीबीटी पोर्टलवरील नोंदणी व मान्यता प्रदान करण्याचे कार्यवाही नियमानुसार सुरू आहे. या तालुक्यात एकुण ८३.१५ टक्के लाभार्थी यांनी नोंदणी प्रक्रिया पुर्ण झाली असुन त्यापैकी ६३.०७ टक्के मान्यता प्रदान केली आहे, असे मुर्तिजापूर तहसिलदारांनी कळविले आहे.

खाजगी युट्यूब वाहिनीच्या माध्यमातून या प्रक्रियेबाबत चुकीचे वृत्त प्रसारित झाले असून त्याचे खंडन करण्यात आले आहे. प्रत्येक महसुली गावात मंडळ अधिकारी, तलाठी महसुल सेवक व संबंधित सीएससी संचालकांचे मदतीने नोंदणी व मान्यतेचे काम सुरु आहे. शहरी भागाकरीता मुर्तिजापुर तहसिल कार्यालय येथे या बाबतची कार्यवाही सुरु आहे. ज्या लाभार्थ्यांचे बँक खात्याला आधार जोडणी तसेच आधार अद्ययावत नसल्याचे किंवा आधार कार्डला मोबाईल क्रमांक जोडला गेला नसल्याचे आढळून आले आहे. त्यांचे आधारकार्ड अपडेट नसल्याने अडचणी येत आहेत. त्यामुळे संजय गांधी विभागातच आधार दुरुस्ती करीता आधार केंद्र ची स्थापना केली आहे.

या कामाकरीता लाभार्थी यांची होणारी गर्दी लक्षात घेता लाभार्थी यांना उन्हापासून संरक्षणासाठी ग्रीन नेट, पिण्याचे पाणी यांची व्यवस्था केली आहे. तसेच या ठिकाणी होणारी गर्दी लक्षात घेता नागरिकांना टोकनची व्यवस्था केली आहे. तसेच नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था ही अभ्यागत कक्षामध्ये सुध्दा केली आहे. दिव्यांग लाभार्थी यांना मदतीसाठी व्हीलचेयर व स्वयंसेवक म्हणून शिपाई देखील नियुक्त केला आहे. तसेच योजनेतील लाभार्थी यांना त्यांची नोंदणी झाली किंवा नाही याची पडताळणी त्यांचे महसुली गावातील तलाठी यांच्या माध्यमातुन करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे.

### शासकीय व्यवहारासाठी ३१ मार्चला कोषागारे सुरू

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** शासनाचे सर्व जमा व खर्चाचे आर्थिक व्यवहार सुरळीत व पूर्ण होण्यासाठी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील शेवटच्या दिवशी दि. ३१ मार्च रोजी कोषागारे, उपकोषागारे, बँक सुरू ठेवण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार भारतीय स्टेट बँक दि. ३१ मार्च रोजी रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्यात यावी, असा आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज निर्गमित केला.

## न्यू तापाडिया नगर उड्डाणपूल तात्पुरत्या रस्त्याच्या देखभालीची मागणी

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** न्यू तपाडिया नगर येथील गेट क्रमांक ३८ जवळ उड्डाणपुलाचे बांधकाम सुरूआहे. या ठिकाणी दुचाकी वाहनांसाठी तात्पुरत्या रस्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, सद्यस्थितीत या रस्त्याची अवस्था खराब झाल्याने आणि पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तो अधिक धोकादायक ठरू शकतो. यासाठी तातडीने देखभाल आणि दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी निलेश देव यांनी मध्य रेल्वेच्या मुख्य अभियंता शाखेकडे केली आहे.निलेश देव यांनी ११ मार्च २०२५ रोजी मध्य रेल्वेचे उपमुख्य अभियंता गौरव शर्मा यांना पत्र दिले. यात त्यांनी नमूद केले की, सद्यस्थितीत तात्पुरत्या रस्त्यावरून दुचाकी वाहनांनी प्रवास करणे कठीण होत आहे. तसेच, उड्डाणपुलाच्या पिलरचे काम सुरूअसल्याने रस्त्यावर अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, पावसाळ्यापूर्वी या रस्त्याला बिटुमिनसचा थर देऊन मजबुतीकरण करण्याची गरज आहे. निलेश देव यांनी मध्य रेल्वेचे उपमुख्य अभियंता (बांधकाम) संदीप सिन्हा यांनाही पत्र पाठवले.

## रेल्वे ट्रॅकवर अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला, परिसरात खळबळ

**■मुर्तिजापुर,दि २० (प्रतिनिधी):** रेल्वे जंक्शन परिसरातील काटेपूर्णा ते सांजा पूर रेल्वे ट्रॅकवर २० मार्च रोजी पहाटे ३०-३५ वर्षीय अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला.यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच रेल्वे सुरक्षा बल, बोरगाव मंजू पोलीस आणि मुर्तीजापुर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस उपनिरीक्षक मनोज उघडे , पो.कॉ.सुदीप राऊत यांनी घटनास्थळी मृतदेहाचा पंचनामा केला असता. मृतदेहाच्या हातावर 'आई' आणि 'आकाश' असे गोंदलेले असून, शव उत्तरीय तपासणीसाठी वीर भगतसिंग आपातकालीन पथकाचे विजय माल्टे, उमेश माल्टे,शेख नजीर यांच्या सहकार्याने अकोला शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. पुढील तपास



बोरगाव मंजू पोलीस करीत आहेत.तसेच पोलिसांनी ओळखीसाठी आवाहन केले आहे.

## 'नवतेजस्विनी' प्रदर्शनाचा आज शुभारंभ

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त महिला व बाल विकास विभागाच्या सहकार्याने 'नवतेजस्विनी' प्रदर्शन उद्यापासून (२१ मार्च) नव्या बसस्थानकासमोरील स्वराजभवन परिसरात सुरू होईल. ग्रामीण महिलाभगिनींनी निर्माण केलेली अनेक उत्तमोत्तम उत्पादने या प्रदर्शनाद्वारे अकोलेकरांना उपलब्ध होणार आहेत.

जिल्ह्यातील सुमारे १०० बचत गटांचा प्रदर्शनात सहभाग असून, एकूण ५० दालनांद्वारे रसायनविरहित, भेसळविरहित खाद्यपदार्थ, शोभिवंत वस्तू, दैनंदिन वापरासाठी उपयुक्त वस्तू अशा अनेक बाबी उपलब्ध होणार आहेत. हे प्रदर्शन दि. २३ मार्चपर्यंत रोज सकाळी १० ते रात्री १० वा. दरम्यान सर्वांसाठी खुले आहे. या तीन दिवसांत बचत गटांच्या उत्पादन विक्रीतून १५ लाखांहून अधिक उलाढाल अपेक्षित आहे. ग्राहकांना महिला बचत गटांनी तयार केलेली उत्कृष्ट उत्पादने मिळतील. रासायनिक रंग विरहित, कुठल्याच प्रकारच भेसळ नसलेले, स्वादिष्ट आणि आकर्षक उत्पादने ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत. या उत्पादनामध्ये मायक्रोम च्या शोभिवंत वस्तु ,बांबूचे टोपले, वारली पेंटिंग, गोडंबी ,लोकरीच्या च्या शोभिवंत वस्तू, घरातील, देव्हाऱ्यातील शोभिवंत वस्तू, ज्वेलरी, मातीपासून बनविलेल्या वस्तू, झाडू, फडा, तसेच खाण्याचे स्वादिष्ट पदार्थ, आवळा पदार्थ, रेडीमेड ढोकळा पीठ, नाना प्रकारचे सुगंधी मसाले, सर्व प्रकारचे लोणचे, विविध प्रकारचे पापड व पापड मसाले, गोडंबी ,पॉपकॉर्न. केळीपासून बनविलेले चिप्स, सर्व प्रकारचे तृणधान्य/कडधान्य, सर्व प्रकारच्या डाळी आदी उपलब्ध राहील.त्याचप्रमाणे, विशेष दालनांद्वारे जेवणाबरोबरच खीर, मांडे, रोडगे, आवळा पुरणपोळी, बिट्टया, झुणका भाकर अशा मराठमोळ्या पदार्थांची रेलचेल राहणार आहे.

महिलांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन व विपणनाचे ज्ञान मिळावे या हेतूने तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तसेच खरेदीदार- विक्रेता बैठकही यादरम्यान घेण्यात येणार आहे. सामाजिक जाणीव जागृती होण्याच्या हेतूने प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम होतील. नवतेजस्विनी विक्री प्रदर्शनाला अवश्य भेट देऊन बचत गटाच्या स्टॉलधारक महिलांचा उत्साह द्विगुणित करावा, असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी केले आहे.

## 'डाऊन सिंड्रोम' आजाराबाबत आरोग्य विभागाद्वारे जनजागृती

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** एखाद्या व्यक्तीमध्ये अतिरिक्त गुणसूत्र असल्यास अशा वैद्यकीय स्थितीला डाऊन सिंड्रोम म्हणतात. या आजाराबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी दरवर्षी २१ मार्च रोजी डाऊन सिंड्रोम दिवस पाळला जातो. यंदा या दिवसाची थीम 'विथ अस नॉट फॉर अस' अशी आहे.

**लक्षणे** : लहान डोके, चपटा चेहरा, लहान मान, बाहेर पडणारी जीभ, पॅल्पेब्रल फिशर – वरच्या दिशेने तिरपे डोळ्यांचे झाकण, जन्मजात हृदयाचे दोष,आतड्यांसंबंधी अडथळा, हाडांच्या वस्तुमानात घट झाल्या मुळे फ्रॅक्चरचा धोका वाढतो. व्हिटॅमिन डीची कमतरता, वाढ मंदता, कमी उंची, रुंद, लहान हात, लहान बोटे आणि लहान हात आणि पाय,स्लीप एपनिया (श्वासोच्छ्वासाचे समस्या), श्रवण कमी होणे आणि कानाचे संक्रमण अशी या आजाराची लक्षणे आहेत.

अशा व्यक्तीला विकासाशी संबंधित समस्या, काही प्रमाणात बौद्धिक विकासाची समस्या, बोलण्यात आणि भाषा समजण्यात काही अडचणी, तसेच सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यात काही अडचणी येतात.

**डाऊन सिंड्रोम कशामुळे होतो?**

मुलाला त्याच्या पालकांकडून ४६ गुणसूत्रांच्या रूपात अनुवांशिक सामग्री मिळते. बहुतेक २३ वडिलांकडून आणि २३ आईकडून याप्रमाणे मिळतात.काही प्रकरणांमध्ये अतिरिक्त गुणसूत्र येऊन दुसऱ्या गुणसूत्राशी जोडले जाते. या अतिरिक्त अनुवांशिक सामग्रीमुळे डाऊन सिंड्रोम व्यक्तींमध्ये विशिष्ट शारीरिक वैशिष्ट्ये आणि विकासात्मक अपंगत्व निर्माण होते. जर अतिरिक्त गुणसूत्र स्वतःहून किंवा दुसऱ्या गुणसूत्राशी जोडलेले असेल तर वैशिष्ट्ये समान असतात.

डाऊन सिंड्रोमचे जोखीम घटक

मातृ वय वाढवणे: ३५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रियांना डाऊन सिंड्रोम असलेल्या मुलाला जन्म देण्याचा धोका जास्त असतो.

डाऊन सिंड्रोम अनुवांशिक लिप्यंतरणाचा वाहक असणे : वडील आणि आई दोघेही त्यांच्या मुलांना डाऊन सिंड्रोमचे अनुवांशिक लिप्यंतरण देऊ शकतात. डाऊन सिंड्रोम असलेल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये ही सर्व लक्षणे नसतात. काहीजण पूर्णपणे निरोगी असू शकतात. डाऊन सिंड्रोम असलेल्या व्यक्ती सामान्य आयुष्य जगू शकतात, शिकू शकतात आणि काम करू शकतात.जर कोणत्याही व्यक्तीच्या बाळाला किंवा कुणालाही डाऊन सिंड्रोमची लक्षणे दिसल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा,असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केले आहे.

# अखेर तन्मय, चिन्मय स्टडीत!

# इळ्या, बाळ्या कस्टडीत!!





नागपूरमध्ये दंगल उसळली आणि राज्यकर्त्यांचा हेतू सफल झाला. त्यांना ज्या विषयावर जनमत आपल्या बाजूला वळू शकते, त्या विषयाला खतपाणी घालून त्यांचे मिशन यशस्वी झाले. पण देशातील तरुणांच्या आयुष्याची माती होते त्याचे कथित हिंदुत्ववाद्यांना काय घेणे घेणे? धर्म रक्षण करणे म्हणजे ज्याच्याजवळ देशाचा उद्योग, पैसा, देशाचा व्यापार, देशाचं राजकारण, सत्ता आहे त्याच काम आहे. आपल्याजवळ साधी उपजिविकेची नोकरी नाही. प्रत्येक गोष्टीत हाल आणि दरिद्री त्रास आहे. म्हणून एव्हढ मोठ काम आपलं नाही. आजपर्यंत जेंव्हा जेंव्हा एका विशिष्ट विचाराने हिंदू-मुस्लिम दंगली घडवल्या, त्यावेळी हिंदू समाजाच्या वतीने नेहमी मराठा तसेच बहुजन समाजातील तरुणांनी अधिक सहभाग घेऊन आपले आयुष्य बरबाद केले आहे. सध्या औरंगजेबाच्या कबरीवरून वाद पेटवणाऱ्या बजरंग दल, विश्वहिंदू परीषद व पतित पावन संघ या तिन्ही संघटना व नारायण राणे यांचे मंत्री असलेले पुत्र व कट्टर (?) नवहिंदुत्ववादी चिरंजीव नितेश राणे यांनी केलेल्या उद्योगात नेमके होरपळले कोण? या संघटनांनी व राणे पूत्राने राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल बदनामीकारक वक्तव्ये करणाऱ्यां विरोधात कधीच तोंड उघडलेले नाही किंवा निषेधही केलेला नाही. उलट या संघटना व त्यांच्या विचारांच्या लोकांनी कुणाच्या अस्मितेवर सतत चिखलफेक केलेली आहे? सध्या छत्रपती शिवराय व संभाजी महाराजांचे शौर्य व कामगिरीचे प्रतीक असणाऱ्या इतिहासाला कांहीतरी निमित्त काढून व त्याला हिंदू मुस्लिम रंग देऊन हा शौयार्चा इतिहास मिटवण्याचा नियोजित प्रयत्न होत आहे. या वादात व आंदोलनात महाराष्ट्रातील मराठा व बहुजन समाजातील युवक व नागरिकांनी स्वतःला दूर ठेवले पाहीजे होते. कारण दंगलीत पोलीस धरपकड करतात. त्यानंतरच्या नरक यातनांना पारावर नसतो. घरातील निष्पाप आई-वडील, भाऊ-बहीण यांना प्रचंड आर्थिक, शारीरिक तसेच मानसिक त्रास होतो. संपूर्ण लाईफ बरबाद होते. जे तुम्हाला भडकावून दंगलीत लोटतात, ते नंतर तुम्हाला मदत करायला तयार नसतात. तुमची साधी ओळखही दाखवत नाहीत. राज्य सरकारकडे प्रचंड बहुमत आहे, केंद्रातही सरकार आहे. मग औरंगजेबाच्या कबरीबाबत काय करायचे, हे सरकारनेच ठरवावे ? सत्ताधारी नेतेच चिथावणीखोर वक्तव्य करून धर्मा-धर्मामध्ये तेढ निर्माण करून महाराष्ट्रात तणाव वाढवत आहेत. अर्थात नागपूरची घटना हा मस्साजोग, मुंडे, वाल्मिकअण्णा प्रकरणाला दुसरीकडे वळविण्याचा प्रकार असल्याची महाराष्ट्रात चर्चा होत आहे व ते सरकारच्या दृष्टिकोनातून योग्य नाही. सरकारी हिंदुत्ववाद्यांचे आहे असे गृहीत धरले, तरी मागे एकदा सावरकरांचा तथाकथित अपमान झाला म्हणून सावरकर गौरव यात्रा काढणारे देवेंद्र फडणवीस आता कोण तो 'चिल्लर' कोरटकर याने छ. शिवाजी महाराजांचा अपमान केला म्हणून शिवाजी महाराजांची गौरव यात्रा काढणार का? दंगलीत सहभागी असणाऱ्या तरुणांचे विचार परिवर्तन तरी कसे करावे? त्यांना हे काय माहित की जर आज औरंगजेब जिवंत असता तर तो देखील आज भाजपमध्ये जाऊन पोहोचला असता. या तरूणांना 'स्टडी' आणि 'कस्टडी' यातील फरक कळायला सुरुवात होईल, तोपर्यंत वेळ गेलेली असेल!




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

धर्मरक्षण वगैरे भूत डोक्यात घुसलेल्या तरुणांनी सावध झाले पाहीजे. कुठल्याही विध्वंसक कृत्यात सहभागी झाल्यास काय होते? या प्रश्नांचा त्यांनी कधी विचार केला का? दंगलीत सहभागी झाल्यावर फौजदारी गुन्हा दाखल होतो, अटक होते, अटकेत गेल्यावर पोलिसांकडून 'सत्कार' होतो, अपुऱ्या जागेत, अस्वच्छ ठिकाणी राहावे, खावे व झोपावे लागते. ज्यांनी उचकून दिलं ते फरार असल्याने तुमच्या आई बापाला तुमच्या जामीनाची व्यवस्था करावी लागते. त्यासाठी डाग मोडून पैसे उभे करावे लागतात.

जामीन झाला की ठरलेल्या दिवशी हजेरी सुरू होते. सरकारी केसमध्ये नाव आलं की सरकारी नोकरीतून बाद केले जाते. खाजगी नोकरीत पोलीस रेकॉर्ड काढलं की कुणी दारातही उभं करत नाहीत. व्यवसाय करायला कर्ज काढायला गेलात तरी बँका तीच भूमिका घेतात. मग रोजंदारी एवढंच उरतं. पोलीस ठाण्यात हजेरी लावायला गेला की दिवस गेलाच वाया.

कुठल्याही सणवार, निवडणूक काळात आधी त्यांनाच उचलून चार आठ दिवस आत टाकतात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून. हे सुरू असताना कोर्टाच्या तारखा आणि केस चालूच असते. त्यालाही पैसे लागतात. एवढं सगळं झाल्यावर ना पैसे, ना बचत, ना मालमत्ता, ना लग्न, ना संसार. थोडक्यात एका चुकीने तुमच्या आयुष्याचे बारा वाजतात. सबब, अभ्यास करा, शिक्षण घ्या, चांगला रोजगार बघा, चार पैसे कमवा आणि आईबापांची, लेकरांची काळजी घेऊन सुखी राहा. तुम्हाला धर्मरक्षण करायला सांगणाऱ्या नेत्यांची पोर या भानगडीत पडत नाहीत म्हणूनच ते तुम्हाला उचकून देतात. 'हिंदू -मुस्लीम' नावाचा अंमल चढला की भ्रमिष्ट विचार सुरू होतात. हे भ्रमिष्ट विचार म्हणजे 'मुस्लिम हे या देशाचे शत्रू आहेत', 'हिंदूंवर अन्याय मुसलमानांनीच केला', 'मुसलमानांमुळे या देशाचे तुकडे झाले', 'मुसलमान लव्ह जिहाद करतात', 'मुसलमान हे आपल्या प्रगतीमध्ये अडसर आहेत', 'मुसलमान हे दहा-बारा मुलांना जन्माला घालतात. कारण त्यांना लोकसंख्या वाढवून देश ताब्यात घ्यायचा आहे', 'गांधी- नेहरू यांचे पूर्वज मुस्लिम होते', वगैरे वगैरे. या भ्रमिष्ट विचारांची उधळण होते.

मग त्यांच्या दुकानात जायचे बंद करा असे कुणीतरी ओरडतो. शाकाहार श्रेष्ठ असे म्हणू लागतात आणि आपला धर्म श्रेष्ठ म्हणत पळत सुटतात ! खराखुरा घडलेला इतिहास न सांगता उलटा इतिहास सांगत ते सगळीकडे अफवा पसरवत असतात.

मोबाईल हातात घेतला की आजूबाजूला काय चालले आहे याचाच विसर पडतो. हा देश हिंदुत्ववाद्यांचा आहे आणि तेच तेवढे देशभक्त आहेत असे भ्रमिष्ट विचार जिकडे तिकडे ते नाचवत फिरवले जातात. जो हिंदूत्व मानत नाही ते सगळे देशद्रोही असेही डोके फिरल्यासारखे ते बडबडत असतात.

भारताच्या निर्मितीपासून आज अखेर भारताने जो प्रवास केला तो हिंदुत्वावर केला का? या देशाच्या प्रगतीसाठी सर्व धमार्चे लोक कंबर कसून उभे होते आणि त्यांनी स्वतःची आयुष्यं झोकून दिलेली आहेत. हे यापैकी कुणालाच दिसत नाही? हातात त्रिशूल घेऊन या देशाची देशभक्ती दाखवायची नसते, तर विज्ञानात अफाट प्रगती करून देशाला सर्वोच्च स्थानावर नेऊन दाखवायची असते असे विचार यांच्या भेजात शिरतच नाहीत. इतिहासाचं कवडीचे ज्ञान नसलेल्या नारायण राणे पुत्राला काय समजणार छत्रपती शिवाजी महाराज किंवा अफजल खान?

अफजलखानाचा कोथळा बाहेर काढल्यानंतर शिवाजीराजांनी त्याच्या कबरीसाठी आणि दिवाबत्तीसाठी आर्थिक मदत केली होती. तसेच औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याची कबर खुलताबाद येथे तयार करण्यात आली. काही ऐतिहासिक साधनांनुसार, शाहू महाराजांनी कबरीच्या परिसराची साफसफाई, दुरुस्ती आणि देखभाल होण्यासाठी काही आर्थिक मदत दिली होती, त्याचेही इतिहासात दाखले आहेत.

छत्रपती शिवाजी राजे काय की छत्रपती शाहू काय, हे उच्च सुसंस्कृत होते. म्हणून ते 'मरणांती वैराणी' म्हणजे मेल्यानंतर वैर संपते, हे हिंदू धर्माच्या सहिष्णुतेतेच्या ब्रीदवाक्यानुसार जगले. शिवाजी राजांच्या नावाचा उदो उदो करणारे आजचे राजकर्ते मात्र असहिष्णु होत अफजल खान आणि औरंगजेबाच्या कबरी उखडून टाकण्याची भाषा करत आहेत. म्हणजे खरे तर ते शिवाजीराजांच्या आदर्श वागणुकीचा अपमानच करत आहेत. अफजलखान काय की औरंगजेब काय, या दोघांच्या कबरी वीर मराठ्यांच्या पराक्रमाच्या शौर्यगाथा सांगणाऱ्याच आहेत. या भूमीचा गळा घोटण्यासाठी आलेल्या ह्या मोगलांना याच मातीत शिवाजीराजांनी आणि मराठ्यांनी गाडले, हा ज्वलंत इतिहास या कबरी उखडून नष्ट करण्याचा प्रयत्न राजांचे नाव घेत परधर्म द्वेष वाढवणाऱ्या मतलबासाठी राजकारण करणारे नतद्रष्ट करंटे राजकारणीच करू शकतात. त्यांच्या या काव्याला अनेक शिवभक्त बळी पडत आहेत, हे दुर्दैवी आहे. थोडक्यात काय तर अफगाणिस्तानातील बामियान येथील बुद्धांच्या मूर्ती उखडून टाकणारे आणि अफजलखान, औरंगजेब यांच्या कबरी उखडून टाकणाऱ्यांची मानसिकता एकाच प्रकारची आहे, असे म्हटले तर चूक ठरू नये. ■ ■ ■

---

# राणेंना आवरा!

महाराष्ट्राचे विद्यमान मंत्री नितेश राणे यांना आवरणे आवश्यक झाले आहे. एका पाठोपाठ एक वादग्रस्त विधाने करून त्यांनी सरकारची अब्रू धुळीस मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न केला आहे. आपण मंत्री पदावर आहोत त्यामुळे आपण कसे बोलले पाहिजे, यांचे ज्ञान नितेश राणे यांना देण्याची वेळ आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज्यांचा सैन्यात एकही मुस्लिम सैनिक नव्हता असे वादग्रस्त विधान नितेश राणे यांनी केले, या त्यांच्या बोलण्यातुन त्याचे अज्ञान पुढे आले आहे.कदाचित राणे यांना शिवाजी महाराजांचा इतिहास माहित नसावा अश्या प्रतिक्रिया समोर आल्या. राणेना वादग्रस्त विधाने करून काय साध्य करायचे आहे ? असा प्रश्न लोकाना पडलेला आहे.

इतिहासाचे अवलोकन केले असता शिवाजी महाराज्यांच्या सैन्यात अनेक मुस्लिम सैनिक होते. सिद्दी हिलाल,सिद्दी वाहवाह,सिद्दि इब्राहिम, नुरखान बेग, मदारी मेहत्तर, महाराजांचा वकील काजी हैदर,आरमाराचा पहिला सुभेदार दयासारंग, रुस्त मेजमान हा महाराजांचा खास मित्र होता. अश्या प्रकारे शिवाजी महाराजांचा सैन्यात मुस्लिम सैनिक होते. याची नोंद इतिहासकारांनी घेतलेली आहे. त्याच बरोबर सभासदांच्या बखरी मध्ये सुध्दा शिवाजी महाराज यांचे सैन्यात मुस्लिम सैनिक होते असा उल्लेख आला आहे.

पाश्चिमात्य इतिहासकार यांनी सुध्दा या बाबीला मान्यता दिली आहे. या प्रत्येक सैनिकांवर महत्वाच्या जबाबदाऱ्या महाराजांनी सोपविल्या होत्या. जातीभेदाच्या पलीकडे जाऊन महाराजांसोबत राहुन तत्कालीन काळात सैनिकांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली होती. अठरा पगड जातीच्या लोकांना सोबत घेऊन आपल्या शत्रुंशी लढून महाराजांनी आजच्या समाजापुढे नवा आदर्श ठेवला आहे.

मात्र काही लोक जाणून बाजून वादग्रस्त विधाने करून सामाजिक वातावरण बिघडविनाचा प्रयत्न करीत आहेत. शिवाजी महाराज हे कुण्या एका जातीचे नव्हते. त्यांनी अखिल मानवजात माझी आहे. त्या सर्वांसाठी समान पध्दतीने राज्यकारभार त्यांनी चालवला, म्हणून महाराज रयतेचे राजे झाले.

अलीकडे शिवाजी महाराजांच्या बद्दल वाईट विधाने करण्याचा सपाटा चालू आहे. सरकारने अश्या लोकांना कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे. शिक्षा झाली तर लोक वळणीवर येतील, अन्यथा दिवसागणिक बेताल व्यक्तव्ये करुन सामाजीक वातावरण बिघडविण्याचा क्रम सुरूच राहील. नितेश राणे यांना आवरणे फार आवश्यक आहे.

एक मंत्री, प्रमुख पदाधिकारी सार्वजनिक जिवनात वावरात असताना,अशी बेताल व्यक्तव्य करू शकतोस कसा हा प्रमुख प्रश्न आहे. आपल्या योग्य आचरणाने राजकीय पुढाऱ्यांनी समाजापूढे आदर्श निर्माण करायला हवा. पंडित नेहरू, लाल बहादूर शास्त्री, अटल बिहारी वाजपेयी या सारख्या नेत्यांनी राजकारण करीत असताना नैतिक मूल्यांची जपवणूक केली आहे. कधीही समाजा-समाजात तेढ निर्माण होईल अशी व्यक्तत्वे या पुढाऱ्यांनी केली नाही. मात्र अलीकडे राजकीय पुढारांची विधाने दोन समाजात तेढ निर्माण करनारी आहेत असे अनेकदा दिसून आले.

भारत हा बहूभाषीय, बहू धार्मिक देश आहे.जातीच्या आधारावर यापूर्वी आपल्या देशाचे विभाजन झाले आहे. गेल्या सत्तर वर्षात आपण समाजात गुण्यागोविंदाने वावरत आलो आहोत. सामाजिक सलोखा टीकविणे सर्वांची जबाबदारी आहे. मात्र राजकिय नेत्यांनी धर्मावर आधारीत विधाने करून सामाजिक सलोखा बिघडविण्याचे कार्य करू नये, अशी माफक अपेक्षा जनतेची आहे.

आपले पद काय आहे? आपण कसे बोलले पाहिजे? आपल्या विधानाचा समाजावर काय परिणाम होईल? आपल्या विधानामुळे सुरक्षितेला धोका पोहचेल का? याचा विचार राजकारणांनी करणे आवश्यक आहे.

नितेश राणे यांचे वादग्रस्त विधान समाजा- समाजात तेढ निर्माण करणारे आहे. शिवाजी महाराजांची लढाई इस्लामच्या विरोधात होती. हिंदू- मुस्लिम वाद शिवाजी महराजांचा मुख्य मुद्दा होता. हिंदूना इस्लामाच्या समोर झुकू दिले नाही. अश्या बेताल वक्तव्यामुळे भाजपाची गोची झाली आहे. शिवाजी महाराज कोण्या एका धर्माचे नव्हते. हिंदू धर्मावर महारामांची श्रद्धा होती. पण मूसलमान धमार्चा महाराजांनी द्वेष केला नाही. उगाचच हिंदू मुस्लिम द्वेष पसरवून राजकारण गढूळ करू नये.

नितेश राणे यांचे अनेक वादग्रस्त विधाने चर्चेचा विषय झालेली आहेत. केरळ हा मिनी पाकिस्थान आहे,असे त्यांनी सांगितले. राहूल गांधी व प्रियंका गांधी या निवडून कश्या येतात, असा प्रश्न त्यांनी केला. केरळ राज्याला मिनी पाकिस्तान म्हणणे म्हणजे देशात अशांतता निर्माण करणाचा प्रयत्न करणे आहे.

राहूल गांधी व प्रियंका गांधी यांनी केरळच्या वायनाड मधून निवडून आले. लोकशाहीच्या मार्गाने ते निवडून आले. त्याला मिनी पाकिस्तान म्हणणे म्हणजे लोकशाहीच्या मुळावरच घाव घालणे आहे.

राणेनी दहावी-बारावी परिक्षेला बुरखा घालून येणाऱ्यांना परीक्षेला बसू देऊ नका असे विधान केले होते. ग्रामीण भागात सरपंच हा गावचा प्रमुख असतो, याला निधी देताना तो कोणत्या पक्षाचा आहे म्हणून त्याला निधी वाटपात दुजाभाव करता येणार नाही. सर्व समान घटकांच्या विकासासाठी सरकार काम करते,अमुक त्या पक्षाचा तमुक त्या पक्षाचा असा विचार करून विकास कामावरचा निधी वाटप केल्या जात नाही.

मात्र या नितेश राणेनी, केवळ भाजपाच्या विचारसरणीचा सरपंचांना विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्या जाईल अशी भूमिका जाहीर केली, त्यामुळे अनेक सरपंचानी नाराजी व्यक्त केली. भाजपामध्ये वाचाळविचारांचा भरणा झाला आहे का? असा प्रश्न सामान्य जनतेला पडलेला आहे. नितेश राणे, निलेश राणे, गोपीचंद पडळकर, सदाभाऊ खोत यासारख्या नेत्यांच्या बेताल बोलण्यामुळे भाजपाची अनेकदा गोची निर्माण झाली आहे.

लालकृष्ण आडवानी, अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळात भाजपाकडे एक सुसंस्कृत व सामाजिक राजकीय नीतिमूल्य जपणारा पक्ष म्हणून बघितले जात होते. मात्र वाचाळवीर नेत्यांचा बेजबाबदार बोलण्यामुळे पक्षाची प्रतिमा जनमानसात खालवली जात असताना सुद्धा मंत्री नितेश राणे यांच्या बोलण्याचा कोणत्याही भाजपा नेत्यांनी खंडण केले नाही किंवा राणेनां साधा जाब विचारला नाही, यातून सरकारची पत जाण्यास मदत झाली. भाजपा आतून नितेश राणेना बोलण्यास भाग पाडत आहे का ? असा प्रश्न राजकीय निरीक्षकांना पडलेला आहे.

नितेश राणे यांच्या बेजबाबदार बोलण्याचा सिलसिला असाच सुरु राहणार आहे.यांचा बोलविता ध्वनी कुणी वेगळाच आहे.कट्टर हिंदुत्ववादी प्रतिमा तयार करण्याचा प्रयत्न राणे करीत आहेत. त्यांनी ती जरूर करावी परंतु भारतात बंधुभाव नांदवा अशी भारतीय जनमानसाची ईच्छा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरची असा दे, हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,मतभेद नसू दे असे म्हटले आहे.

कट्टर हिंदुत्ववादी प्रतिमा जपत असताना नितेश राणे यांनी कमीत कमी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या या गीताचा आदर्श पुढे ठेवावा. जेणेकरून सामाजिक सलोखा कायम राहील. मात्र एका पाठोपाठ एक बेताल वक्तव्य करून सामाजिक वातावरण दुषित करणाऱ्या नितेश राणेना आवरणे भाजपसाठी आवश्यकच आहे. कोणीतरी पुढे येऊन ही समज राणेना देणे भविष्यकाळात आवश्यक आहे. ■ ■ ■

नितीन कैलासराव गोहने
हिरापूर, ता. सावली.
जि. चंद्रपूर.
8275393387

---

**वाचक लिहितात**

## मंदिरे सरकारच्या ताब्यात का?

प्रयागराज येथील कुंभमेळ्यात सर्वत्रच्या हिंदुत्वनिष्ठ संघटना, आखाडा परिषद, साधू-संत यांनी कोणतेही मंदिर कुठल्याही सरकारच्या कह्यात असता कामा नये, असा एकमुखी निर्णय घेतला होता. या पार्श्वभूमीवर अमरावती येथे नुकतेच महाराष्ट्र मंदिर महासंघाचे अधिवेशन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्याची बातमी वाचण्यात आली.

मंदिरे हा हिंदू संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. तो जतन करणे अतिशय महत्त्वाचे आहे. आपला धर्म, संस्कृती जीवंत ठेवण्याचे कार्य वेळोवेळी मंदिरांमुळे झालेले आहे. मात्र, आज मंदिरे सरकारच्या ताब्यात आहेत. भ्रष्ट नेते अशा मंदिरांचे विश्वस्त बनले आहेत. तेथे होणारा भ्रष्टाचार देखील वेळोवेळी उघडकीस आला आहे. अशावेळी सर्वसामान्य भक्तांना प्रश्न पडतो की, आज देशभरात कोणतीही मशीद किंवा चर्च सरकारच्या ताब्यात नाही; मग मंदिरे सरकारच्या ताब्यात का?

शिवाय, वक्फ कायद्याद्वारे मंदिरांच्या जमिनींवर अतिक्रमण होत असल्याच्या घटना देखील घडत आहेत. या गंभीर विषयावर सरकारने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी अधिवेशनात करण्यात आली. तसेच मंदिरे धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे, मंदिरांचे पावित्र्य राखणे, मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे येथे मद्य-मांस बंदी करणे, दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर देखील चर्चा करण्यात आली. या अधिवेशनातच मंदिर महासंघाचे पुढील अधिवेशन नागपूर येथे होण्याचे जाहीर करण्यात आले.

तेव्हा नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनात सर्वत्रच्या मंदिर विश्वस्तांनी सहभागी होऊन या धर्मकार्यात योगदान द्यावे आणि आम्हा भक्तांना अपेक्षित असलेले प्रत्येकच मंदिर आदर्श मंदिर व्हावे. मंदिर महासंघाच्या नागपूर येथील द्वितीय अधिवेशनासाठी हार्दिक शुभेच्छा!

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

---

# असंगाशी संग प्राणाशी गाठ!

चांगल्या व्यक्तीशी आपणं संबंध ठेवले नाहीत तर ते आपल्या जीवावर उठू शकतात.अशीच काहीशी परिस्थिती महाराष्ट्रात आज सर्वत्र पहायला मिळते आहे. याचे कारणं राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकरण होय.

आज कुणीही महिला सुरक्षित दिसून येत नाहीत. पुण्यासारखे विद्येचे माहेरघर आज सुरक्षित राहिलेले नाही.पुणे, मुंबई, दिल्ली, नागपुर सारखी अनेक शहरे आज सुरक्षित राहिलेली नाहीत. याची वेगवेगळी कारणे देता येतील. परंतु प्रमुख कारणं हे राजकारणाशी संबंधित गुन्हेगारीचे वाढते प्रमाण हे आहे.

गुन्हेगारांना राजकीय संरक्षण मिळत असल्याने ते निर्ढावलेले आहेत. संरक्षण यंत्रणांना ते घाबरत नाहीत. तर जनतेच्या संरक्षणासाठी ज्यांची नियुक्ती झालेली आहे तेच आज गुन्हेगारांच्या हातात हात घालून जनतेत मिरवीत आहेत. मग कायद्याचा धाक कसा असणार आहे? नुकतीच चंद्रपूर सारख्या शहरात बारमध्ये युवकांच्या टोळीकडून पोलिसाची हत्या करण्यात आली आहे. दाद महाल वार्ड येथील तीन युवकांना ताब्यात घेतले आहे. तर काहीजण फरार झाले आहेत. यात दिलीप सुभाष चव्हाण या पोलिस शिपायाचा मृत्यू झाला आहे. तर समीर चाफले हे जखमी झाले आहेत. पोलिस विभागाची ही गत तर सामान्य माणसांचे?

लोकशाही व्यवस्थेत निवडणुक जिंकून येणाऱ्या व्यक्तींना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे.ते साम, दाम, दंड व भेद याचा वापर करून निवडून येतात.आणि जनतेवर अधिराज्य गाजवितात.निवडून आल्यानंतर त्यांची बडदास्त ही एखाद्या हिरोला शोभेल अशी असते. त्यांना लोकसेवक कसे म्हणावे हेच कळत नाही?

ते निवडून आल्यानंतर लोकसेवक, जनतेचे लोकप्रतिनिधी म्हणून कायदे मंडळात जाऊन बसतात. जेंव्हा की त्यांना कायद्याचे,विधी मंडळाचे किंवा कुठल्याही प्रकारचे विशेष ज्ञान हे प्राप्त नसते.ते पैशाच्या जोरावर आणि विविध प्रकारचे आमिष खुलेपणाने दाखवून निवडणूक लढतात आणि जिंकून येतात. जेंव्हा की हे घटनाबाह्य काम आहे.

हे सुप्रीम कोर्टाला पणं ज्ञात आहे. परंतु सुप्रीम कोर्ट सुध्दा याबाबत हतबलता दाखवून, ताशेरे ओढून मोकळी होते आहे. कारण कायदे करून ते अंमलात आणणे हे कुठल्याही कोर्टाचे काम नाही.कुठलिही कारवाई ही योग्य पध्दतीने, कायद्याचे पालन करून झालेली आहे किंवा नाही याबाबतचे मत नोंदविण्याचे काम कोर्ट करीत असते.

कोर्ट आदेश देऊन मोकळी होते. आदेशाची अंमलबजावणी करणारे लोक सक्षम नाहीत.ते यातूनही आपला स्वार्थ साधू इच्छितात. यामुळे कोर्टाचा वचक असलेला पाहायला मिळत नाही.

सत्तेत आज चांगली माणसे जाऊन बसू शकत नाहीत. असे जनता जनार्दन जेंव्हा छातीठोकपणे सांगते आहे. याचाच अर्थ आम्हींच लोकशाहीचा मर्डर, खुण करण्यासाठी कारणीभूत ठरतो आहे. याकडे दुर्लक्ष करून कसे चालेल? आज

सत्तेतील लोकांवरच अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. तरीही ते आमदार, खासदार, मंत्री बनून सन्मान प्राप्त करतात.स्वतःची सुरक्षा सरकारी खचार्ने करून घेतात. जनतेला सुरक्षा कवचची गरज वाटत नाही. तीचा जीव स्वस्त झाला आहे.कुणीही यावे आणि सहज मारून जावे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

मारल्यानंतर आम्ही वर्षोगणती कोर्ट कचेऱ्या करीत बसतो. निकाल हाती लागेपर्यंत अर्धेअधिक लोक जगातून गेलेले असतात. मग सबळ पुराव्या अभावी गुन्हेगारांना मोकळे सोडून दिले जाते. ही आपली न्याय देण्याची पध्दत विकसित झालेली आहे.

आम्ही छ.शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात रहातो आहे.येथे तर गुन्हेगारांना मोकळे रान मिळाले आहे. सज्जन लोकांना जीवन जगणे कठीण काम झाले आहे. गुन्हेगारांना मिळणारा राजकीय आश्रय हा अत्यंत चिंतेचा विषय बनला आहे. ही गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी कधी कुणाचा बळी घेतील हे सांगता यायचे नाही.

आपल्याकडे मराठीत एक म्हण आहे.. असंगाशी संग प्राणाशी गाठ ' तशी आज परिस्थिती महाराष्ट्रात सर्वत्र पहायला मिळते आहे.महाराष्ट्रात गुन्हेगारांना राजकीय आश्रय मिळतो आहे ही फार चिंचेची बाब ठरते आहे. आता याबाबत जनतेनेच काय तो ठोस निर्णय घेतला पाहिजे. गुन्हेगारीत ज्यांची नावे आहेत त्यांना कुठल्याही परिस्थितीत निवडून देता कामा नये. जे पक्ष गुन्हेगारांना उमेदवारी देतील त्या पक्षाचा पराभव निश्चित झाला पाहिजे. याची काळजी मतदारांनी घेतली पाहिजे. तरच आपली लोकशाही व्यवस्था ही जीवंत असणार आहे. याची काळजी मतदारांनी घेतली पाहिजे.

केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात गंभीर गुन्हेगारांवर आजीवन राजकीय बंदी घालण्यास मनाई दर्शविलेली आहे.ही फार चिंतेची ठरते बाब आहे.याची दखल जनता घेणार आहे कां?

----------------

मिलिंद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार
राजुरा, जि. चंद्रपूर.
९५११२१५२००

■ ■ ■

---

# उन्हाळ्यात कोल्ड ड्रिंक नाही तर फायदेशीर ठरेल या पेयाचे सेवन

उन्हाळ्यात लोक अनेकदा वेगवेगळ्या प्रकारचे कोल्ड्रिंक्स पितात, परंतु त्यातील रसायने आणि प्रिझर्वेटिव्ह्ज शरीराला हानी पोहोचवू शकतात. त्याऐवजी जर तुम्ही घरी एक खास कोल्ड्रिंक बनवले तर ते तुम्हाला ताजेतवाने तर वाटेलच, पण ते सेवन केल्याने तुमचे आरोग्यही अबाधित राहील.



आयुर्वेदात तुळशीला औषधी वनस्पतींची राणी म्हटले आहे. त्याच्या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुणधर्म असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. उन्हाळ्यात, थंड तुळशीचे सरबत शरीराला डिटॉक्स करते आणि ऊर्जा प्रदान करते.

तुळशीचे कोल्ड्रिंक बनवण्याची पद्धत खूप सोपी आहे. यासाठी 20-25 ताजी तुळशीची पाने पाण्यात उकळा आणि थंड होऊ द्या. नंतर त्यात एक चमचा मध, थोडासा लिंबाचा रस आणि चवीनुसार काळे मीठ घाला. ते चांगले मिसळा आणि फ्रीजमध्ये थंड करा किंवा बर्फ घालून सर्व्ह करा. जर हवे असेल तर त्यात पुदिन्याची पाने आणि भाजलेले जिरे देखील घालता येतात, ज्यामुळे त्याची चव आणखी वाढते. हे पेय नैसर्गिकरित्या ताजेतवाने आहे आणि शरीराला उष्णतेपासून आराम देते.

तुळशी कोल्ड्रिंक पिल्याने शरीराला चिडचिड, थकवा आणि उष्माघातापासून संरक्षण मिळते. त्यासोबतच तुमची पचन सुधारते आणि गॅस, अपचन यासारख्या पोटाच्या समस्यांपासून आराम देते. तुळस शरीराला डिटॉक्स करते आणि त्वचा देखील सुधारते. उन्हाळ्यात घाम आणि गरम हवेमुळे येणारा थकवा दूर करण्यासाठी हे पेय खूप प्रभावी आहे. तसेच, हे पेय ताण कमी करते आणि मनाला शांती देते.

तुळशीचे शीतपेय उन्हाळ्यात नैसर्गिक ऊर्जा पेयासारखे काम करते, जे शरीराला कोणत्याही दुष्परिणामांशिवाय थंडावा आणि ताजेपणा देते. मधुमेहाच्या रूग्णांसाठी सकाळी रिकाम्या पोटी तुळशीचे पाणी पिणे फायदेशीर असते. त्यामधील यूजेनॉल आणि कैरेयोफिलिन तुमच्याा शरीरातील पैंक्रियाटिक बिटा सेल्सला निरोगी ठेवण्यास मदत करतात. शरीरातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. तुळशी खाल्ल्यामुळे शरीरातील इन्सुलिनची मात्रा नियंत्रित राहाते.

तुळशीचा तुमच्या त्वचेसाठी देखील वापर केला जाऊ शकतो. तुळशीच्या पानांची पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि 10-15 मिनिटांमध्ये धुवा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील पिंपल्सच्या समस्या दूर होतात त्यासोबत तुम्हाला पिग्मेंटेशन किंवा काळ्या डागांच्या समस्या होत नाहीत. तुळशीच्या पानांमध्ये अँटिऑक्सिडेंट्स असतात ज्यामुळे तुमचा चेहरा अधिच चमकदार आणि निरोगी बनतो. रिकाम्या पोटी तुळशीचे 5-6 पाने चावून खाल्ल्यामुळे तुमची ओरल हेल्थ निरोगी राहाण्यास मदत होते. ■ ■ ■

---

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## ठोक भूषण पुरस्कार

राज्याच्या उज्वल परंपरेला
ज्यांनी केलं कलंकीत
अशा राजकीय नररत्नांना
एक एप्रीलला केलं जावं
सन्मानित ..

एलाचं बी बेलाला लावण्यात
जे आहे पटाईत
त्यांना 'वाचाळ भूषण ' ने
केलं जावं गौरवान्वित ..

ज्यांनी दादागिरी करून
केली दहशत निर्माण
अशा टॉप राजरत्नांचा
'ठोक भूषण 'ने करावा सन्मान!

# इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्जचा २०३० पर्यंत ५० अब्ज अमेरिकन डॉलर मूल्यांकनाचे लक्ष्य साध्य करण्याचा निर्धार : अशोक हिंदुजा



**मुंबई, २० मार्च :** इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्जचे अध्यक्ष अशोक हिंदुजा यांनी मंगळवारी घोषणा केली की रिलायन्स कॅपिटल चे अधिग्रहण पूर्ण झाल्यानंतर इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्ज लिमिटेड ने २०३० पर्यंत ५० अब्ज अमेरिकन डॉलर मूल्यांकन साध्य करण्याचे लक्ष्य ठरवले आहे. हे अधिग्रहण पूर्ण करून कर्जबाजारी कंपनीच्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या रिझोल्यूशन प्रक्रियेला पूर्णविराम दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्ज लिमिटेड ने बोली रक्कम वित्तपुरवठादारांच्या एस्क्रो खात्यात हस्तांतरित केली आहे आणि प्रशासकांकडून व्यवस्थापनाचा ताबा बुधवारी स्वीकारला जाणार आहे.

मॉरिशसस्थित इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्ज ने रिलायन्स कॅपिटलसाठी ९,६५० कोटी रु. च्या बोलीसह यशस्वी इच्छुक म्हणून स्थान मिळवले. त्यानंतर, कंपनीने रिलायन्स जनरल इनश्युरन्सची सॉल्व्हन्सी बळकटीसाठी अतिरिक्त २०० कोटी रु. चे योगदान दिले. हे बोली रकमेपेक्षा जास्त होते.

आमच्या बाजूने व्यवहार पूर्ण झाला आहे. आपण बोलत असताना एका एस्क्रो खात्यातून दुसऱ्या एस्क्रो खात्यात पैसे हस्तांतरित होत आहेत, असे हिंदुजा म्हणाले.

आता मूल्य निर्मितीचा प्रवास सुरू होत असून रिलायन्स कॅपिटल व्यवसायाचे मूल्य अंदाजे २०,००० कोटी रू. असेल असे ते म्हणाले. इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्ज लिमिटेड संपूर्ण रिलायन्स कॅपिटल व्यवसायाचे पुनरावलोकन पूर्ण करून आवश्यक निधी गुंतवणुकीबाबत निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ब्रोकिंग आणि मालमत्ता पुनर्रचना व्यवसाय नव्या व्यवस्थापनाकडे कायम ठेवला जाईल. आरबीआयकडे मुख्य गुंतवणूकदार कंपनी म्हणून नोंदणीकृत असलेल्या रिलायन्स कॅपिटल मध्ये रिलायन्स निप्पॉन लाइफ इन्शुरन्स, रिलायन्स जनरल इन्शुरन्स, रिलायन्स मनी, रिलायन्स सिक्युरिटीज, रिलायन्स ॲसेट रिकन्स्ट्रक्शन आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स यांसारख्या अनेक उपकंपन्या आहेत.

विमा कंपन्यांच्या लिस्टिंगबाबत विचारले असता, हिंदुजा म्हणाले की, ते मूल्यनिर्मितीच्या दोन वर्षांनंतर होऊ शकते. या आर्थिक सेवा कंपनीत १.२८ लाख कर्मचारी आहेत आणि नव्या व्यवस्थापनाकडून शक्य तेवढ्या कर्मचाऱ्यांच्या हितांचे रक्षण केले जाईल असे त्यांनी आश्वासन दिले.

एप्रिल २०२३ मध्ये, इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्ज लिमिटेड ने रिलायन्स कॅपिटलसाठी कॉर्पोरेट इन्सॉल्व्हन्सी रिझोल्यूशन प्रोसेस अंतर्गत झालेल्या निविदा प्रक्रियेत यशस्वी ठरून ९,६५० कोटी रु. च्या प्रस्तावासह यशस्वी रिझोल्यूशन अर्जदार म्हणून स्थान मिळवले होते. गेल्या वर्षी इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्ज लिमिटेडला भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण तसेच संबंधित शेअर बाजार आणि कमोडिटी एक्स्चेंजमधून सर्व आवश्यक नियामक मंजुरी प्राप्त झाली होती.

सेंट्रल बँकेने नागेस्वरा राव वाय यांना प्रशासक म्हणून नेमले होते. त्यानी नंतर डिसेंबर २०२१ मध्ये कंपनीच्या अधिग्रहणासाठी निविदा मागवल्या होत्या.

# यूएसव्हीकडून भारतात डायबेटिज केअरसाठी झेनिया : एम्पाग्लिफ्लोझिन आणि त्याची संयोजने लॉंच




**मुंबई, २० मार्च :** यूएसव्ही या भारतातील मल्टीनॅशनल हेल्थकेअर कंपनीने टाइप २ मधुमेहाने पीडित व्यक्तींमधील ग्लायसेमिक नियंत्रण, हार्ट फेल्युअर व क्रॉनिक किडनी केअरसाठी आघाडीचे एसजीएलटी२ इनहिबिटर झेनिया (एम्पाग्लिफ्लोझिन व त्याची संयोजने) लॉंच केले आहे. हे लॉंच १,१०० कोटी रूपये एसजीएलटी२आय बाजारपेठेतील यूएसव्हीच्या उपस्थितीला अधिक दृढ करते, तसेच ओरल ॲण्टी-डायबेटिज केअरमधील त्यांच्या नेतृत्वाला अधिक प्रबळ करते.

यूएसव्हीने झेनिया (एम्पाग्लिफ्लोझिन १० मिलीग्रॅम व २५ मिलीग्रॅम), झेनिया एम (एम्पाग्लिफ्लोझिन १२.५ मिलीग्रॅम + मेटफॉर्मिन ५०० मिलीग्रॅम आयआर / १००० मिलीग्रॅम ईआर) आणि झेनिया एसटी (एम्पाग्लिफ्लोझिन २५ मिलीग्रॅम + सिटॅग्लिप्टिन १०० मिलीग्रॅम) सादर केले आहे. ही संयोजने स्थिर डोसिंग देतात, गोळ्यांवर अवलंबून राहणे कमी करतात आणि आधुनिक थेरपी उपलब्ध करून देतात, ज्यामुळे मधुमेहाच्या गुंतागूंती व मृत्यू कमी करण्यासाठी लवकर उपचार सक्षम करतात.

या लॉंचबाबत मत व्यक्त करत यूएसव्हीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रशांत तिवारी म्हणाले, ''भारतात १०१ दशलक्षहून अधिक व्यक्तींना टाइप २ मधुमेह आहे आणि १३६ दशलक्ष व्यक्तींना प्रीडायबेटिज आहेत. झेनियासह आमचा आधुनिक डायबेटिज केअरची उपलब्धता वाढवण्याचा मनसुबा आहे, ज्यामुळे या विभागातील आमचे नेतृत्व अधिक दृढ होईल. यूएसव्ही सर्वोत्तम रूग्ण निष्पत्तींसाठी किफायतशीर, उच्च दर्जाच्या थेरपी देण्याप्रती कटिबद्ध आहे.''

विशिष्टता कमी झाल्यानंतर एम्पाग्लिफ्लोझिन आणि त्याची संयोजने आता एक-पंचमांश किमतीत उपलब्ध आहेत, ज्यामुळे किफायतशीरपणा वाढला आहे. यूएसव्हीची मेट्रो, प्रथम, द्वितीय व तृतीय श्रेणीची शहरे, कॉर्पोरेट हॉस्पिटल्स आणि ई-फार्मसीजपर्यंत व्यापक पोहोच ग्रामीण भागांसह देशभरात झेनियाच्या उपलब्धतेची खात्री देते.

## कलाकार पाणी वाचवण्याच्या महत्त्वासोबत दररोज पाणी बचत करण्याच्या टिप्स सांगत आहेत



**मुंबई, २० मार्च :** पाणी सर्वात बहुमूल्य संसाधन आहे आणि जबाबदार नागरिक म्हणून आपण पाणी बचत करण्यासाठी जागरूक पावले उचलली पाहिजेत. पाणी बचत करण्याच्या महत्त्वाबाबत जागरूकतेचा प्रसार करण्यासोबत दररोज पाणी वाचवण्यासाठी लहान सवयी देखील मोठा बदल घडवून आणू शकतात, यावर भर दिला पाहिजे. एण्ड टीव्ही कलाकार देखील आपण सर्व जल संवर्धनाप्रती कशाप्रकारे योगदान देऊ शकतो याबाबत त्यांचे मत व टिप्स सांगत आहेत. हे कलाकार आहेत अमित भारद्वाज (मेवा, 'भीमा'), योगेश त्रिपाठी (हप्पू सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मधील अमित भारद्वाज ऊर्फ मेवा म्हणाले, ''पाणी हे अमूल्य संसाधन आहे आणि जल संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण बऱ्याचदा ते गृहीत धरतो, पण वास्तव आहे की पाण्याची कमतरता वाढती चिंता आहे. आपल्या दैनंदिन सवयींमध्ये साधे बदल केल्याने मोठा फरक पडू शकतो. मी नेहमी दात ब्रश करताना नळ बंद करतो, शॉवरऐवजी बादली वापरतो आणि शक्य असेल तेव्हा झाडे व साफसफाईसाठी पाण्याचा पुनर्वापर करतो. गळती दूर करणे, कमी प्रवाहाचे नळ बसवणे आणि पाण्याची बचत करणारी उपकरणे निवडणे यांसारख्या छोट्या पावलांमुळे हे आवश्यक संसाधन जपण्यास मदत होऊ शकते. पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी मी माझ्या बाथरूममध्ये ड्युअल-फ्लश सिस्टम देखील वापरतो. आपण सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले तर भावी पिढ्यांसाठी चांगले भविष्य सुनिश्चित करू शकतो. चला पाणी वाचवण्याचा संकल्प करूया - प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे!''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील योगेश त्रिपाठी ऊर्फ दरोगा हप्पू सिंग म्हणाले, ''पाणी बचत करणे ही सर्वांची जबाबदारी आहे आणि प्रत्येक लहान पाऊल महत्त्वाचे आहे. अभिनेता म्हणून मी पाणी बचत करण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता पसरवण्याचा प्रयत्न करतो. दैनंदिन जीवनात मी साध्या सवयी स्वीकारल्या आहेत, ज्या महत्त्वपूर्ण फरक जाणवून देतात. उदाहरणार्थ, मी वॉशिंग मशीनचे पाणी नाल्यात जाऊ देण्याऐवजी फरशी स्वच्छ करण्यासाठी किंवा फ्लशिंगसाठी पुन्हा वापरतो. मी भांडी धुताना नळ बंद असण्याची आणि इतर कारणांसाठी स्वयंपाकाचे पाणी पुन्हा वापरण्याची खात्री घेतो. याव्यतिरिक्त, मी बागकाम आणि साफसफाईला वापरण्यासाठी पावसाचे पाणी जमा करण्यास सुरुवात केली आहे. बाहेरील जागा स्वच्छ करण्यासाठी नळाच्या पाण्याऐवजी झाडू वापरणे ही आणखी एक चांगली सवय आहे. मी या सवयी अंगिकारल्या आहेत, तसेच सर्वांना पाणी वाचवण्याच्या या मोहिमेत सामील होण्याचे आवाहन करतो. एकत्रितपणे, आपण मोठा बदल घडवून आणू शकतो.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या, ''पाणी हे बहुमूल्य संसाधन आहे आणि पाण्याचा योग्य वापर करणे ही आपली जबाबदारी आहे. पाणी वाचवण्यासाठी मी माझ्या दैनंदिन जीवनात अनेक लहान पण प्रभावी बदल केले आहेत. घरी, मी वाया जाणारे पाणी वाचवणारी उपकरणे बसवली आहेत. मी वाहत्या पाण्याऐवजी एका भांड्यात भाज्या धुवून त्या पाण्याचा माझ्या झाडांसाठी पुनर्वापर करते. पावसाचे पाणी साठवणे हा पाणी साठवण्याचा आणि वापरण्याचा आणखी एक उत्तम मार्ग आहे. याव्यतिरिक्त, मी नळाच्या पाण्याऐवजी वॉटरिंग कॅन वापरून झाडांना जास्त पाणी देणे टाळते.

# आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्टसह संपत्तीचे संरक्षण आणि महागाई नियंत्रित अगदी सोपे

**मुंबई, २० मार्च :** आजच्या अनिश्चित आर्थिक परिस्थितीत वाढती महागाई हाताळण्यासाठी, बाजारातील चढ-उतारांवर मात करण्यासाठी आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत असणे गरजेचे झाले आहे. या गरजेची पूर्तता करण्यासाठी, लोक अशा गुंतवणुकीच्या पर्यायांकडे पाहत आहेत जे गुंतवलेल्या भांडवलाची सुरक्षितता आणि वाढ दोन्ही प्रदान करतील. ही गरज पूर्ण करण्यासाठी, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स ने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट नावाचा एक खास दीर्घकालीन बचत योजना सुरु केली आहे. हा प्लॅन तुमच्या संपत्तीचे जतन करत निश्चित उत्पन्न मिळवून देण्यासाठी बनविण्यात आला आहे.

आमचे उद्दिष्ट ग्राहकांना त्यांची दीर्घकालीन आर्थिक स्वप्ने निश्चितपणे पूर्ण करण्यात मदत करणे आहे, असे आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सचे मुख्य उत्पादन आणि वितरण अधिकारी श्री. अमित पालटा यांनी सांगितले. या योजनेत लवचिकता असून ग्राहकांना निश्चित उत्पन्न कालावधी निवडण्याचा पर्याय मिळतो याशिवाय मॅच्युरिटीच्या वेळी एकरकमी मोठी रकम मिळते आणि ती कर भरण्याच्या दृष्टीने फायदेशीर असते. या योजनेमध्ये दरवर्षी ५% उत्पन्न वाढते ज्यामुळे ग्राहकांना वाढत्या महागाईला तोंड देणे सोपे होते.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स आपल्या विमा वितरण प्रणालीमध्ये मोठे डिजिटल बदल करत आहे. याच अंतर्गत आयपीआरयू एज या मोबाईल पद्वारे विमा एजंटांना अधिक सक्षम बनविण्यात येत आहे. ग्राहकांनी योग्य आर्थिक निर्णय घ्यावे यासाठी एजंट महत्त्वाची भूमिका बजावतात. आयपीआरयू एजच्या मदतीने, आम्ही त्यांना डिजिटल ऑफिस त्यांच्या हातात उपलब्ध करून देत आहोत, असे श्री. अमित पालटा यांनी सांगितले. या मोबाईल पद्वारे एजंट नवीन ग्राहक शोधू शकतात, सोशल मीडिया प्रचार करू शकतात आणि कोणत्याही प्रत्यक्ष कागदपत्राविना पूर्ण डिजिटल पद्धतीने विमा विक्री करू शकतात. यामुळे विमा एजंट त्यांचा व्यवसाय अधिक सक्षमपणे वाढवू शकतात.

एप्रिल ते डिसेंबर २०२४ या कालावधीत आयपीआरयू एज वापरणाऱ्या एजंटांच्या विमा विक्रीत २५% वाढ झाली. विशेष म्हणजे, ९८% पात्र एजंटांना त्यांच्या कमिशनचे पेमेंट त्याच दिवशी मिळाले. एआय-आधारित उपायांमुळे ५०% पेक्षा जास्त बचत विमा योजना ज्या च्या त्याच दिवशी जारी केल्या जाऊ शकल्या.

एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या काळात कंपनीचा विमा दावा मंजुरीचा दर ९९.३% इतका होता यावरून आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सचा ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन स्पष्ट होतो. याशिवाय, ज्या दाव्यात चौकशी करण्याची गरज नव्हती ते अवघ्या १.२ दिवसांत मंजूर झाले. ग्राहकांचे आर्थिक भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि एजंटांना करिअरमध्ये सुलभ आणि उत्तम प्रगती मिळवून देण्यासाठी कंपनी वचनबद्ध असून डिजिटल उपक्रमांच्या माध्यमातून उद्योगात नवे निकष प्रस्थापित करत आहे.

# फोनपे वेल्थने सादर केले क्रिस्प, एक प्रगत म्युच्युअल फंड सिलेक्शन टूल

**मुंबई, २० मार्च :** फोनपे वेल्थतर्फे आज क्रिस्प हे खास टूल लॉंच करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. गुंतवणूकदारांना माहितीवर आधारित म्युच्युअल फंड गुंतवणूक निर्णय घेण्यास मदत करण्याच्या उद्दिष्टाने हे टूल डिझाइन करण्यात आले आहे. ३१ डिसेंबर २०१९ रोजी म्युच्युअल गुंतवणूकदारांची संख्या २० दशलक्ष (२ कोटी) होती. ती वाढून ३१ डिसेंबर २०२४ रोजी ५३ दशलक्ष (५.३ कोटी) इतकी झाली असली (स्रोत : एएमएफआय) तरी योग्य फंड निवडणे बहुतांश गुंतवणूकदारांसाठी आव्हान होऊन राहिले आहे, अशी परिस्थिती असताना हे टूल लॉंच करण्यात आले आहे.

क्रिस्प (कन्सिस्टन्सी, रिस्क अँड इन्व्हेस्टमेंट स्टाइल ऑफ द पोर्टफोलियो) हे टूल गुंतवणूकदारांसाठी फक्त भूतकाळातील परताव्यावर आधारित शिफारस करत नाही तर अधिक व्यापक पद्धतीने योग्य म्युच्युअल फंड निवडण्यास मदत करते. किरकोळ गुंतवणूकदार, विशेषतः वेल्थटेक प्लॅटफॉर्मद्वारे गुंतवणूक करणारे, बहुतांश वेळा फंडांच्या भूतकाळातील परफॉर्मन्सच्या आधारे गुंतवणुकीचे निर्णय घेतात. यामुळे अनेकदा गुंतवणुकीसाठी चुकीची निवड करण्यात येते. म्युच्युअल फंडांची कामगिरी, जोखीम आणि पोर्टफोलिओ डेटाचा वापर करून गुंतवणूकदारांसाठी निर्णय घेण्यासाठी उपयुक्त माहिती क्रिस्प उपलब्ध करून देते आणि गुंतवणूक निवड प्रक्रिया सुलभ करते.

म्युच्युअल फंड क्षेत्रातर्फे करण्यात येणारे गुंतवणूकदार जागरुकता उपक्रम आणि वेल्थटेक प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून म्युच्युअल फंड गुंतवणूक सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी अधिक सहज झालेली आहे. त्यामुळे म्युच्युअल फंड क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. फोनपे वेल्थमध्ये क्रिस्प सारख्या अभिनव टूल्सच्या माध्यमातून आमच्या प्लॅटफॉर्मवरील गुंतवणूकदारांना साह्य करण्यावर आम्ही लक्ष केंद्रीत करतो. आम्ही संशोधन आणि तंत्रज्ञानावर आधारित उपाय विकसित करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. या उपायांची गुंतवणूकदारांना मूलभूत गुंतवणूक तत्त्वे समजून घेण्यास आणि सुज्ञपणे संपत्ती निर्माण करण्याच्या प्रवासात मार्गदर्शन करण्यास मदत होईल. , असे शेयर डॉट मार्केट च्या (फोनपे वेल्थ) इन्व्हेस्टमेंट प्रॉडक्टचे प्रमुख निलेश डी. नाईक म्हणाले.

# सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेत वालीच्या दुष्ट सापळ्यातून लहानग्या हनुमानाला वाचवण्यासाठी माता अंजनीचे दिव्य बलिदान पुरेसे ठरेल का ?



**मुंबई, २० मार्च :** सोनी सबवरील वीर हनुमान या भव्य पौराणिक मालिकेने हनुमानाच्या बालपणीच्या फारशा माहीत नसलेल्या गोष्टी सादर करून प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. मारुतीला आपल्यातील दिव्य शक्तींची जाणीव होऊन आपल्या जीवनाचे उद्दिष्ट समजण्याचा हा प्रवास आहे. भावनिक आणि आध्यात्मिक संघर्षाची ही कहाणी आहे, ज्यातून हनुमानाची नियती आकाराला आली. या मालिकेत आन तिवारी बाल हनुमानाच्या भूमिकेत आहे, सायली साळुंखे आणि आरव चौधरी अनुक्रमे अंजनी आणि केसरी या हनुमानाच्या माता-पित्याच्या भूमिका करत आहेत, तर माहिर पांधी बलिष्ठ वाली आणि सुग्रीव या दोघांची भूमिका साकारत आहे. भक्ती, नाट्य आणि ॲक्शनने परिपूर्ण असलेली ही मालिका दर सोमवार ते शनिवार रात्री ७:३० वाजता प्रसारित करण्यात येत आहे.

अलीकडच्या भागांमध्ये, सुमेरु पर्वतावर मारुतीच्या जन्माचा मंगल सोहळा अनुभवला. मात्र या दिव्य आनंदाच्या क्षणावर लवकरच दुःखाचे सावट आले. कारण माता अंजनीला एक अप्सरा म्हणून आपली दैवी कर्तव्ये पार पाडण्यासाठी स्वर्गात जावे लागले. त्यानंतर केसरी, बाल मारुती सह किष्किंधा नगरीकडे प्रयाण करतो. एका अशुभ भविष्यवाणीने प्रेरित होऊन वाली मारुतीला बलाढ्य वीर होण्याच्या अगोदरच संपवण्यासाठी एक सापळा रचतो. केसरी आणि मारुतीच्या मार्गात हा सापळा त्यांची प्रतीक्षा करत असतो. एक तुटका पूल मारुतीला नदीमध्ये घेऊन जातो. त्याचा जीव अधांतरी असतो, तेव्हा वालीची दुष्ट योजना उलगडू लागते. परंतु, दूर स्वर्गलोकात पोहोचलेल्या अंजनीला तिच्या पुत्रावर ओढवलेल्या संकटाची चाहूल लागते आणि तिच्या मनाची चलबिचल होते. तिला मिळालेल्या आदेशांना न जुमानता ती मन घट्ट करून एक निर्णय घेते. आपले अमरत्व त्यागून आपल्या बाळाच्या रक्षणार्थ मर्त्य जगात परतण्याचा ती निर्णय घेते.

पण अंजनीने दिलेले हे बलिदान छोट्या मारुतीला वालीच्या तावडीतून सोडवण्यासाठी पुरेसे असेल का? आपल्या पुत्राला वाचवण्यासाठी ती असुरांना थोपवून धरायला वेळेवर पोहोचेल का?

वीर हनुमान मालिकेत अंजनीची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, आपल्या बाळाचे अनिष्टापासून रक्षण करणे ही प्रत्येक मातेची सहज प्रवृत्ती असते. त्यासाठी ती काहीही पणाला लावू शकते. या आठवड्यात अंजनीचा नियतीला न जुमानण्याचा, दैवी बंधनातून मुक्त होण्याचा, आपल्या मनाची हाक ऐकण्याचा व अखेरीस आपल्या अमरत्वाचे बलिदान देण्याचा प्रवास प्रेक्षक बघतील. तिचा प्रचंड संताप आणि मातृत्त्वाची ताकद साकारण्याचा अनुभव समाधान देणारा होता. आपल्या बाळाच्या संरक्षणासाठी एक माता किती मोठे बलिदान देऊ शकते हे प्रेक्षक बघतील.

# शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्याचे आवाहन

**अमरावती, २० मार्च :** सामाजिक न्याय विभागामार्फत महाडीबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. यात सुमारे चार हजार ४३५ अर्ज महाविद्यालय आणि विद्यार्थीस्तरावर प्रलंबित आहेत. सदर अर्ज तातडीने निकाली काढावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना राबविण्यात येतात. यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अनुसूचित जाती व विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गासाठी नवीन अर्ज व नूतनीकरणाचे अर्ज भरण्याकरिता दि. २५ जुलै २०२४ पासून सुरूवात झाली. सन २०२३-२४ वर्षाचे महाडीबीटीनुसार जिल्ह्यातील महाविद्यालयस्तरावर शिष्यवृत्तीचे ३ हजार ६७५ अर्ज, तर विद्यार्थीस्तर ७६० अर्ज प्रलंबित आहेत.

मागील वर्षी २०२३-२४ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गाचे एकूण २० हजार ५२१ अर्ज नोंदणीकृत झाले होते. मागील वर्षाच्या तुलनेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील सर्व योजनाचे सुमारे १८ हजार ७३३ विद्यार्थ्यांचे अर्ज नोंदणीकृत झाले आहे.

# कोटक म्यूचुअल फंड प्रस्तुत करत आहे छोटी SIP - तुमच्या स्वप्नांसाठी आयोजन करण्याचा एक छोटासा मार्ग

**मुंबई, २० मार्च :** कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड (KMAMC / कोटक म्यूचुअल फंड) ने आज छोटी SIP सुविधा लॉन्च केल्याचे जाहीर केले. छोटी SIP कोटक महिंद्रा म्यूचुअल फंडच्या सर्व पात्र योजनांसाठी उपलब्ध असेल. SEBI आणि AMFI ने अलीकडेच छोटी SIP (स्मॉल टिकेट SIP) दाखल केली आहे, ज्यामधून संपत्ती निर्मितीच्या प्रवासात अधिकाधिक भारतीयांना आणण्याची एक उत्तम संधी सादर केली आहे.

KMAMC चे मॅनेजिंग डायरेक्टर निलेश शाह म्हणाले, भारताच्या लोकसंख्येपैकी केवळ सुमारे ५.४ कोटी अनोखे गुंतवणूकदारच म्यूचुअल फंडमध्ये गुंतवणूक करतात- अशाप्रकारे, ही फारशी न वापरलेली आणि प्रचंड मोठी संधी आहे, जी अजूनही खूप जास्त लोकांपर्यंत पोहोचू शकते आणि भारतीय बचतकर्ते त्यातून आर्थिक स्वातंत्र्य मिळवू शकतात. सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (SIPs) नवीन गुंतवणूकदारांना आकर्षित करून त्यांचा म्यूचुअल फंड प्रवास सुरू करण्याचा एक उत्तम मार्ग आहे. छोटी SIP च्या लॉन्चसह नवीन गुंतवणूकदार कमीत कमी २५० रुपयांनी आपला संपत्ती निर्मितीचा प्रवास सुरू करू शकतात. आपण त्याला छोटी रकम बडा काम असे म्हणू शकतो.

या उपक्रमाच्या अंतर्गत नवीन गुंतवणूकदार २५० रुपयांच्या किमान रकमेसह SIP च्या माध्यमातून गुंतवणूक करू शकतात. छोटी SIP (स्मॉल सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) सुरू करण्यामागचा उद्देश प्रवेशातील अवरोध कमी करून, जास्तत जास्त लोकांसाठी, विशेषतः नवीन गुंतवणूकदारांसाठी म्यूचुअल फंड गुंतवणूक उपलब्ध करण्याचा आहे. गुंतवणूकदाराने आधी कधीही उद्योग स्तरावर म्यूचुअल फंड ( SIP किंवा एकरकमी) मध्ये गुंतवणूक केलेली नसली पाहिजे. गुंतवणूकदाराने ग्रोथ ऑप्शनमध्येच गुंतवणूक केली पाहिजे आणि कमीत कमी ६० मासिक हप्ते भरण्यासाठी तो वचनबद्ध असला पाहिजे. हप्ते NACH किंवा UPI ऑटो-पे मार्फतच भरले पाहिजेत.

हा प्लॅन आपल्यासाठी अनुकूल आहे की नाही याबद्दल काही शंका असल्यास गुंतवणूकदाराने आपल्या आर्थिक तज्ज्ञाचा किंवा कर सल्लागाराचा सल्ला घ्यावा. कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड (KMAMC) कोणत्याही परताव्याची / भावी परताव्याची हमी देत नाही किंवा तसे वचन देत नाही.

## आज का अंदाज

शुक्रवार २१ मार्च २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| १२९ | ५०० | १२३ | ११७ | २२९ | १५८ | १४० | २३३ |
| ३९० | ६९० | २६८ | २७८ | ४९० | ३४७ | २५८ | ३६९ |
| २०० | ७८० | ३३० | ५६८ | ३०० | २२० | ३५७ | ४४० |
| २३ | ५३ | ६१ | ९१ | ३२ | ४२ | ५१ | ८१ |
| २७ | ५७ | ६४ | ९४ | ३० | ४० | ५९ | ८९ |
| २० | ५० | ६८ | ९८ | ३६ | ४६ | ५७ | ८७ |

२१ मार्चः सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# काली मा साकारण्याच्या प्रक्रियेत मला जे ज्ञान मिळते, तोच माझा सगळ्यात मोठा फायदा आहे : बरखा बिष्ट

**मुंबई, २० मार्च :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत दरबारी कवी आणि मुत्सद्दी तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) च्या सुरस आणि बुद्धीचातुर्याच्या कथांनी प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. सध्या सुरू असलेल्या नवीन अध्यायात बरखा बिष्ट दिव्य काली मा ची भूमिका साकारत आहे. जी विजयनगरावर मोठे संकट येणार असल्याचे भाकीत वर्तवते, त्यामुळे आपल्या साम्राज्याच्या रक्षणार्थ तेनाली रामा विजयनगरात परत येतो. तिच्या दिव्य वाणीमुळे तेनाली रामा सतर्क होतो आणि विजयनगर सम्राज्यावरील संकटाचा छडा लावून राज्याचे रक्षण करण्यासाठी सज्ज होतो. आपल्या दिव्य अस्तित्वाने काली मा तेनालीला मार्गदर्शन करते, त्याची परीक्षा घेते, ज्यामुळे कथानकात एक गूढता येते.

बरखा बिष्टने काली मा ही भूमिका साकारण्याचा अनुभव, तेनाली रामा मालिकेचे यश आणि इतर गोष्टींविषयी दिलखुलास गप्पा मारल्या.

तेनाली रामा मालिकेच्या नवीन अध्यायात तुला काली मा ही भूमिका ऑफर करण्यात आली, त्यावर तुझी पहिली प्रतिक्रिया काय होती?

मला जेव्हा पुन्हा काली मा ही भूमिका ऑफर करण्यात आली, तेव्हा मी रोमांचित झाले होते. तेनाली रामाचा हा दूसरा सीझन आहे आणि पहिल्या सीझनमध्ये मी ही भूमिका केली होती. या शो मध्ये पुनरागमन करताना खूप छान वाटले. मालिकेचा भाग होताना विशेष वाटले. एका पूज्य देवतेची भूमिका करणे ही एक मोठी जबाबदारी असते. विशेषतः आपल्या देशात, जेथे देवी देवतांचे एक अत्यंत पूज्य स्थान आहे. त्यामुळे ही भूमिका मिळणे हा मला माझा गौरव वाटला. काली मा पुन्हा पडद्यावर जिवंत करण्यासाठी मी उत्सुक होते.

काली मा ही भूमिका साकारण्यातील सर्वात सुखद बाब कोणती आहे?

काली मा ही भूमिका करण्याच्या प्रक्रियेत मला जे ज्ञान मिळते, त्याला तोड नाही. देवी देवतांवर अनेक पुस्तके आहेत, पण आपल्याला ती वाचण्याची संधी मिळतेच असे नाही. या भूमिकेच्या माध्यमातून मी काली मा विषयी खूप काही जाणले आहे. तिचा इतिहास, तिच्या विषयीच्या मान्यता आणि तिची शिकवण. तिची सुजाणता आणि तेनालीला ती जे धडे देते त्याचे सुंदर चित्रण या मालिकेत केले आहे. मला आशा आहे की, यातून प्रेक्षकांचा देखील काही तरी अर्थपूर्ण लाभ होईल.

इतके सामर्थ्य आणि दिव्यत्व असलेली देवता साकारण्यासाठी तू काय तयारी करतेस?

अशा भूमिकेसाठी काही निश्चित प्रकारच्या तयारीची गरज आहे, असे मला नाही वाटत. काली मा ही इतकी सामर्थ्यशाली आणि दिव्य आहे की, कितीही तयारी करून ते दिव्यत्व आत्मसात करणे माणसासाठी शक्यच नाही. मी इतकेच करू शकते की अत्यंत प्रामाणिकपणे आणि गांभीर्याने मी ही भूमिका करते. आणि आशा करते की, प्रेक्षकांना मी साकारलेली काली मा आवडेल.

यावेळी या व्यक्तिरेखेत काही नवीन तत्त्वे आहेत का?

एक देवता म्हणून काली मा कालातीत आहे. त्यामुळे तिच्या व्यक्तिचित्रणात फारसा बदल अपेक्षित नाही. परंतु, यावेळी पहिल्या सीझनच्या तुलनेत तिचे या कथानकातील अस्तित्व अधिक ठळक आहे. तेनाली रामाला मार्गदर्शन करण्यात तिची मोठी भूमिका आहे. यावेळी देवीची सुजाणता आणि तिची शिकवण प्रेक्षकांना अधिक जवळची वाटेल असे वाटते.

पौराणिक व्यक्तिरेखा अभिनेत्यांवर दीर्घकाळ छाप सोडतात. या भूमिकेचा व्यक्तिशः तुझ्यावर किती प्रभाव पडला आहे?

हे अगदी खरं आहे. अभिनेता म्हणून आम्ही अनेक भूमिका करत असतो. पण त्यातील काही भूमिकांचा प्रभाव अधिक काळ राहतो. शक्ती, चिवटपणा आणि सक्षमता याविषयी काली मा ने दिलेली शिकवण सदैव माझ्यासोबत असते. प्रत्येक महिलेत असलेल्या सामर्थ्याचे ती प्रतीक आहे. आणि तिची भूमिका करून माझे हे मत ठाम झाले आहे की, आपल्या सर्वांच्या मध्ये काली मा वास करते. बऱ्याचदा आपल्याला आपल्या शक्तीचे विस्मरण होते. पण ही भूमिका करत असल्यामुळे मला ही जाणीव सतत होत राहते.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला शारीरिक थकवा आणि अशक्तपणा जाणवेल. कौटुंबिक सदस्यापासून विभक्त होण्यामुळे तुम्हाला खूप दु:ख होईल. पायांच्या समस्या आणखी वाढतील. भविष्यात लाभ मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** आज अचानक तुमच्या घरी नातेवाईक येण्याची शक्यता आहे. जे तुम्हाला अपार आनंद देईल. जवळीक असेल, प्रेम संबंध नाही. पती-पत्नीमध्ये परस्पर समंजसपणा वाढल्याने संबंध सुधारतील.

**मिथुन :** महत्त्वाच्या कामात यश मिळण्याची चिन्हे आहेत. काही नवीन काम सुरू करू शकता. नातेवाईक आणि जिवलग मित्रांकडून सहकार्य मिळण्याची शक्यता आहे. कार्यक्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येतील.

**कर्क :** डोळ्यांशी संबंधित आजार खूप त्रासदायक ठरतील आणि तुमच्या आरोग्याबाबतच्या निष्काळजीपणाचा आज परिणाम होऊ शकतो. वैवाहिक जीवनात पत्नीच्या सहकार्यामुळे आनंद वाटेल.

**सिंह :** ऊर्जा आणि उत्साहाने परिपूर्ण असेल. सकारात्मक विचारांनी भरलेल. जर तुम्ही कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असाल तर तुमच्या तब्येतीत सुधारणा दिसून येईल.

**कन्या :** कोणाचे म्हणणे ऐकू नका. अन्यथा व्यवसायात अडथळे येऊ शकतात. आज तुमचे आरोग्य चांगले राहील. कोणताही रोग, त्रास इत्यादींचा तुमच्यावर परिणाम होणार नाही. नशेपासून दूर रहा.

**तुळ :** आज आर्थिक स्थिती खूप वाईट असेल. व्यवसायात कष्ट करूनही अपेक्षित नफा न मिळाल्याने पैशाची कमतरता भासणार आहे. कर्ज घेण्याच्या प्रयत्नातही विलंब होईल.

**वृश्चिक :** तुम्हाला तुमच्या सासरच्या मंडळींकडून काही शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळेल. आज उत्पन्नाच्या स्रोतांकडे लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा संचित संपत्ती कमी होऊ शकते.

**धनु :** आज मुलांच्या आनंदात वाढ होईल. जवळच्या मित्राची भेट होईल. परीक्षा स्पर्धेत यश मिळेल. नोकरीच्या ठिकाणी नवीन सहकारी मिळतील. व्यवसायात संयम आणि समर्पणाने काम करा.

**मकर :** आज कामाच्या ठिकाणी वाद वाढू शकतात. तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते. व्यावसायिकांची स्थिती सुधारेल. कष्टकरी लोकांची मेहनत वाढू शकते.

**कुंभ :** आर्थिक व्यवहारात अधिक सावधगिरी बाळगावी लागेल. व्यवसायात अज्ञात व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. लोक तुमच्या कार्यशैलीने प्रभावित होतील आणि तुमची अधिक प्रशंसा करतील.

**मीन :** गुप्त धन सापडेल अशी अपेक्षा ठेवणे योग्य नाही.कुटुंबातील सदस्यांशी काही महत्त्वाच्या विषयावर चर्चा होऊ शकते. घरगुती समस्या सुटतील. नवीन कृती आराखडा तयार केला जाईल.


# कार्यालय नगर परिषद, गोंदिया

जिल्हा-गोंदिया

ई-मेल - Chiefofficergondiya@gmail.com

क्रमांक नपगो/करविभाग/-/२०२५ दिनांक: १८/३/२०२५

## जाहीर सूचना

गोंदिया नगर परिषद हद्दीतील सर्व मालमत्ता व मोकळे भुखंड धारकांना या जाहीर सुचनेद्वारे सूचित करण्यात येते की सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर व इतर कराचे मागणी थकित झालेले आहे. परंतु आपण नगर परिषद कार्यालयास कराचा भरणा केलेला नाही, चालू व थकीत मालमत्ता कर न भरल्यास आपले नाव वृत्तपत्रात प्रकाशित करून चौका चौकात आपण थकबाकीदार असल्याबाबत आपल्या नावाचे फलक लावण्यात येईल, तसेच महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत, औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार जप्तीची कारवाई करण्यात येईल. थकीत मालमत्ता, मोकळे भुखंड धारकांची यामुळे मानहानी झाल्यास त्याची जवाबदारी थकबाकीदार याची राहील याबाबत कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

कराचा भरणा करून नगर परिषदेला सहकार्य करावे. सुटीचे दिवशी शनिवार आणि रविवार मालमत्ता कर विभाग सुरु राहिल.

मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद गोंदिया

# भूमिगत गटार योजना प्रक्रियेत मोठी अनियमितता

## आ.साजीद खान पठाण यांनी सभागृहात उचलला मुद्दा

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** अमृत योजनेच्या अंतर्गत महानगर पालिका हद्दीत भूमिगत गटार योजना राबविण्यात येणार आहे. मात्र या योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याची मुद्देसूद मांडणी करीत त्याबाबत सुधारणा केल्यानंतरच कामाला सुरुवात करावी अशी मागणी आमदार साजीद खान पठाण यांनी बुधवारी लक्षवेधी द्वारे विधिमंडळ सभागृहात केली. अमृत योजना अंतर्गत भूमिगत योजना अकोल्यात राबविण्यात येणार आहे. सदर योजना प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचे आ. पठाण म्हणाले.

विशेष म्हणजे ७०० कोटींच्या वर असलेली ही महत्वाकांक्षी योजनेचे कंत्राट कंत्राटदाराने १३ टक्के बिलो जाऊन भरले आहे. त्यामुळे या होणाऱ्या कामांची गुणवत्ता तपासणे गरजेचे आहे. कारण मागील काळात राबविण्यात आलेली अमृत योजने अंतर्गत झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहे. केवळ दोन वर्षातच सदर योजना देखभाल दुरुस्तीवर आली आहे.

आता या योजनेत केंद्र शासन सोबतच मनपा प्रशासनाला सुद्धा ४० टक्के फंड दयावा लागणार आहे. हा फंड मनपा आणणार कुठून ? असा फार मोठा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. तर ही भूमिगत गटार योजना अतिशय महत्त्वाकांक्षी अशी योजना असून शहर वासियांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. परंतु ही योजना अमलात आणताना दिसत आहे की, या योजना प्रक्रियेत शहरातील रस्ते मोठया प्रमाणात खोदल्या जाणार आहेत, एकप्रकारे संपूर्ण शहरच खोदल्या जाणार आहे मात्र या रस्त्यांच्या निर्मितीबाबत निर्मितीबाबत सदर निविदेत कुठल्याही प्रकाराचे नियोजन केले असल्याचे दिसून येत नाही ही फार गंभीर बाब आहे.

गेल्या तीन टर्म पासून महापालिकेत सुद्धा नगरसेवक म्हणून कार्य केले आहेत्यामुळे महापालिकेच्या आर्थिक स्थिती बाबत आपण चांगलेच अवगत असून मनपाने आजपर्यंत कुठलेच काम आपल्या निधीतून केले नसल्याचे आ. पठाण म्हणाले. या योजनेमुळे शहरातील खोदल्या जाणाऱ्या रस्त्यांच्या निर्मितीबाबत काही नियोजन नसल्याचे निदर्शनास आणून देत ही योजना कार्यान्वित व्हायच्या आधी या रस्त्यांच्या निर्मितीबाबत नियोजन करण्यात यावे तोपर्यंत योजना राबवू नये अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

### थकित करापोटी पुर्व आणि उत्तर झोन येथील

# मनपाची नऊ मालमत्तांवर सीलची कारवाई

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):**

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गीता ठाकरे आणि कर अधिक्षक विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पुर्व झोन अंतर्गत टॉवर चौक येथील पाडीया कॉम्प्लेक्स मधील वार्ड क्रं. अे-१ मालमत्ता क्रं. १९०२ ते १९०८ पर्यत एकुण सात मालमत्ता, धा.आशा पाडीया यांचेकडे २०२२-२३ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ६,२१,९१२/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या सातही मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई सहा.आयुक्त विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात झाली असून या कारवाईत पथक प्रमुख राजेश सरप, सहा.कर अधिक्षक देवेंद्र भोजने, प्रफुल हंबीर, कृष्णराव वाकोडे आदींची उपस्थिती होती.




तसेच अकोला महानगरपालिका क्षेत्रातील उत्तर झोन, अलंकार मार्केट येथील वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. ९३१ धा.कृषीधन सीड्स कंपनी विभागीय कार्यालय यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ७,९२,४७९/- मालमत्ता कर थकित असल्याने याचसोबत अलंकार मार्केट येथील वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. ६३७, भोगवटदार प्रकाश सैनानी नवरंग कॉम्प्यूटर्स व ईतर ६ यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये १,१०,४५४/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने दोन्ही मालमत्तांना सील करून अटकावणीची कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई सहा. आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनात व उपस्थितीत झाली असून या कारवाईत सहा. कर अधिक्षक हेमंत शेळवणे, मोहन घाटोळ, संतोष सुर्यवंशी, कनिष्ठ अभियंता स्वप्नील लहामगे, सुरक्षा रक्षक बाली इंगळे आदींची उपस्थिती होती. अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी ३१ मार्च २०२५ पर्यत मनपा व्दारा सुरू असलेल्या शास्ती अभय योजनेचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील व जप्ती सारख्या अप्रीय कारवाई टाळावे असे आवाहन मनपा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

### चोऱ्यांनी शहरात खळबळ,पोलिसांचा तपास सुरू

# पोलिसांची सुरक्षा व्यवस्था अपयशी,भुरट्या चोरट्यांमुळे पोलिसांवर ताण

**■मुर्तिजापुर,दि २० (प्रतिनिधी):** शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घालत सुरक्षेच्या दाव्यांना सुरुंग लावला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात १९ आणि २० मार्चच्या रात्री सलग दोन चोऱ्या घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

**पहिली चोरी:**१९ मार्चच्या रात्री दीडच्या सुमारास एका चोरट्याने हातगाडीवर झाकून ठेवलेल्या फळफळावळीतून फळे चोरली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरटा स्पष्टपणे कैद झाला असूनही तो बेधडकपणे चोरी करून पसार झाला. विशेष म्हणजे, याच वेळी पेट्रोलिंगसाठी गेलेल्या पोलिसांच्या डोळ्यांसमोरून चोरटा लपून पळून जाण्यात यशस्वी ठरला.



**दुसरी चोरी:**२० मार्चच्या रात्री एक ते अडीचच्या दरम्यान, काशमीरा मेडिकल अँड जनरल स्टोअरमध्ये चोरीचा दुसरा प्रकार घडला. अज्ञात चोरट्याने दुकानातून मोबाईल आणि ८ ते १० हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली. या घटनेने व्यापाऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.

**पोलिसांची कसून चौकशी:** घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव, पोलीस उपनिरीक्षक आशिष शिंदे आणि डीबी पथकाचे सुरेश पांडे, सुधीर दुबे, गजानन खेडकर व मंगेश विल्हेकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सखोल पंचनामा करत सीसीटीव्ही फुटेज जमा केले. यावरून आरोपीचा शोध सुरू करण्यात आला आहे.

**सुरक्षेवर प्रश्नचिन्ह:** सलग दोन रात्री एकाच भागात झालेल्या चोऱ्यांमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सीसीटीव्ही कॅमेरे लावले असतानाही चोरटे निर्धास्तपणे चोरी करत असल्याने स्थानिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

चोरट्यांचा शोध लावण्यात अपयशी ठरणाऱ्या पोलिसांवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही नागरिक तर तक्रार करण्यास देखील कचरत आहेत. पोलिसांनी त्वरित चोरट्यांचा शोध लावावा आणि सुरक्षाव्यवस्थेत सुधारणा करावी, अशी मागणी व्यापारी आणि नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत ठेवण्याचे आवाहन केले आहे. शहरातील गस्त वाढवण्याबरोबरच संशयास्पद हालचालींवर नजर ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# परंडा प्रभारी सरपंचाचे अतिक्रमण

## तक्रारकर्त्यांचा उपोषणाचाइशारा

**■बार्शिटाकळी,दि २० (प्रतिनिधी):** तालुक्यातील परंडा ग्रामपंचायतीचे प्रभारी सरपंच व उपसरपंच यांनी अतिक्रमण केल्याची तक्रार गटविकास अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आली आहे. तक्रारकर्त्याने दिलेल्या पत्रात उपोषणाचा इशारा दिला आहे. तक्रारकर्ते उमेश कोकाटे यांनी २५ फेब्रुवारी रोजी पंचायत समितीकडे परंडा येथील प्रभारी सरपंच व उपसरपंच यांनी अतिक्रमण केल्याची तक्रार दाखल केली होती. प्रभारी सरपंच व उपसरपंच यांनी पदाच्या दुरुपयोग करुन नियमाचा भंग केला आहे. त्यांनी केलेल्या अनधिकृत अतिक्रमणाबाबत, तक्रारकर्ते यांनी चौकशी करण्यासंबंधी अर्ज सादर करण्याला १० ते १२ दिवसांचा कालावधी उलटूनही संबंधितानी अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची चौकशी करून कार्यवाही केलेली नसल्याचे



तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.माझ्याकडे प्रभारी सरपंच पद आले. गेल्या दोन वर्षात कुठलाही भेदभाव न करता विकासाचे काम केले. बरीचशी कामे प्रगतीपथावर आहेत. उमेश कोकाटे हे गावात मटका व जुगार, दारू, गांजा विकत असून, मी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता त्याने माझ्याविरुद्ध सूडभावनेने तक्रार दाखल केली. डॉ. रवी कोकाटे, प्रभारी सरपंच, परंडा यांनी सांगितले.

# श्रीशिवमहापुराण कथा जीवनाचे सार आहे

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** भगवान शिव दर्शन कुणालाही सहज मिळत नाही. दगडांना जया प्रमाणे घाव सहन केल्यानंतर मूर्तीचा आकार मिळतो त्यानंतर त्या दगडाची पूजा केली जाते. त्याचं प्रमाणे मानवी जीवन असून अनेक घाव सहन करून तनआणि मनाने शिव आराधना केल्यावरच भगवान शिवाचे दर्शन होते. त्यांचसाठी श्री शिव महापुराण ऐकणे अती महत्वाचे असून श्री शिव महापुराण जीवनाचे सार असल्याचे कथेच्या दुसऱ्या दिवशी बालकथा व्यास पं. कृष्णाजी दूबे यांच्या अमृततुल्य वाणीतून सांगण्यात आले.



स्व. रामभाऊ हूसनाजी गवई व स्व. कलावतीबाई रामभाऊ गवई याचा स्मृतीतप्रिर्थ अनेक वर्षापासून भागवत कथेचे आयोजन करत आहेत.

यामध्ये गेल्या २ वर्षापासून शिवपुराण कथेचे आयोजन भव्य दिव्य रूपात करत आहेत आपल्या आई-वडिलांच्या स्व. रामभाऊ हसनाजी गवई व .सौ. स्व. कलावतीबाई रामभाऊजी गवई स्मृती प्रित्यर्थ श्री राजराजेश्वर महाराजांच्या कृपेने भारत विद्यालयाच्या बाजूला छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगणात आंतरराष्ट्रीय भागवत भूषण बालकथा व्यास पं. कृष्णाजी दृबे यांच्या अमृततुल्य वाणीतून काल १९ मार्च रोजी प्रारंभ झाला असून काल बालकथा व्यास पं. कृष्णाजी दृबे यांच्या अमृततुल्य वाणीतून अकोलसिंग राजा आणि दृष्टांत आणि अकोला शहराचे नामकरण तसेच ओळख ही कथा सादर केली होती. आज दुसऱ्या दिवशी भगवान शिव आणि त्यांच्या मार्फत निर्मित रुद्राक्ष यांचे प्रकार आणि त्यांचे महत्व विषद केले. २५ मार्चपर्यंत दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत श्री शिवमहापुराण कथा सप्ताह आयोजित केली आहे.आज दुसऱ्या दिवशी रुद्राक्ष आणि त्यांचे निर्मिती आणि महत्व सोबतच शबरी आणि केवट यांना भगवान शिवाने जंगलात कसे दर्शन दिले. शिव दर्शन होण्यासाठी प्रेम आणि मन ताकदवार करण्यासाठी नाम स्मरण मोठी ताकद असल्याचे सांगितले.

तर भगवान शिव आणि राम तसेच श्रीकृष्ण आणि माँ यशोदा यांचे दर्शन मिळावीण्यासाठी शिवाने केलेल्या युक्त्या सांगितल्या. शहरातील भविकांनी भगवान शिवाची कृपा आशिर्वाद प्राप्त करण्याकरिता शिवमहापुराण कथेचे श्रवण करुन आपले जीवन कृतार्थ करावे असे आवाहन आयोजक मधुकरराव गवई सौ. मालतीबाई मधुकररावं गवई यांनी केले आहे.

## रा.ल.तो.विज्ञान महाविद्यालयात पदवी प्रदान कार्यक्रम संपन्न

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी परीक्षा २०२४ मधील महाविद्यालयातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार व पदवी प्रदान कार्यक्रम दिनांक १८ मार्च २०२५ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. ॲड. मोतीसिंहजी मोहता, सिनेट सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती तथा अध्यक्ष, दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी अकोला होते. मा. डॉ. रामेश्वर भिसे, प्राचार्य, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच विशेष उपस्थितीमध्येमहाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. विजय नानोटी हे होते. मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंद्रवंशी, डॉ. पुनम अग्रवाल, शिक्षक प्रतिनिधी, कार्यकारणी समिती, दिबेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला, डॉ. सुशील नगराळे उपस्थित होते.

# महायुती शासनात राज्यातील जनता हैराण

**■अकोला,दि २० (प्रतिनिधी):** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार अकोला जिल्हा ग्रामीणच्या वतीने पक्ष संघटनवर महत्त्वपूर्ण बैठक संपन्न संपन्न झाली.स्थानीय शासकीय विश्रामगृह येथे आयोजित या सभेत पक्षाचे विदर्भ समन्वयक,माजी गृहमंत्री अनिलबाबू देशमुख व माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, ज्येष्ठ नेते दादासाहेब कोरपे, प्रदेश उपाध्यक्ष श्यामबाबू अवस्थी, डॉ आशाताई मिरगे, प्रा विश्वनाथ कांबळे, नागपूर जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंटे, महानगर निरीक्षक गणेश राय, ओबीसी विदर्भ अध्यक्ष भास्करराव पंडागळे नाईक आदी उपस्थित होते.या

बैठकीत सर्व प्रथम दिवंगत माजी आ प्रा तुकाराम बिडकर व बारामती येथील सौ.भारती पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करीत कार्यकर्त्यांनी पक्ष संघटनवर भर द्यावा असे आवाहन केले.यावेळी नेत्यांनी पक्षातील सर्वांना या महायुती शासनाद्वारे होत असलेल्या गैरप्रकार व जातीय सलोखा बिघडवण्याचे जे कार्य सुरू आहे त्यामुळे राज्यात शांती पसरवून लोकांमध्ये जाऊन जनतेला एकात्मतेचा संदेश देणे व पक्षाचे कार्य सुरू ठेवावे यावर सर्वांचे एक मत झाले. कार्यक्रमाचे



प्रास्ताविक ग्रामीण जिल्हाध्यक्ष संग्रामभैय्या गावंडे यांनी करून पदाधिकाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण सूचनाही नेत्यांसमोर मागवल्या.संचालन व आभार प्रदर्शन जिल्हा महासचिव आनंद वानखडे यांनी केले. बैठकीला प्रामुख्याने अकोट विधानसभा अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर, राजीव बोचे, तालुकाध्यक्ष अजय पागृत, कैलाश गोंडचर, शिवाजीराव म्हैसने, सतीश गावंडे, राजेश भाकरे, अशोकराव नराजे, श्रेयस चौधरी, मंगेश कुकडे, जिल्हा महासचिव विद्याताई अंभोरे महिला जिल्हाध्यक्ष सुषमा कावरे, युवती जिल्हाध्यक्ष मेघा पाचपोर, संगीता दाळू, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष कोकीळा वाहूरवाघ, सुनीता ताथोड, दीपमाला खाडे, चंदा चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष दिवाकर गावंडे, परिमल लहाने, श्रीधर मोरे, राजकुमार मंगळे, शामराव वाहूरवाघ, गोपाळराव कटाळे, सै. तफ्फजूल हुसैन, जि प सदस्य विशाल गावंडे, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र इंगोले , ज्ञानेश्वर काळणे असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



**बेकरी प्रक्रिया तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम, मिलेट प्रोसेसिंग सेंटर, कृषि अभियांत्रिकी शाखा, कृषि महाविद्यालय, अकोला येथे कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख उपस्थिती डॉ. आर. एम. गाडे, सहयोगि अधीष्ठाता, कृषि महाविद्यालय अकोला तसेच विभाग प्रमुख डॉ. एस. पी. दिवेकर,कृषि अभियांत्रिकी शाखा, आणि डॉ. व्ही. पी. खांमबलकर, डॉ. माधुरी गजबे व प्रशिक्षणार्थी**

### सेठ बन्सीधर विद्यालयाच्या शताब्दी महोत्सवांतर्गत

# माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळा

**■तेल्हारा,दि २० (प्रतिनिधी):** तेल्हारा येथील सेठ बन्सीधर हायस्कूलच्या स्थापनेचे व नामकरणाचे शताब्दी वर्ष सन २०२५ मध्ये प्रारंभ झाला असून येत्या शुक्रवार २१ मार्च २०२५ रोजी वय वर्ष ८०व त्यापेक्षा ज्येष्ठ माजी विद्यार्थी, आजी माजी सैनिक तथा मान्यवरांचा सत्कार व स्नेहमिलन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

शाळेच्या शताब्दी महोत्सवा अंतर्गत दि.२१मार्च रोजी शाळेत चंद्रकांत शांताराम शस्त्रसने यांनी संकलित केलेल्या २००० देशभक्त क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे द्वारा प्रदर्शित करण्यात येणार आहे. तद्वतच तेल्हारा तालुक्यातील भांबेरी येथील देशमुख गुरुजी यांनी संग्रहित केलेल्या इतिहासाकालीन नाणी, वस्तू यांचे प्रदर्शन ३ दिवस प्रदर्शित केले जाणार आहे.

सेठ बन्सीधर हायस्कूल येथील ज्येष्ठ सेवानिवृत्त १०१ वर्षीय शिक्षक दादासाहेब आवदे यांची स्नेहमिलन संमेलनात विशेष उपस्थिती लाभणार आहे. माजी विद्यार्थी- गुरुजन स्नेहमिलन समारंभानिमित्त दिनांक २२ व २३ मार्च रोजी विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले ८० वर्षे वयापेक्षा कमी वय असलेल्या नोंदणीकृत माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची स्वतंत्र व्यवस्था शाळा व्यवस्थापनाने केली आहे.

आनंद मेळावा, शाळा निरीक्षण आणि विविध पारंपारिक खेळदि२२ मार्च रोजी दुपारी ४ ते ६, वास्तु शतकपूर्ती निमित्त होम आहुती द्वारे विधी पूर्वक वास्तुपूजन समारंभ सायंकाळी ७ वाजता पंडित जितेंद्र महाराज छांगाणी यांच्या पौरोहित्याखाली संपन्न होणार आहे.

याच दिवशी व्याख्यान, कवी संमेलन, गीत गायन, नृत्य, सुंदरकांड तर रविवार २३ मार्च २०२५ रोजी प्रातःकाळी ६.३० वाजता शतकपूर्ती ध्वजारोहण आणि राष्ट्रगीत, ७.०० वाजता सामूहिक कवायत, विविध खेळ, सकाळी ११ वाजता समारोपीय कार्यक्रम मान्यवरांच्या व सेठ बन्सीधर दहिगावकर हायस्कूल एज्युकेशन सोसायटी संचालक मंडळाच्या उपस्थितीत संपन्न होणार असून स्नेहमिलन समारंभात सहभागी होणाऱ्या माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना नोंदणी वेळी ओळखपत्र प्रदान करण्याची व्यवस्था व्यवस्थापनाने केली आहे.


**जिल्हाधिकारी कार्यालय**
**उपजिल्हाधिकारी (रोहयो विभाग),अकोला**

**पाहिजे**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत अकोला जिल्ह्याकरीता सन २०२४-२५ या वर्षाचे संवैधानिक लेखापरिक्षणाकरीता संवैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक करावयाची आहे.

| जिल्हा | दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण | कालावधी |
|---|---|---|
| अकोला | उपजिल्हाधिकारी रोहयो, जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला. | दिनांक २१/०३/२०२५ ते दिनांक २८/०३/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यंत |

पात्रता, अटी व शर्ती तसेच इतर माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, (रोहयो विभाग),अकोला येथे akola.gov.in वर उपलब्ध आहे.इच्छुक सनदी लेखापालांनी जिल्हाधिकारी कार्यालय (रोहयो विभाग), अकोला येथे आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक २१/०३/२०२५ ते दिनांक २८/०३/२०२५ सायं ५.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक सादर करावेत.

Signed by
Vijay Ganpatrao Patil
उपजिल्हाधिकारी रोहयो,अकोला.
Date : 18.03.2025 14:25:07

क्र./अम/जाहि/१३२०/२०२४-२०२५



महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**सुचना-एसआरएम-८४**

खालील निविदा https://eprocurement.mahagenco.in वर प्रकाशित केल्या आहेत.

| अ. क्र. | ई-निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २१०मेगावॅट/डब्ल्यूटीपी/टी-७२५/आरएफएक्स-३०००५५८३९ | कोराडी टीपीएस (२१० मेगावॅट) मध्ये व त्याच्या आसपास विविध हवा व पाण्याच्या नमुन्यांचे सॅम्पलिंग व विश्लेषणाकरिता एक वर्षाचे कार्य कंत्राट. | रु. ६७,७५२.00 / रु. ६,४२५,२४०.६४ |
| २ | ६६0मेगावॅट/सीॲन्डआय/टी-७२६/आरएफएक्स-३०००५५३८७ | ३ × ६६० मेगावॅट, कोराडी टीपीएस येथील गव्हर्निंग सीस्टीमकरिता सर्व्हो व्हॉल्व्हज्चा पुरवठा. | रु. ४१,७२५.00 / रु. ३,८२२,५००.00 |
| ३ | ६६0मेगावॅट/डब्ल्यूटीपी/टी-७२७/आरएफएक्स-३०००५५८९९ | ३ × ६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथील वॉटर ट्रीटमेंट प्लान्टमध्ये ॲन्टी कोरोजिव्ह एफआरपी लॅडर्स, वॉकवे रेलिंग सपोर्ट ची रचना, आरेखन व प्रतिष्ठापन तसेच बल्क स्टोअरेज ॲसिड व अल्कली टँक्सवर ग्रेटिंग करिता कार्य कंत्राट. | रु. १९,३३७.00 / रु. १,५८३,७००.00 |
| ४ | ६६0मेगावॅट/ईएमटी/टी-७२८/आरएफएक्स-३०००५५९१0 | ३ × ६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे जशी व जेव्हा आवश्यकता असेल त्यानुसार सबमर्सिबल पंप मोटर्सची दुरुस्ती व रिवाइंडिंगकरिता कार्य कंत्राट. | रु. १२,४२१.00 / रु. ८९२,१५८.00 |
| ५ | ६६0मेगावॅट/सीॲन्डआय/टी-७२९/आरएफएक्स-३०००५५९४६ | ३ × ६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे ओ२ ॲनलायझर कम्प्लीट असेम्ब्लीचे प्रापण. | रु. ४७,९६१.00 / रु. ४,४४६,१००.00 |
| ६ | २१0मेगावॅट/सीएचपी/टी-७३0/आरएफएक्स-३०००५५९९0 | सीएचपी २१० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथील महत्त्वाच्या कन्व्हेयर ड्राइव्ह सीस्टीमकरिता आवश्यक महत्त्वाच्या फ्लुईड कपलिंग एफसी - २० चे प्रापण. | रु. ६,३४५.00 / रु. २८४,५००.00 |

ई-निविदेसाठी विक्रेत्यांना त्यांच्या संस्थेची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशिलासाठी संकेतस्थळावर लॉग ऑन करा.
कोणत्याही प्रश्नांकरीता संपर्क साधावा: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: +९१-८४११९५८६२२, ई-मेल आयडी: eepurchasekoradi@mahagenco.in

हस्ता/-
**मुख्य अभियंता (ओ ॲण्ड एम)**
**महानिर्मिती,केटीपीएस,कोराडी**


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# महिलांमध्ये वाढतेय अर्थभान

गेल्या पाच वर्षांत भारतातील महिला कर्जदारांची संख्या २२ टक्क्यांनी वाढली असल्याचे एक अहवाल दर्शवतो. त्याचप्रमाणे महिलांच्या कर्जाचा मोठा भाग उपभोग मागणी पूर्ण करण्यासाठी होता आणि व्यवसायांसाठी तुलनेने कमी कर्जे घेतली गेली, ही बाबही यातून समोर येते. हा अहवाल ट्रान्सयुनियन सिबिल, नीती आयोगाच्या महिला उद्योजकता प्लॅटफॉर्म आणि मायक्रोसेव्ह कन्सल्टिंग यांनी अलिकडेच प्रकाशित केला आहे.

नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुब्रमण्यम यांनी दिलेल्या निवेदनानुसार, २०१९ ते २०२४ या काळात भारतात कर्ज घेणाऱ्या महिलांची संख्या २२ टक्क्यांच्या दराने वाढली आहे. महिला



कर्जदारांसाठी उपभोग कर्ज हे पसंतीचे उत्पादन असले तरी, आता अधिकाधिक महिला व्यवसाय कर्जेदेखील घेत आहेत. अहवालात म्हटले आहे की, २०२४ मध्ये महिलांनी व्यवसायांना वित्तपुरवठा करण्यासाठी फक्त तीन टक्के कर्जे घेतली होती तर ४२ टक्के कर्जे वैयक्तिक कर्जे, ग्राहकोपयोगी टिकाऊ कर्जे, गृहमालकी यासारख्या वैयक्तिक वित्त उत्पादनांसाठी आणि ३८ टक्के कर्जे सोन्यावर घेतली होती.

अर्थविचार

अहवालानुसार, व्यवसायासाठी उघडलेल्या कर्ज खात्यांची संख्या आता ४.६ पट वाढली आहे, परंतु २०२४ मध्ये महिलांनी घेतलेल्या एकूण कर्जांपैकी ही कर्जे फक्त तीन टक्के आहेत.

भारतातील अधिकाधिक महिला कर्ज मागत आहेत आणि आपल्या क्रेडिट स्कोअरवर सक्रियपणे लक्षही ठेवत आहेत. डिसेंबर २०२४ पर्यंत सुमारे २.७ कोटी महिला आपल्या कर्जाचा मागोवा घेताना दिसल्या. नक्कीच हे त्यांच्या वाढत्या आर्थिक जागरूकतेचे प्रतिबिंब आहे. कर्ज घेणाऱ्या महिलांपैकी ६० टक्के महिला शहरी आणि ग्रामीण भागातील असल्याचेही हा अहवाल स्पष्ट करतो. महिलांची तरुण पिढीही त्यांच्या कर्जावर देखरेख ठेवण्यात आघाडीवर आहे. या पार्श्वभूमीवर महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हा भारतातील कार्यबलात प्रवेश करणाऱ्या महिलांसाठी रोजगाराच्या संधी सुनिश्चित करण्याचा एक मार्ग आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

# अस्मिता






# सागरसम्राज्ञी अन्यया

मानिनी

समुद्राच्या खोल पाण्यात एकटीने तब्बल ३,000 मैलाचा प्रवास करणे कसे असेल याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? पण बेंगळुरूच्या रहिवासी असणाऱ्या अनन्या प्रसादने हे करुन दाखवले. ३४ वर्षीय अनन्याने एकटीने अटलांटिक महासागर पार केला. त्यासाठी तिला सलग ५२ दिवस कठीण प्रवास करावा लागला. या काळात तिने केवळ शारीरिक आणि मानसिक ताकदीचेच प्रदर्शन घडवले नाही तर मानसिक आरोग्य आणि गरजू मुलांसाठी १.५ लाख पौंडांपेक्षा जास्त निधीही उभा केला. म्हणूनच अनन्याचे हे धाडसी पाऊल केवळ वैयक्तिक कामगिरीच नाही तर समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी एक मोठे प्रयत्न आहे, असे म्हणावे लागेल.

अनन्याचा हा प्रवास ११ डिसेंबर २०२४ रोजी कॅनरी बेटांमधील ला गोमेरा येथून सुरू झाला आणि ३१ जानेवारी २०२५ रोजी अँटिग्वा येथे संपला. प्रसिद्ध कन्नड कवी जी एस शिवरुद्रप्पा यांची नात असणाऱ्या अनन्याने तिला मिळालेला सांस्कृतिक वारसा आणि वैयक्तिक आकांक्षा यांचा उत्तम संयोग साधत ही सहल आखली आणि पूर्ण केली. अनन्याने या सहलीची तयारी करण्यासाठी तीन वर्षांहून अधिक काळ कठोर प्रयत्न केले. यामध्ये विशेष रोइंग तंत्रांचे प्रशिक्षण, शारीरिक ताकद आणि सहनशक्ती वाढवणे तसेच मानसिक कणखरता वाढवणे याचा समावेश होता.

या सोलो प्रवासात अनन्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. धोकादायक समुद्री परिस्थिती, ऑर्का व्हेलशी झालेला सामना, खराब हवामान आणि प्रवासात सुकाणूला क्षती पोहोचल्यामुळे उद्‌भवलेल्या गंभीर समस्यांना तिला तोंड द्यावे लागले. पण तांत्रिक कौशल्य आणि मानसिक बळावर तिने हार न मानता प्रवास सुरूच ठेवला. अनन्या दररोज सुमारे ६०-७० किलोमीटर अंतर कापत असे. आहार आणि पाण्याच्या चोख योजनेमुळे तिला या कठीण परिस्थितीत टिकून राहण्यास मदत झाली.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे अनन्याचा हा प्रवास केवळ वैयक्तिक कामगिरी नव्हता तर समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे हे त्यामागील उद्दिष्ट होते. या प्रवासातून तिने दक्षिण भारतातील अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या 'मेंटल हेल्थ फाउंडेशन' आणि 'दीनबंधू ट्रस्ट'साठी १.५ लाख पौंडापेक्षा जास्त निधी उभारला. या योगदानातून वैयक्तिक प्रयत्नही समाजात मोठे बदल घडवून आणू शकतात, हे दिसून येते.

अनन्याचा प्रवास एक मजबूत संदेश देखील देतो. तो महिला आणि सामान्यजनांना धैर्य आणि प्रेरणा देतो. लोकांमधील पारंपरिक साहसी खेळांना प्रोत्साहन देण्याचे मोठे काम याद्वारे आपसूकच होते. अनन्याने तिचा संघर्ष सर्वांसोबत शेअर केला आणि सोशल मीडियावर या प्रवासाची माहिती दिली. यातूनही इतरांसाठी प्रेरणास्रोत निर्माण झाले असणार यात शंका नाही. या सगळ्या प्रवासातून तिचे धैर्य, जबाबदारी आणि बदलाची शक्ती प्रतिबिंबित होते. ती नवे काही करण्याची ऊर्जा देतो. अन्यन्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.



# प्रवासाची सज्जता करताना...

भटकंती

लवकर सुट्टीचा काळ सुरू होईल. तेव्हा आत्तापासूनच प्रवासाचं नियोजन सर्वात महत्त्वाचे आहे. त्यासाठी आधी तुमचं बजेट ठरवा. नंतर त्या बजेटमध्ये कुठे जाता येईल याचा विचार करा. परदेशात जायचं की भारतातच फिरायचं हे आधी ठरवा. ठिकाण ठरलं की प्रवासाचं माध्यम ठरवा. विमानानं जाणार असाल तर तिकिटं लवकर बुक करा. विमानाचं भाडं सतत वाढत राहतं. ट्रेनचं तिकिटही लवकर बुक करा. यामुळे तुम्ही वेटिंग लिस्टच्या कचाट्यात सापडणार नाही.

* फिरायच्या ठिकाणी सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करा. मेट्रो, बस, टॅक्सी यांनी प्रवास करा. यामुळे तुम्हाला शहराची माहिती होईल आणि पैसेही वाचतील. विमानानं प्रवास करायचा असेल तर पहाटे किंवा रात्रीचं विमान घ्या. या वेळात विमानाचं भाडं कमी असतं.

* हॉटेलवर फार खर्च करू नका. ठिकठाक आणि प्राथमिक गरजा पूर्ण करणारं हॉटेल निवडा. स्वच्छतेचा विचार करा. हॉटेलमध्ये फार सोयीसुविधा नसल्या तरी चालतील.

* तुम्ही कुटुंबासह किंवा मित्र-मैत्रिणींसोबत फिरायला जाणार असाल तर त्या ठिकाणी पोहोचल्यावर एकट्यानं भटकंती करायला आलेल्या किंवा कुटुंबासह आलेल्या लोकांशी मैत्री करा. त्यांच्यासोबत फिरा. यामुळे प्रवास आणि जेवणाचा खर्च वाटून घेता येईल.

* ज्या शहरात किंवा राज्यात फिरायला जाणार असाल तिथले प्रसिद्ध पदार्थ खा. उगाचच हॉटेलमध्ये पंजाबी किंवा तत्सम खाण्यावर पैसे घालवू नका. तिथली स्वस्तात खाणं मिळण्याची ठिकाणं शोधा. ॲप्सवरून काही हॉटेल्स शोधता येतील.

# काम होईल सोपे


नोंद घ्या

येत्या काळात बरेच लग्नमुहूर्त आहेत. तेव्हा तुमच्याही घरात मंगलकार्य असेल तर पाहुण्यांची यादी आलीच. पाहुण्यांची यादी, मेन्यूची यादी, खरेदीची यादी, इतर कामांची यादी... या यादीला अंतच नसतो. या याद्या करणं म्हणजे डोक्याला शॉटच! पण टेक्नॉलॉजीनं हे काम सोप्पं केलंय. 'एव्हरनोट' नावाच्या ॲपवर तुम्ही याद्या करू शकता. या याद्यांना रंगही देता येतील. शिवाय या याद्या अपडेटही करता येतील. मग याद्या करण्याचं काम सोपं झालं ना?

* लग्नप्रसंगी मस्त बारीक दिसायला हवं. तुमचं वाढलेलं वजन कमी करण्यासाठी टिप्सही हव्यातच ना. डाएटिशियनकडे जायला फार वेळ नाहीए. मग करायचं तरी काय? 'फिटोक्रसी' नावाचं ॲप तुम्ही डाऊनलोड करू शकता. या ॲपवर तुमच्या शारीरिक हालचाली, व्यायाम, एअरोबिक्स यांची नोंद ठेवता येईल. यावर पॉईंट्ही मिळत जातील. खास लग्नाळूंसाठीचं हे ॲप आहे.






* लग्न म्हणजे खिशाला चाट. प्रचंड उधळपट्टी. बजेट, सेव्हिंग्ज, सगळ्याची वाट लागते. आपलं लग्न आऊट ऑफ बजेट जाऊ नये यासाठी 'मिंट' ॲप डाऊनलोड करा. या ॲपमुळे तुम्हाला खर्चावर नियंत्रण ठेवता येईल. जास्त खर्च करत असाल तर त्याची सूचना तुम्हाला दिली जाईल.

* लग्नप्रसंगी फोटोग्राफर हवाच. पण तुमच्या मित्र-मैत्रिणींनी, नातेवाईकांनी काढलेले फोटो धम्माल असतात. 'वेडपिक्स' या ॲपद्वारे लग्नाचे फोटो क्लिक करून इतरांसोबत शेअर करता येतील. तुमच्या मित्र-मैत्रिणीचं लग्न असेल तर तुम्हीही त्यांचे फोटो काढू शकता. काही हटके क्षण तुम्हाला कॅमेऱ्यात बंदिस्त करता येतील.

* लग्न म्हणजे भरपूर पाहुणे. पाहुण्यांची वर्दळ सतत सुरू असते. या गोंधळात एखाद्याला गाठणं महाकठीण काम. निरोप द्यायचा तर सगळ्यांना फोन करणं वैतागवाणं असतं. अशा वेळी 'ग्रुप कम्युनिकेशन' ॲप तुम्हाला डाऊनलोड करता येईल. तुमचा ग्रुप तयार करा आणि एकाच वेळी सगळ्यांना मेसेज पाठवा.

# ऋतूबदलातील आहारशास्त्र

बदलत्या हवामानामुळे अनेकींना पोटाच्या समस्यांना सामोरे जावे लागते. तेव्हा तुम्हालाही हवामान बदलल्यामुळे पोट खराब होण्याची समस्या जाणवत असेल पचनसंस्थेतील बदल हे याचे कारण असू शकते हे जाणून घ्या. या समस्येपासून सुटका करुन घेण्यासाठी आहारात काही विशेष बदल करावे लागतील. अर्थात केवळ आहारात सुधारणा करूनच नव्हे तर योग्य वेळी योग्य आहार घेतल्यानेही पचनसंस्था मजबूत करता येते. तुमची पचनक्रिया सुधारू शकणाऱ्या अशाच काही पदार्थांबद्दल आज जाणून घेऊ या.

* बदलत्या हवामानात साखर आणि तेलकट पदार्थ पचनक्रिया आणखी बिघडवू शकतात. यामुळे पोटात जळजळ, गॅस आणि अपचन यासारख्या समस्या वाढू शकतात. म्हणूनच तळलेले पदार्थ टाळा. हलके जेवण खा.

* हळदीमध्ये दाहविरोधी गुणधर्म असतात जे पोटाच्या विकारांपासून आराम देतात. हळद पचनसंस्था स्वच्छ तसेच मजबूत करते. एक चमचा हळद मधात मिसळून घेतल्याने पोटातील संसर्ग आणि जळजळ दूर होते. तुम्ही हळद दुधात घालून देखील घेऊ शकता.

* ताजी फळे आणि भाज्या पचनासाठी खूप फायदेशीर असतात. त्यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर भरपूर असल्याने पचनसंस्था निरोगी राहते. म्हणूनच विशेषतः सफरचंद, गाजर आणि पालक यांचा आहारात समावेश करा. यामुळे केवळ पोट स्वच्छ होणार नाही तर शरीराला योग्य पोषण देखील मिळेल.

* केळीमध्ये पेक्टिन नावाचे फायबर असते जे कार्बोहायड्रेट्सचे पचन नियंत्रित करते. आतड्यांसाठी देखील केळी खाणे फायदेशीर आहे कारण त्यातील प्रोबायोटिक्स आतड्यांमध्ये चांगल्या बॅक्टेरियांची वाढ घडवतात. थोडक्यात केळीचे नियमित सेवन आतड्यांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरते.



फिटनेस फंडा

* ओट्समध्येही भरपूर प्रमाणात फायबर असते. मुख्य म्हणजे यात कॅलरीज कमी असतात. ओट्स पचनसंस्थेचे कार्य योग्य पद्धतीने सुरू ठेवण्यास मदत करतात तसेच शरीरातील टाकाऊ पदार्थ काढून टाकण्यासही मदत करतात. यामध्ये फॉस्फरस, व्हिटॅमिन ई आणि झिंकदेखील असते जे शरीराला महत्त्वाचे पोषणमूल्य पुरवते. त्यामुळेच बदलत्या वातावरणात तुम्ही आहारात या सगळ्या घटकांचा समावेश करायला हवा.


# संतुलन जपायचं तर...

आरोग्य

शरीरात जाडीशी संबंधित तीन प्रकारची संप्रेरकं पहायला मिळतात. लेप्टीन, इन्सुलिन आणि टेस्टोस्टेरॉन अशी त्यांची नावं आहेत. या संप्रेरकांच्या प्रमाणित मात्रेपेक्षा कमी अथवा अधिक प्रमाण आढळून आलं तर असंतुलन निर्माण होतं. लेप्टीन या संप्रेरकाला मास्टर हार्मोन असं म्हटलं जातं. या संप्रेरकामुळे शरीरात पर्याप्त ऊर्जा संग्रहीत असल्याचे संदेश मेंदूपर्यंत दिले जातात. पर्यायानं मेंदू पोट भरल्याची जाणीव उत्पन्न करतो आणि आहार थांबवला जातो. जेवताना या संप्रेरकाची निर्मिती होते. मात्र त्यात व्यत्यय आल्यास मेंदुला मिळणारे संदेश थांबतात. पर्यायानं भूक भागल्याची भावनाच उत्पन्न होत नाही. यामुळे अतिरिक्त प्रमाणात अन्नाचं सेवन होतं आणि जाडी वाढू लागते. ताणतणाव, आहारात मैदा आणि साखरेचं अतिरिक्त सेवन यामुळे या संप्रेरकामध्ये असंतुलन निर्माण होतं. म्हणून प्रोटीनयुक्त आहार घेणं, आठ तास शांत झोपणं, तेल आणि तुपाचं प्रमाण मर्यादित ठेवणं, वेटलिफ्टिंग आणि कार्डिओ एक्झरसाईज करणं तसेच पॅकेटबंद अन्नघटकांचं सेवन थांबवणं हे या संप्रेरकामध्ये संतुलन टिकवण्याचे उपाय आहेत.

इन्शुलिन हे संप्रेरक शरीरातील चरबीविषयक संदेश देण्याचं काम करतो. या संप्रेरकामध्ये असंतुलन निर्माण झाल्यास कंबरेखाली चरबी साठू लागते. हे टाळायचं असेल तर आहारात साखर, मीठ, मैदा, व्हाईट ब्रेड आदी कार्बोहायड्रेड युक्त पदार्थांचं सेवन सीमित करायला हवं.

टेस्टोस्टेरोन या संप्रेरकातील असंतुलनामुळे मांसपेशींवरचं नियंत्रण कमी होतं, शरीराची ताकद कमी होते, हाडं कमकुवत होतात आणि चिडचिडेपणा वाढतो. हे धोके टाळण्यासाठी चौरस आहार घेणं आणि नियमित व्यायाम करणं गरजेचं ठरतं.



लक्ष द्या

## कचऱ्यातून कलेकडे




भारतात दरवर्षी सुमारे ४.४० अब्ज टन टोमॅटोचे उत्पादन होते आणि यातील सुमारे ३०-३५ टक्के टोमॅटो वाया जातात. पण 'द बायो कंपनी' ने या वाया जाणाऱ्या टोमॅटोच्या कचऱ्यापासून बायो-लेदर तयार करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. या प्रक्रियेत पॉलीयुरेथेन आणि पॉलीव्हिनिल क्लोराईड वापरले जाते. यातून पारंपरिक बनावट लेदरपेक्षा अधिक टिकाऊ आणि पर्यावरणास अनुकूल उत्पादन मिळते, असा कंपनीचा दावा आहे. टोमॅटोमध्ये आढळणारे पेक्टिन आणि इतर नैसर्गिक घटक या उत्पादनाला अतिशय मजबूत बनवतात आणि ते खऱ्या चामड्यासारखे वाटते. या नाविन्यपूर्ण स्टार्टअपची सुरुवात २६ वर्षीय प्रीतेश मिस्त्री यांनी केली असून 'द बायो कंपनी' (टीबीसी) ही त्यांची संस्था आहे. त्यांच्या प्रयत्नांना व्हेगन फॅशन अवॉड्र्समध्ये 'सर्वोत्कृष्ट नवोन्मेष' पुरस्कारही मिळाला आहे.

प्रेरक

## वेळ दवडू नका

मासिक पाळीच्या वेळी शरीरातून बाहेर पडणारे रक्त कधीकधी घट्ट होते आणि गुठळ्यांच्या स्वरूपात बाहेर पडते. या गुठळ्या लहान किंवा मोठ्या असू शकतात तर त्यांचा रंग हलका लाल ते गडद लाल रंगाचा असू शकतो. हे गोठलेले रक्त ऊतींसारखे, जेलसारखे दिसते. पण प्रत्येक वेळी मोठ्या गुठळ्या दिसल्या तर ही स्थिती सामान्य नसल्याचे जाणा आणि वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घ्या. गर्भाशयात गाठी तयार झाल्यामुळे जास्त रक्तस्त्राव होतो तेव्हा गर्भाशयातील फायब्रॉइड्सचा त्रास असू शकतो. गर्भाशयाचे अस्तर स्नायूंमध्ये वाढते तेव्हा ॲडेनोमायोसिसची शक्यता वाढते तर गर्भाशयाचे आतील आवरण शरीराच्या इतर भागांमध्ये वाढू लागते तेव्हा एंडोमेट्रिओसिसचा धोका असतो.



परफेक्ट

## खात्रीशीर आणि वेदनाविरहित परिणाम



शरीरावरील नकोसे केस काढून टाकण्यासाठी शेव्हिंग, वॅक्सिंग, थ्रेडिंग आणि डिपिलेटरी क्रीम अशा विविध पद्धतींचा अवलंब केला जातो. मात्र कायमस्वरुपी हा त्रास घालवण्यासाठी लेसर प्रक्रिया करणे सोयीचे ठरते. या प्रक्रियेचे अनेक फायदे आहेत. जसे की, लेसरमुळे केस कायमचे काढून टाकण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार केस काढण्याची गरज नाहीशी होते. काही वेळा नियमितपणे लेसर प्रक्रिया केल्यास कायमस्वरूपी निकाल मिळतो. ही प्रक्रिया त्वचेसाठीही सुरक्षित आहे. ती फक्त केसांच्या रंगद्रव्यावर (मेलेनिन) काम करते आणि त्वचेच्या इतर पेशींना हानी पोहोचवत नाही. याचा अर्थ त्वचेचे कोणतेही नुकसान होत नाही. मुख्य म्हणजे ती कमी वेदना अगदी वेदनारहित परिणाम दाखवते.

# मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतरही अंबाझरी उद्यानाला टाळे

## आ. विकास ठाकरेंनी विधानसभेत मांडला मुद्दा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :** पश्चिम नागपूरचे आमदार आणि नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेसचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी आज विधानसभेत गंभीर आरोप करताना सांगितले की, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या उभारणीला १७ महिन्यांचा विलंब हा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) भ्रष्ट कारभारामुळे झाला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १७ महिन्यांपूर्वी आदेश दिले असतानाही एमटीडीसी अंबाझरी उद्यान नागरिकांसाठी खुले करत नाही, असा घणाघाती आरोप त्यांनी केला. फडणवीस यांनी आदेश दिले, मग अंमलबजावणी का नाही? असे त्यांनी विचारले.

१८ ऑक्टोबर २०२३ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी अंबाझरी उद्यान नागरिकांसाठी तत्काळ खुले करण्याचे, स्मारकाचे बांधकाम राज्य सरकारच्या निधीतून करण्याचे आणि गरुडा अम्यूझमेंट्सचा करार रद्द करण्याचे आदेश दिले होते. आता फडणवीस मुख्यमंत्री असतानाही त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही, असे ठाकरे यांनी सभागृहात स्पष्ट केले.

एमटीडीसी सार्वजनिक बांधकाम विभागाला ना हरकत प्रमाणपत्र देत नाही. पीडब्ल्यूडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करून ठेकेदारालाही कामाचा आदेश दिला आहे. मात्र, एमटीडीसीकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने स्मारकाचे भूमिपूजन आणि प्रत्यक्ष काम रखडले आहे, असे ठाकरे यांनी सभागृहात सांगितले.

**उद्यान जनतेसाठी बंद**

ठाकरे यांनी हेही निदर्शनास आणून दिले की, पाच वर्षांपासून गरुडा अम्यूझमेंट्स उद्यानावर अतिक्रमण करून बसले आहे. परिणामी, जनतेला उद्यानाचा वापर करता येत नाही. त्यांनी उद्यान तातडीने खुले करण्याची आणि गरुडा अम्यूझमेंट्सचा करार त्वरित रद्द करण्याची मागणी केली.

ठाकरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, एमटीडीसीने उद्यान ताब्यात घेतल्यापासून जनतेच्या हिताची कोणतीही काळजी घेतलेली नाही, उलट गरुडा अम्यूझमेंट्सला फायदा होईल अशाच योजना आखल्या जात आहे. एमटीडीसी आणि गरुडा अम्यूझमेंट्स यांच्यात बार, क्लब, रेस्टॉरंट, फंक्शन लॉन उभारण्याचा डाव आहे. त्यामुळेच एमटीडीसी स्मारक आणि उद्यानाचे काम अडवून ठेवत आहे, असा गंभीर आरोप ठाकरे यांनी केला.

**शांत बसणार नाही**

आमदार विकास ठाकरे यांनी सातत्याने मागणी केली आहे की, अंबाझरी उद्यानाची ४४ एकर जागा परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी द्यावी. जनतेला न्याय मिळेपर्यंत मी शांत बसणार नाही, असा ठाम इशारा आमदार विकास ठाकरे यांनी दिला आहे.

# नागपूर दंगल | आरोपी नागपूरमधील नाहीत!

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** नागपूर हिंसाचार प्रकरणातील आरोपी हे नागपूरचे नाहीत, असा खुलासा सायबर पोलिसांनी केला आहे. सर्व तपास सुरू असून घोषणाबाजी करणाऱ्यांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सायबर पोलिसचे डीसीपी लोहित मतानी यांनी पत्रकार परिषदेत घेत ही माहिती दिली. सोशल मीडियावरील पोस्ट ब्लॉक करण्याचे काम सुरू आहे, असेही लोहित मतानी यांनी नमूद केले आहे.

नागपूर हिंसाचार प्रकरणात बांगलादेशचे कनेक्शन असल्याची माहिती समोर आली होती. यावर बोलताना लोहित मतानी म्हणाले की, नागपूर हिंसाचारामागे बांगलादेशचे कनेक्शन आहे की नाही याबाबत तपास सुरू आहे. कोणाच्या प्रोफाईलमध्ये बांगलादेश लिहिल्याने आम्ही त्यावर कोणतीही टिपणी करू शकत नाही.

**५० टक्के पोस्ट ब्लॉक**

नागपूर हिंसाचारासाठी वादग्रस्त मजकुराचे अनेक फेसबुक पेज सापडले आहेत. त्यावर जिहादी आणि अतिरेकीसारखा मजकूर आहे. यापुढे कोणतीही अनुचित घटना घडू नये, तेढ वाढू नये यासाठी सोशल मीडियावरील पोस्ट ब्लॉक करण्याचे काम सुरू आहे. अशा प्रकारचे सोशल मीडियावरील १७ ते १९ तारखेपर्यंतचे सर्व पेजेस ब्लॉक करण्यासाठी आम्ही संबंधित एजन्सीला पाठवले आहेत.

आतापर्यंत ५० टक्के पोस्ट ब्लॉक केलेल्या आहेत. त्यामध्ये ५० टक्के पोस्ट ब्लॉकही झाल्या आहेत. इतर पोस्ट लवकर ब्लॉक होतील. हिंसाचार प्रकरणातील आरोपी फहीम खान हा सायबर गुन्ह्यातही आरोपी आहे, अशी माहिती सायबर पोलिसचे डीसीपी लोहित मतानी यांनी दिली आहे.



### फहीम खानसह ६ जणांवर देशद्रोहाचा गुन्हा



पोलिसांवर झालेली दगडफेक ग्लोरिफाय केली होती. त्यासोबत अल्लाहू अकबर, सर तनसे जुदा असे कॅप्शन टाकलेले आहेत. हे सर्व हिंसाचाराला बढावा देण्यासाठी अशा प्रकारच्या पोस्ट करण्यात आल्या. अशा लोकांवर देशद्रोहाचे कलम लावण्यात येईल. आतापर्यंत ६ आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केलेला आहे. त्यामध्ये फहीम खानचाही समावेश आहे. देशद्रोहाचा गुन्ह्यात आणखी आरोपींचा समावेश होईल, असे लोहित मतानी यांनी सांगितले. नागपूर हिंसाचार प्रकरणात एनआयए तपास करणार की, नाही याबाबत केंद्र सरकार निर्णय घेईल. तर एटीएसचा निर्णय हा राज्य सरकार घेईल, असेही लोहित मतानी यांनी सांगितले.

### विहिंपच्या आंदोलनाचा व्हिडिओ छेडखानी करून पसरवला

विश्व हिंदू परिषदेच्या आंदोलनाच्या व्हिडिओची छेडखानी करून तो पसरवण्यात आला होता. काही लोकांनी हिंसाचाराचे व्हिडिओ पसरवून आणखी हिंसाचार घडवण्यासाठी आवाहन केले होते. काहींनी औरंगजेबाचा नवीन व्हिडिओ व्हायरल करून कुठे ना कुठे हिंसाचाराला बढावा दिला. फहीम खानच्या सोशल मीडिया अकाउंटवरून आक्षेपार्ह पोस्ट मिळाल्या आहेत. व्हायलन्सच्या पोस्ट मिळाल्या आहेत. या पोस्टमुळेच ही घटना घडली, असे लोहित मतानी यांनी सांगितले. फहीम खान हा ३०/२५ मध्ये आरोपी आहे आणि त्याच्यावर १५२ हे कलमही लावण्यात आले आहे.

## नागपूर हिंसाचाराचे बांगलादेश कनेक्शन उघड

नागपूर हिंसाचार प्रकरणात गुरुवारी बांगलादेश कनेक्शन समोर आले आहे. सोशल मीडिया पोस्टवरील एका वापरकर्त्याने धमकी दिली की सोमवारची दंगल ही फक्त एक छोटीशी घटना होती आणि भविष्यात मोठी दंगली होईल. सायबर सेल या प्रकरणाची चौकशी करत आहे.

**भविष्यात मोठ्या दंगलीचा इशारा..**

दरम्यान, पोलिसांनी आतापर्यंत ८४ जणांना अटक केली आहे, ज्यात मास्टरमाइंड फहीम शमीम खानचाही समावेश आहे. तथापि, बुधवारी महाराष्ट्राचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी ही संख्या ६९ असल्याचे सांगितले होते. यामध्ये विहिंपच्या आठ कार्यकर्त्यांचाही समावेश आहे.

१९ आरोपींना २१ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. मास्टरमाइंड फहीमवर ५०० हून अधिक दंगलखोरांना एकत्र करून हिंसाचार भडकवल्याचा आरोप आहे.

सोशल मीडियावर दिशाभूल करणारे व्हिडिओ प्रसारित करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा मंत्री कदम यांनी दिला.

# ..तर शाहू महाराजांचे पालन पोषण केले असते का?

### फईम खानच्या पक्षाचा अजब प्रश्न

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** औरंगजेबाने शाहू महाराजांचे पालन पोषण केले. जर त्याने संभाजी महाराजांची हत्या केली असती, तर शाहू महाराजांचे पालन पोषण केले असते का? असा प्रश्न फईम खान याच्या मायनॉरिटीज डेमोक्रॅटिक पार्टीच्या वतीने विचारण्यात आला आहे. फईम खान किंवा पक्षाच्या इतर कोणत्याही पदाधिकाऱ्यांचा नागपूर दंग्याशी संबंध नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

औरंगजेबाशी आमचा काय संबंध? आमचे काही देणे घेणे नाही. मात्र, औरंगजेब हा एक बादशहा होता त्यांनी अखंड भारत निर्माण केला. त्यांनी हिंदूचे पवित्र कैलास पर्वत भारतात आणले असल्याचा दावा मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टीच्या वतीने करण्यात आला आहे.

जर छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने मारले असेल तर ते चुकीचे होते. मात्र, जर संभाजी महाराजांची हत्या इतर कोणी केली असेल तर? मग औरंगजेब दोषी कसा? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.


शिवाजी महाराजांना औरंगजेबाने माफ केले होते, अशीही इतिहासात नोंद आहे. संभाजी महाराज आणि शिवाजी महाराज हे महाराष्ट्राची शान आहेत. जो कोणी त्यांची बदनामी करेल तो देश विघातक काम करेल, असे देखील पक्षाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

नागपूर मध्ये झालेले हिंसा ही आम्ही केलेली नाही. आमच्या पक्षाची यात कुठलीही भूमिका नाही. त्यात पोलिसांकडे काही पुरावे असतील तर त्यांनी आम्हाला सांगावे. आम्ही त्या व्यक्तीवर कठोर कारवाई करू. मात्र नागपुर हिंसाचार प्रकरणी फईम खान दोषी निघणार नाही, यावर आमचा पूर्ण विश्वास आहे.

जर तो दोषी निघाला तर आम्ही त्याला पक्षातून काढून टाकू, असे देखील पक्षाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :** महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ ज्येष्ठ शिल्पकार राम व्ही. सुतार यांना जाहीर झाला आहे. ही घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केली.



वयाच्या १००व्या वर्षीही शिल्पकलेत सक्रिय असलेले राम सुतार यांच्या कायार्चा हा गौरव आहे. या घोषणेनंतर विधानसभेत सर्वपक्षीय आमदारांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

राम सुतार हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार असून, त्यांनी भारताच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाला शिल्पांच्या माध्यमातून अमरत्व बहाल केले आहे. त्यांनी साकारलेली गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी ही सरदार वल्लभभाई पटेल यांची १८२ मीटर उंचीची पुतळा ही जगातील सर्वात उंच पुतळा म्हणून ओळखली जाते.

याशिवाय, महात्मा गांधी यांच्या अनेक पुतळ्या, चंबळ स्मारक, बेंगळुरू विमानतळावरील केम्पेगौडा पुतळा अशा अनेक स्मारकांनी त्यांनी देशभरात आपली छाप सोडली आहे. वयाच्या शंभराव्या वर्षीही ते शिल्पकलेत कार्यरत आहेत, हीच त्यांच्या समर्पणाची खरी ओळख आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राम सुतार यांनी आपल्या शिल्पकलेतून महाराष्ट्राचा आणि देशाचा गौरव वाढवला आहे. त्यांच्या कलाकृती जगभरात भारताचे प्रतिनिधित्व करतात. ह्यमहाराष्ट्र भूषण २०२४ साठी त्यांच्या नावाला सवार्नुमते मान्यता देण्यात आली आहे. हा पुरस्कार त्यांना लवकरच एका विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र भूषण पुरस्कारात २५ लाख रुपयांची रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र यांचा समावेश आहे. हा पुरस्कार साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान, समाजसेवा आदी क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी दरवर्षी दिला जातो. यंदा शिल्पकलेतील अतुलनीय योगदानासाठी राम सुतार यांची निवड झाली आहे.

या घोषणेनंतर सर्वपक्षीय नेत्यांनी सुतार यांचे अभिनंदन केले. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले, राम सुतार हे महाराष्ट्राचे खरे रत्न आहेत. त्यांचा हा सन्मान म्हणजे आम्हा सर्वांचा गौरव आहे. शिवसेना (उबाठा) नेते संजय राऊत यांनीही या निर्णयाचे स्वागत केले आणि सुतार यांच्या कायार्ला काळाच्या पलीकडचे असे संबोधले.

१९ फेब्रुवारी १९२५ रोजी धुळे जिल्ह्यातील गोंदूर गावात जन्मलेल्या राम सुतार यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून शिक्षण घेतले. त्यांना १९९९ मध्ये पद्मश्री आणि २०१६ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या निर्मितीने त्यांना जागतिक कीर्ती मिळवून दिली. आजही ते आपल्या स्टुडिओत नव्या शिल्पांवर काम करत आहेत.

महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या माध्यमातून राम सुतार यांच्या शिल्पकलेतील योगदानाचा सन्मान होत असून, हा क्षण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा आहे.

**: सिनेरंग :**

## अशी ही जमवाजमवी' सिनेमाचा धमाल टीझर रिलीझ

मैत्री, प्रेम, कुटुंब या विषयांवर आजवर बरेच चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत; मात्र राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित 'अशी ही जमवा जमवी' या चित्रपटात फक्त तरुणांचीच नाही तर वृद्ध मित्र मैत्रिणींचीसुद्धा एक धमाकेदार कहाणी अनुभवयाला मिळणार आहे.




लोकरंजन

या दमदार आणि बहुप्रतीक्षित चित्रपटाचं टिझर प्रदर्शित झालंय, ज्यात अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या दोन दिग्गजांची मजेदार जुगलबंदी पहायला मिळते. चित्रपटाचं नाव आणि रिलीझ झालेल्या टिझरवरून संपूर्ण सिनेमा पाहण्याची प्रेक्षकांची उत्सुकता आता वाढली आहे.

थोडी खट्याळ, थोडी गोंडस, थोडी हळवी अशी चित्रपटाची कथा असून आजच्या तरुणाईसोबत प्रौढांनाही भावणारा, मनोरंजक आणि नवीन विचार मांडणारा हा सिनेमा आहे. अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या अनुभवी कलाकारांसोबत सिनेमात सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर, ओमकार कुलकर्णी, तनिष्का विशे अशा लोकप्रिय कलाकारांची फौज आहे.

भारतीय सिनेसृष्टीत मोलाचे योगदान देणारे चित्रपती व्ही. शंताराम यांचे नातू आणि किरण व्ही. शांताराम यांचे चिरंजीव राहुल शांताराम यांनी मनोरंजन विश्वात सिनेप्रेमींसाठी काहीतरी नवीन घेऊन येण्याचे उद्दिष्ट ठेवत राजकमल एंटरटेनमेंट ही नवीन कंपनी सुरू केलेली आहे. प्रेमाची ही नवी कहाणी कशी जमणार आहे, हे जाणून घेणं औत्सुक्याचं ठरणार आहे. 'राजकमल एंटरटेनमेंटचा हा नवाकोरा चित्रपट १० एप्रिल २०२५ रोजी आपल्या जवळच्या सिनेमागृहात भेटीला येणार आहे. ■ ■

## श्रेयस तळपदेचा नवा शो 'चल भावा सिटीत' झी मराठीवर

'चल भावा सिटीत' ह्या बहुचर्चित शोच्या एका प्रोमोमध्ये एक व्यक्ती पाठमोरी चालताना दिसते, ज्यावर कॅप्शन असं होते कि - ' तो येतोय शो गाजवायला! कोण बरं असेल तो? कंमेंट्समध्ये सांगा!'

यावर अनेक युजर्सनी 'श्रेयस तळपदे' अशी कमेंट केली. मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेता श्रेयस तळपदे पुन्हा एकदा झी मराठीवर आणि छोट्या पडद्यावर पुनरागमन करत आहे. त्यांच्या फॅन्ससाठी ही एक आनंदाची बातमी आहे, कारण झी मराठीच्याच 'माझी तुझी रेशीमगाठ' या सुपरहिट मालिकेतील यश-नेहा जोडी खूप गाजली होती. पण यावेळी श्रेयस 'चल भावा सिटीत' या नवा रिॲलिटी शोचा होस्ट म्हणून दिसणार आहे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाने शो मध्ये रंग भरताना दिसणार आहे.

या कार्यक्रमाचं भन्नाट शीर्षकगीत नुकतंच झी मराठीच्या ऑफिशिअल इंस्टाग्राम पेजवर रिलीज करण्यात आलं, याच शीर्षकगीतातील श्रेयसची हुक स्टेप आणि श्रेयसचा लुक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. या शोमध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील स्पर्धक एकत्र येणार असून, स्पर्धकांना अश्या आव्हानांना सामोरे जावे लागेल जिथे त्यांना आपल्यापेक्षा संपूर्णपणे वेगळं जीवन जगणा?या व्यक्तींशी संवाद साधण्यास प्रवृत्त करेल. ग्रामीण आणि शहरी भागातले स्पर्धक एकमेकांच्या जीवनाचा अनुभव घेतील, आणि त्यांना आव्हान देतील. चल भावा सिटीत हा कार्यक्रम प्रेक्षकांना ग्रामीण महाराष्ट्राची समृद्धी आणि संस्कृती दर्शवेल. सिटीत गाव गाजणार म्हणजे नक्की काय होणार हे प्रेक्षकांना हळू हळू उलगडत जाईलच. अशी एक अफलातून संकल्पना जिचा प्रेक्षकांनी विचार सुद्धा केला नसेल आता तुम्हाला पाहायला मिळेल आपल्या लाडक्या झी मराठीवर. प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणारा आणि मनोरंजनाचे रंग उधळणारा नवा कार्यक्रम 'चल भाव सिटीत' १५ मार्चपासून दररोज रात्री ९.३० वा. फक्त आपल्या झी मराठीवर पहा. ■ ■



## धर्मा प्रॉडक्शन्स कृत ये रे ये रे पैसा 3




धमाल मनोरंजन आणि विनोदाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या 'ये रे ये रे पैसा' आणि 'ये रे ये रे पैसा २' या सुपरहिट चित्रपटांच्या प्रचंड यशानंतर, आता या फ्रॅंचायझीचा तिसरा भाग म्हणजेच 'ये रे ये रे पैसा ३' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

नुकताच या चित्रपटाचा दमदार टीझर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला असून त्याला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. येत्या १८ जुलै रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. वैशिष्ट्य म्हणजे, बॉलिवूडला एकाहून एक जबरदस्त चित्रपट देणारे धर्मा प्रॉडक्शन्स आणि एव्हीके पिक्चर्स पहिल्यांदाच एकत्र येत असून धर्मा प्रॉडक्शन्स या चित्रपटाच्या माध्यमातून मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करत आहे. त्यामुळे आधीच भव्य असणा?या या चित्रपटाची भव्यता आता आणखीनच वाढणार आहे.

पुन्हा एकदा अण्णा, आदित्य, बबली आणि सनी एकत्र आल्याने मोठा धमाका उडणार असल्याचे दिसतेय. एकंदरच टीझर पाहाता यावेळचा धमाका तिप्पट असणार हे नक्की ! 'ये रे ये रे पैसा ३' मध्ये पाच करोडचा घोळ आणि त्यात आलेले नवीन ट्विस्ट काय असतील, हे प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच समजेल.

धर्मा प्रॉडक्शन्स, अमेय विनोद खोपकर पिक्चर्स, उदाहरणार्थ निर्मित, न्युक्लिअर ॲरो यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून संजय जाधव दिग्दर्शित या चित्रपटात संजय नार्वेकर, सिद्धार्थ जाधव, उमेश कामत, तेजस्विनी पंडित, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## सभागृहात खडाजंगी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :** दिशा सालियान प्रकरणाचे पडसाद आज विधान परिषदेच्या सभागृहात उमटले. या प्रकरणातील एसआयटीचा अहवाल तत्काळ जाहीर करावा अशी मागणी आमदार अमित साटम यांनी केली. तर नीतेश राणे यांनी ज्यांच्यावर आरोप झालेत, त्यांना अटक करण्याची मागणी केली आहे. शंभूराज देसाई यांनीही नीतेश राणेंच्या मागणीला समर्थन दर्शवले. यानंतर ठाकरे गटाचे आमदार अनिल परब आणि भाजप आमदार यांच्यात जोरदार खडाजंगी झाली.

अनिल परब म्हणाले, आदित्य ठाकरेंची केस कोर्टात पाच वर्षांपासून चालू आहे. या प्रकरणात सीबीआय आणि सीआयडीची चौकशी झाली. त्यासोबतच एसआयटीची चौकशी झाली. एसआयटी चौकशीचा रिपोर्ट दीड वर्षांत समोर का नाही आणला? असा सवाल अनिल परब यांनी केला. तुमचे सगळे विषय बाजुला जावेत, म्हणून शिळ्या कढीला उत आणत आहात का? औरंगजेबाची कबर काल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पूर्णपणे चेपून टाकली. आज दुसरा विषय नाही, म्हणून आदित्य ठाकरेंचा विषय काढला. आदित्य ठाकरेंची चौकशी करायला आमचे काहीच म्हणणे नाही, असे परब म्हणाले.

# शासकीय दंत महाविद्यालयातील अधिष्ठाता डॉ. दातारकर यांना बडतर्फ करा

### डॉ. नितीन राऊत यांची मागणी



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय येथे बीडीएसच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना अधिष्ठाता डॉ. अभय दातारकर यांनी प्रात्यक्षिक परीक्षेत पाहून घेण्याची धमकी देऊन सुळबुध्दीने इंटरनल गुण कमी केले व एक्ट्रनल मिळालेले गुणांमध्येही हस्तक्षेप करून विद्यार्थ्यांना नापास केले. विद्यार्थ्यांना झालेल्या मानसिक छळ प्रकरणी विधानसभेत राज्याचे माजी मंत्री आणि आमदार डॉ. नितीन राऊत यांनी अधिष्ठाता यांना तात्काळ बडतर्फ करून चौकशीची मागणी केली आहे.

शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये बीडीएसच्या अंतीम वर्षातील विद्यार्थ्यांच्या संपुर्ण बॅचला अधिष्ठाता डॉ. दातारकर यांच्या व्दारे मानसिक छळ सहन करावा लागला. डॉ. दातारकर यांनी जाणीवपुर्वक संपुर्ण ६० विद्यार्थ्यांचे इंटर्न बॅचला चुकीचे इंटर्नशिप पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र दिले. यामुळे संपूर्ण बॅच राज्य परिषदेत नोंदणीसाठी अपात्र ठरली. तसेच यांनी विद्यार्थिनींच्या बॅचवर विविध चौकशी लावून छळ केला असल्याचा आरोप यावेळी डॉ. राऊत यांनी केला.

अधिष्ठाता इतक्यावरच थांबले नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांवर कमी उपस्थितीचा आरोप त्यांनी केला. सुडबुध्दीने डॉ. दातारकर यांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या प्रवेश पत्रावर 'नॉट एलिजिबल टू अपियर फॉर एक्झाम' असे लाल पेनानी लिहलेले प्रवेश पत्र विद्यार्थ्यांना जारी केले होते. यावेळी विद्यार्थी आणि पालक अधिष्ठाताच्या आडमुठे धोरणाविरोधात रोष व्यक्त करित त्यांच्या कार्यालयापुढे उभे राहून त्यांच्या या वृत्तीचा निषेध नोंदविला.

यावेळी विद्यार्थ्यांचे महत्त्वाचे तास वाया गेले. प्रसंगी डॉ. राऊत यांनी जनप्रतिनिधी म्हणून हस्तक्षेप केला त्यावेळी अधिष्ठाता यांनी युटर्न घेत 'एलिजिबल टू अपियर फॉर एक्झाम' लिहिलेले प्रवेश पत्र विद्यार्थ्यांना जारी केले. यावेळी डॉ. दातारकर यांनी विद्यार्थ्यांना प्रॅक्टीकल मध्ये तुम्ही किती मार्क घेता हे बघतो असे म्हणत विद्यार्थ्यांना धमकी दिली. कायदा पायदळी तुडविण्याची प्रवृत्ती अधिष्ठाताची दिसून येत असल्याचा आरोप यावेळी डॉ. राऊत यांनी विधानसभेत केला.

११ मार्च ला लागलेल्या निकाला मध्ये राज्यातील ३४ दंत महाविद्यालयांमध्ये नागपूर येथील महाविद्यालयाचा परिणाम सर्वात वाईट होता. अधिष्ठाता च्या सततच्या छळामुळे अनेक विद्यार्थी परीक्षेत नापास झाले आणि उर्वरित उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कामगिरी चांगली नव्हती. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेत कमी गुण देवून व एक्टरनल परीक्षेत हस्तक्षेप करून त्यांचे गुण कमी करण्यात आल्याचा आरोप देखील यावेळी करण्यात आला. यामुळे आता विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे सहा महिनेच नाही तर नीट-एमडीएस परीक्षेच्या प्रतीक्षेत आणखी एक वर्ष वाया जाण्याची भीती यावेळी डॉ. राऊत यांनी दर्शविली आहे.

अधिष्ठाता प्रगत शिक्षणाच्या नावाखाली महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांकडून पैसे उकळत असल्याचा आरोप करित डॉ. राऊत यांनी बीडीएस अंतिम वर्षातील सर्वच विद्यार्थ्यांचे पुन्हा प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन अधिष्ठाता यांना तात्काळ बर्डतफ करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा तसेच चालू वर्षाच्या इर्टनशीप नियमीत बॅच मध्ये समावेश करण्याची मागणी मुख्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना केली आहे.

**नियमबाहय प्रमाणपत्र**

अधिष्ठाता डॉ. अभय दातारकर यांनी मुलगा श्रीनेश दातारकर याच्या वैद्यकीय शिक्षणाकरिता नियमबाहय नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक केली आहे. पीडित विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी चौकशीची मागणी देखील यावेळी माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली.